# मुळजी जेठा महाविद्यालय

## जळगाव

★

1972

## नियतकालिक

★

# अजिंठा


कु. अंजली कुळकर्णी
विद्यार्थी-प्रतिनिधी

प्रा. अं. गं. चिपळुणकर
संपादक

## संपादक–मंडळ :

प्राचार्य चं. रा. पोतनीस
प्रा. म. ना. अदवंत
प्रा. मु. म. थत्ते
प्रा. अं. गं. चिपळुणकर
प्रा. म. मो. केळकर
प्रा. रा. वा. पाटील
प्रा. सौ. मंगला नाडकर्णी
प्रा. ल. न. मुलबागल
प्रा. इफ्तिकार अहमद
कु. अंजली कुळकर्णी ( विद्यार्थी–प्रतिनिधी )

प्रकाशक :
प्रा. अं. गं. चिपळुणकर
मु. जे. महाविद्यालय,
जळगाव.

मुद्रक :
सुभाषचंद्र के. चौधरी
श्रीकान्त मुद्रणालय
१७४, बळिराम पेठ,
जळगाव.

# मित्रहो–

या वर्षीचा अजिंठा' नियतकालिकाचा पहिला अंक आपणास सादर करताना आम्हास अतिशय समाधान वाटत आहे. या वर्षापासून 'अजिंठा' दोन अंकात प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला. पहिला अंक निव्वळ लेखांचा असावा असे ठरले. हा अंक पाहिल्यानंतर आपणासही हा उपक्रम निश्चित आवडेल असे वाटते. दुसरा अंक नेहमीप्रमाणे मार्च महिन्यात आपणास दिला जाईल.

पहिल्या अंकात कै. न. चिं. केळकर व खाडिलकर यांच्या जन्मशताब्दि–निमित्त निबंध-स्पर्धा जाहीर करण्यात आली होती. पण परीक्षकांच्या निर्णयाप्रमाणे सर्वोत्तम असा निबंधच आढळला नाही. तथापि विद्यार्थ्यांकडून आलेले लेख अंकात समाविष्ट करण्यात आले आहेत. तसेच अभिनंदनीय गोष्ट म्हणजे 'गुल–मोहर' या कथेस गावकरीचे बक्षिस मिळाले आहे. त्या कथेची छपाई झाल्यावर हे वृत्त हाती आले.

कै. केळकर, खाडिलकर व पांगारकर या महाराष्ट्रातील विचारवंतांचे व योगी अरविंदांसारख्या जागतिक माहात्म्याचे पुण्यस्मरण या वर्षी करताना आपल्या विचारात चाललेल्या संघर्ष, कोलाहलाचे स्वरूप जाणून घेण्याचा प्रयत्न आपण सर्वांनी करावा या दृष्टीने काही विचार मांडण्याचा हा अल्पसा प्रयत्न करीत आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्या शिक्षणपद्धतीत फारसा बदल झाला नसताना सुद्धा जुन्या पिढींत प्रकर्षाने आढळून येणारी वैचारिक पातळी, सौजन्य, साधुत्व व सामाजिक नि राष्ट्रीय विशाल दृष्टी यांचा सद्यःपरिस्थितीत लोप होत असल्याचे जाणवते आणि आपण आपल्या शिक्षण–पद्धतीलाच दोषी ठरवून मोकळे होण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत आहोत.

विद्यार्थी, शिक्षक, पालक व शिक्षणसंस्थांचे चालक यांच्यातील संघर्ष स्फोटक रूप धारण करून विद्यापीठे व महाविद्यालये बंद पाडून शिक्षणावरचे लक्षच उडवून टाकण्याचे अतिशय निंद्य प्रयत्न केले जात आहेत. शिक्षणक्षेत्रातील अराजकाचे, असंतोषाचे, संघर्षाचे स्वरूप इतके तीव्र होत आहे की त्याचे चटके सर्वच घटकांना बसत आहेत.

'विचारांची विकारावर मात' हा शिक्षणाचा मूळ हेतूच विसरून जाऊन सर्वत्र विकारांचे तांडवनृत्य चालू असल्याचे दृश्य दिसत आहे. समाजातील सर्व लोकांना साक्षर व शिक्षित करण्याचा प्रचंड प्रयत्न चालू असताना शिक्षित वर्ग मात्र सुशिक्षित व सुसंस्कृत होण्याचे नाकारीत आहे. याला अनेक कारणे असू शकतील.

## आपले उप-प्राचार्य



प्रा. अद्वंत
( १ मे १९७२ पासून )



प्रा. थत्ते
( १ मे १९७२ पासून )

# अजिंठा

## मराठी विभाग

विद्येप्रमाणें वैभवसंपत्तीचीहि एक देवता आहे. एकीचे नांव सरस्वती व दुसरीचे नांव लक्ष्मी. परंतु या दोहोंत सरस्वतीला मान अधिक द्यावा ही आपली सनातन मतपरंपरा आहे ही गोष्ट नाकबूल करता येत नाही. याचे कारण असें असावें की, लक्ष्मीभक्तांच्या भोगापेक्षा सरस्वतीभक्तांचा त्याग हा अधिक उठावदार व मनाची पकड घेणारा ठरतो. त्यागी लोक ज्या पुण्याईचा संचय करतात ती त्यांना ज्या विद्यांच्या योगाने लाभतें त्या विद्यांचें मुख साहित्यात आढळतें.

– न. चिं. केळकर

प्रथमत: अशी शंका येते की स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील राजकीय वातावरण जास्त विकारी बनत चालले असावे. परिणामत: विद्यार्थी–वर्ग स्वार्थी व सत्तालुलोप राजकारणाचा बाहुले बनत चालला आहे .व स्वतंत्रपणे विचार करून आपल्या व्यक्तिमत्त्वाचा पद्धतशीर विकास करण्याच्या शिक्षणाच्या उद्देशाचा यात बळी दिला जात आहे. शिक्षण–संस्था राजकारणी लोकांचे अड्डे बनल्याने वैचारिक स्वातंत्र्याचा लोप होऊन वृत्ती संकुचित बनत चालली आहे.

दुसरे कारण कदाचित असे सुचविता येईल की पाश्चात्य विचारांच्या अंधानुकरणामुळे आपल्या समाजाला न पेलवणारी मूल्ये व आदर्श आपण जोपासत आहोत. किंबहुना पाश्चात्य विचारांपेक्षा पाश्चात्य संस्कृतीतून आलेल्या भ्रष्ट व अनिष्ट विकारांचाच पगडा जास्त बसत चालला आहे. विद्यार्थी–वर्ग एक प्रकारच्या संभ्रमावस्थेतूनच जात आहे व चांगले–वाईट निवडण्याची मानसिक कुवत येण्यापूर्वीच वाईट तेच चांगले असे समजत चालला आहे.

तिसरे असेही वाटते की शिक्षणाचा हेतूच अद्याप स्पष्ट होत नाही. नोकरीकरिता शिक्षण, परीक्षांकरिता शिक्षण अशी सोपी सोइस्कर समजूत करून घेऊन कोणत्याही भल्याबुऱ्या मार्गाने पदवी मिळविणे हाच उद्देश डोळ्यापुढे ठेवला जातो. 'सुशिक्षित, सुसंस्कृत होण्याकरिता ज्ञान–साधना' हा शिक्षणाचा आदर्श पुढे मांडण्याचा प्रयत्न केल्यास त्याची हेटाळणी केली जाते. शिक्षण शेकडा पाच हुषार विद्यार्थ्यांकरिता नाही असे बजावले जाते. ज्या शिक्षणाचा दैनंदिन व्यवहारात उपयोग नाही ते शिक्षण कसले असे विचारले जाते.

विद्यापीठे मोठमोठे लेखक किंवा प्रज्ञावान वैज्ञानिक अगर थोर विचारवंत तयार करीत नाहीत. शिक्षणाचा उद्देश निव्वळ हुषार विद्यार्थी तयार करण्याचा नाही तर सामान्य शिक्षित माणसाची वैचारिक पातळी वाढवून जगातील चांगले–वाईट, सुंदर–असुंदर, टिकाऊ–टाकाऊ हे समजण्याची पात्रता वाढवून घेण्याचा आहे. सामान्य माणूस सुयोग्य विचार करण्याच्या पात्रतेचा व्हावा एवढेच, दिसायला साधे पण प्रत्यक्षात जमणे कठीण असे, शिक्षणाचे ध्येय आहे. विषय कोणचाही अभ्यासावा, पद्धती कोणतीही स्वीकारावी पण वैचारिक सुस्पष्टता आणण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच शिक्षण. पण आपण विचारासंबंधी विचार करणेच सोडून दिले आहे. योगी अरविंदांच्याच शब्दात सांगावयाचे झाले तर– "The main cause of the weakness of India is not slavery, is not poverty, is not want of spirituality or religion, but the decay of the capacity to think and concentrate. The result is, today, the reign of ignorance in the land of knowledge."

नोकरी किंवा भाकरीकरिता शिक्षण हा दुसरा एक प्रचलित भ्रम. बुद्धिमत्ता, युक्तायुक्त वागणूक नि सौंदर्यदृष्टी ही जर मानवाला लाभलेली देणगी असेल तर





या सर्वांचा विकास साधून ज्ञान [ knowledge ] चारित्र्य [ goodness ] आणि सौंदर्यदृष्टी या मूल्यांची जोपासना करून आपल्या व्यक्तित्वाचा विकास घडवून आणणे आवश्यक ठरते. ह्यालाच विचारवंतांनी " Education for living and not for livelihood " असे म्हटले आहे.

हा मानवाचा विकास सहजासहजी घडून येत नाही म्हणून तर शिक्षणाची आवश्यकता. एका पाश्चात्य शिक्षणतज्ज्ञाच्या शब्दात सांगावयाचे झाले तर-The great object of college-education is not merely to give knowledge but the cultivation of the mind to think accurately, to discern between the essential and accidental in phenomenon and to train the imagination to grasp things that cannot be felt or perceived by the material senses. Knowledge vanishes away, wisdom remains.

नुसते विषयांचे ज्ञान–संपादन हा शिक्षणाचा हेतूच नाही. परीक्षांकरिता मिळविलेली माहिती परीक्षेपाठोपाठ विसरली जाते. पाठ केलेली विद्या अपुरी पडते आणि पढतमूर्ख बनण्याचा प्रसंग येतो. म्हणून Knowledge किंवा ज्ञान यापेक्षा Wisdom किंवा सुसंस्कृत शहाणपण आणि Resourcefulness अथवा बौद्धिक चपलता हाच शिक्षणाचा हेतू ठरविणे अधिक योग्य होय. असे शहाणपण किंवा चापल्य अंधानुकरणाने येत नाही, पाठांतराने येत नाही; हे स्वतःच मिळवावयाचे असते, शिकावयाचे असते.

आणि हे स्वतःच स्वतःला घडविणे, शिकविणे आपणास सद्यःपरिस्थितीत जमत नाही नि आपण एकमेकास दोष देऊन ही समस्या टाळण्याचा प्रयत्न करीत आहोत. विद्यार्थ्यांना तयार ज्ञान पुरवून मानसिक दृष्ट्या परावलंबी बनविले जात आहे, उत्तरे पाठ म्हणून घेतली जात आहेत. कोणत्याही विषयाचा अभ्यास करून, प्रश्न विचारून अधिक ज्ञान आत्मसात करण्याची कुवतच आपणात राहिली नाही. ज्याला विषय समजला तोच प्रश्न विचारू शकतो. पण विषय समजून घेण्याकरिता बौद्धिक श्रम घेणे आवश्यक आहे हेच तर जमत नाही. आपण सुशिक्षित लोक सुसंस्कृत होण्याचे नाकारीत आहोत.

अशा स्थितीत आपण शिक्षण-पद्धतीत कितीही सुधारणा सुचविल्या तरी त्या आपणास उपयोगी पडणार नाहीत नि ह्याचाच विचार आपण प्रामुख्याने करावा असे आपणास वाटत नाही का ?

– अं. गं. चिपळुणकर

# नव पर्व-

**हा अंक** सादर करतेवेळी या वर्षापासून आपल्या महाविद्यालयाच्या नेतृत्वात झालेल्या बदलाचा उल्लेख अवश्य केला पाहिजे. १९४९ पासून १ मे १९७२ पर्यंत सातत्याने प्राचार्य भाईसाहेब महाजन यांच्या प्रेमळ, सुसंस्कृत व सुविद्य नेतृत्वाखाली महाविद्यालयाची प्रगती धीमेपणाने होऊन आपल्या महाविद्यालयास जळगाव शहरात व खानदेशात एक आगळे स्थान प्राप्त झाले आहे. महाविद्यालयीन विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रगतीचे मोजमाप, त्यात निष्ठेने व श्रद्धेने काम करणाऱ्या व्यक्तींच्या प्रभावशाली व्यक्तिमत्वावरूनच केले पाहिजे. प्राचार्य भाईसाहेब महाजन यांचे पुस्तकांचे मनस्वी वेड, त्यांची ज्ञानाची आवड, त्यामुळे प्राप्त झालेली सर्वांना समजून सामावून घेण्याची वृत्ती व सौजन्याचा अविष्कार म्हणजे महाविद्यालयीन शिक्षणाचा चालता बोलता प्रभावी आदर्शच होय. असा आदर्श सतत पंचवीस वर्षे विद्यार्थ्यांपुढे ठेऊन व महाविद्यालयीन मूल्यांची जोपासना करण्याची शिकवण देऊन प्राचार्य भाईसाहेब महाजन यांनी संस्थेची सूत्रे प्राचार्य पोतनिसांच्या स्वाधीन केली आहेत.

प्राचार्य पोतनीस हे संस्थेच्या सुरुवातीपासूनच येथे असल्याने व त्यांना आपल्या महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीची संपूर्ण माहिती असल्याने यापुढील वाटचाल सुयोग्य मार्गानेच होईल; अशी सर्वांनाच खात्री आहे. आधुनिक युगात आवश्यक असणारी बुध्दिवादी दृष्टी ( Rational outlook ) हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट्य. व कोणत्याही प्रसंगी आपला वैचारिक समतोल ढळू न देण्याची त्यांची वृत्ती हे गुण संस्थेचे सुकाणू योग्य हातात आहे याची हमीच देत आहेत.

त्यांना जोड मिळाली आहे उपप्राचार्यद्वय प्रा. अदवंत व प्रा. थत्ते यांची. प्रा. अदवंत हे महाराष्ट्रात नामवंत समीक्षक व टीकाकार म्हणून प्रसिद्ध आहेत पण त्यांचा मराठीच नव्हे तर इतर भाषातील वाङमयाचा व्यासंग व चिकित्सक दृष्टि-कोन सर्व विद्याप्रेमी विद्यार्थ्यांना अनुकरणीय ठरणार आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्वात महाविद्यालयाची शैक्षणिक मूल्ये ( Acadamic interest ) पूर्णपणे सुरक्षित राहून जोपासली जाणार आहेत.

प्रा. थत्ते हे केवळ आपल्या विषयातील नामवंत प्राध्यापक म्हणूनच नव्हे तर शिकविण्याची कला संपूर्णपणे अवगत असलेले विद्यार्थीप्रिय प्राध्यापक आहेत. शिवाय त्यांची कोणच्याही गोष्टीचा मूलगामी विचार करून चिकाटीने पाठपुरावा करून निर्णय घेण्याची वृत्ती ही संस्थेच्या प्रगतीस निश्चितच उपयोगी पडणार आहे.

नव्या नेतृत्वाखाली संस्थेची उत्तरोत्तर प्रगती होत जाईल असा विश्वास व्यक्त करून हे छोटेसे मनोगत संपवितो..

– संपादक





## आपले प्राचार्य



प्राचार्य महाजन
( १५ ऑगस्ट १९४९ ते एप्रिल १९७२ अखेर )



प्राचार्य पोतनीस
( १ मे १९७२ पासून )

# भरती

कु. अंजली रा. कुळकर्णी
टी. वाय. बी. ए.

सागरभरती
आभाळ वरती
फेसाळ लाटा
पाण्यावरती ॥ १ ॥

दूरवर दिसती
माडच माड
चिमुकलं घरटं
झावळ्यांच्या आड ॥ २ ॥

खाडीची लाल
माती ओली
मातीच्या कुशीत
झोपली शिंपली ॥ ३ ॥

ओघळत्या चांदण्यात
भिजली खाडी
माडाच्या खाली
विसावली होडी ॥ ४ ॥

त्या होडीचा
साजण दूर
साजणीच्या मनात
दाटे हुरहुर ॥ ५ ॥

येईल का तो ?
पहाते वाट
अनावर होते
अवखळ लाट ॥ ६ ॥

कितीक क्षण
पाहुन वाट
पापण्यांच्या दवात
भिजतो काठ ॥ ७ ॥

दूरवर दिसते
येताना होडी
झोंबऱ्या वाऱ्यात
बसलीय वेडी ॥ ८ ॥

पुनवेच्या रात्रीचा
अजब साज
दर्याचा दुनियेत
फुललाय ताज ॥ ९ ॥

येताना दिसतो
दर्याचा राणा
नकळत झोपल्याचा
ती करते बहाणा ॥ १० ॥



# 'साहित्य-सम्राट' तात्यासाहेब केळकर

– प्रकाश ग. हरताळकर
(द्वितीय वर्ष–कला)



स्व. तात्यासाहेब केळकर यांचे चरित्र उज्ज्वल आहे. देशप्रेमाने, श्रद्धेने व विविधांगी सेवेने ते समृद्ध आहे. आजच्या तरुण पिढीला त्यांचे चरित्र निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

तात्यासाहेबांचे नाव नरसिंह चिंतामण केळकर असे आहे. त्यांचा जन्म मोंडनिबास दि. २४ ऑगस्ट १८७२ रोजी झाला. लो. टिळकांचे खरे एकमेव राजकीय वारसदार असलेले देशभक्त म्हणून ते परिचित होते. लोकमान्य टिळक 'असंतोषाचे जनक' होऊन लोकमान्य बलवंतराव हे खरे 'बलवंत' ठरले होते; त्याप्रमाणे तात्यासाहेब आपल्या पराक्रमाने पुरुषसिंह ठरून 'नरसिंह' ठरले होते.

'लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर इतक्या योग्यतेचा, तात्यासाहेबांशिवाय दुसरा पुरुष महाराष्ट्रात नव्हता,' असे महामहोपाध्याय स्व. अणे सांगतात. त्यांनी लोकमान्यांची परंपरा व धोरण अखंड राखली.

तात्यासाहेब केळकरांचे चरित्र म्हणजे सर्वस्पर्शी असा केवढा प्रचंड, भव्य नि उदात्त जीवनओघ आहे. या ओघांमध्ये प्रचंड व भीषण धबधबे नाहीत; पण प्रवाह असा अथांग व सर्वव्यापी आहे की, त्याची भव्यता, गांभीर्य, निर्मलता व पावित्र्य पाहून मन प्रसन्न होते व अशी दिव्यत्वाची प्रचीती घडून वंदनाला हात जोडले जातात.

इ. स. १८८८ साली मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण होऊन १८८९ मध्ये पुणे येथील फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश केला. १८९१ साली ते बी. ए. परीक्षा उत्तीर्ण झाले. एल्. एल्. बी. परीक्षाही उत्तीर्ण झाले. पण त्यांनी वकिली केली नाही. लो. टिळकांच्या 'केसरी' 'मराठा' मध्ये ते मातब्बर सहकारी म्हणून नावाजले. दि. १७ मार्च १८९६ रोजी ते 'केसरी–मराठा' संस्थेत दाखल झाले. १८९७ मध्ये लो. टिळकांना शिक्षा झाली ! तात्यासाहेब 'केसरी' 'मराठा' या वर्तमानपत्रांचे संपादक झाले. या वर्तमानपत्राचे संपादक होणे म्हणजे सतीचं वाण हाती घेण्यासारखे होते. तात्यासाहेबांनी हे सतीचं वाण आनंदाने व कर्तव्यबुद्धीने स्वीकारले. सरकारची हिंस्र नजर सतत या वर्तमानपत्रांवर असे; पण तात्यासाहेब डगमगले नाहीत. त्यांनी आपले कार्य त्यागाने, कष्टाने, चातुर्याने चालविले.

तात्यासाहेब हे 'केसरीचे' २१ वर्षे व 'मराठा' चे २० वर्षे संपादक होते. एकूण ४१ वर्षे त्यांनी या संस्थेत नोकरी केली. लोकमान्य टिळकांच्या गैर–हजेरीतला हा काल तात्यासाहेबांसाठी मोठा कसोटीचा ठरला. परंतु या सर्वांवर मात करून तात्यासाहेब प्रशंसेला पात्र ठरले. 'मराठा' तील 'दि एडिटर अँड दि मॅजिस्ट्रेट' हा अग्रलेख वाचून इंग्रजांचे धाबे

दणाणले. इंग्रज सरकारवरील त्यांची टीका व त्यांचे धैर्यगुण व कर्तव्यनिष्ठा यामुळे ते महाराष्ट्रात नावाजले.

लोकमान्य टिळक ५१ आठवडे सक्त मजुरीची शिक्षा भोगून सप्टेंबर १८९८ मध्ये सुटले. टिळकांनी ' केसरी ' हातात घेतला. पुनश्च हरिः ॐ ' ने टिळक पुन्हा संपादक झाले, पण ' मराठा ' तात्यासाहेबांकडे होता. त्यांच्या भाषेबद्दल, लेखन-शैलीबद्दल त्यांचे प्रतिस्पर्धीही त्यांची स्तुती करीत त्यांची सुजनता, कामाची तडफ, कार्यनिष्ठा व योग्यता लो. टिळकांनी अचक हेरली. त्यांनी 'मराठा' फारच उत्कृष्टपणे चालविला. त्यांची वृत्ती स्वतंत्र व बाणेदार होती. लो. टिळकांशी कांही मतभेद झाल्या-मुळे त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला, पण टिळक तो नाकारीत असत. कारण त्यांचा प्रेमळ स्वभाव, कुशाग्र बुद्धिमत्ता, व स्वार्थत्यागी वृत्ती यांची लो. टिळकांना जाणीव होती.

' आता माझ्या जागी तुम्ही क्रमाने आला आहा ' हे लोकमान्य टिळकांचे तात्यासाहेबांबद्दल काढलेले उद्‌गार आहेत. त्यांचे निर्मळ प्रेम व विश्वास तात्यासाहेबांनी आपल्या थोर गुणांनी संपादला. ' दि केस फॉर इंडियन होमरूल ', हे इंग्रजी पुस्तक एका रात्रीत लिहून लोकमान्यांची शाबासकी मिळविली.

अशा तऱ्हेने १९१४ ते १९१८ या काळात तात्यासाहेब हे ' केसरी-मराठा ' चे संपादक म्हणूनच नव्हे तर लो. टिळकांचे ' प्रायव्हेट व पोलिटिकल सेक्रेटरी ' व प्रांतिक पुढारी म्हणूनही प्रसिद्धीस आले.

लोकमान्य टिळक १ ऑगस्ट १९२० रोजी निवर्तले ! त्यांच्या मृत्यूनंतर तात्यासाहेबांनी 'केसरी-मराठा' जगवला व सांभाळला. जबाबदारी-बरोबर अनेक संकटे आली तरी लढणे, झगडणे या टिळकांच्या शिकवणीप्रमाणे तात्यासाहेबांनी निर्भयपणे तोंड दिले. गांधीवाद व सरकारी अवकृपा- सर्व प्रश्नांवर मात करून 'केसरी-मराठा' वाचविला, त्याला वैभवशाली व समृद्ध केले. त्यांनी टिळक-तत्वप्रणालीं कधीही सोडली नाही. त्यांची राष्ट्रनिष्ठा, त्याग, कष्टाची हौस, निर्भयता, विद्वत्ता, व्यासंग, पावित्र्य, व जनसेवेची आवड या सद्‌गुणांच्या जोरावर तात्यासाहेबांनी साऱ्या महाराष्ट्राचे हृदय जिंकले.

संपादक म्हणून त्यांचा विविध विषयांचा अभ्यास, व्यासंग, खूप होता. राजकारण, अर्थशास्त्र, व भाषाशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, तत्वज्ञान, व शिक्षणशास्त्र या विविध विषयांच्या अभ्यासाची तीव्र बुद्धिमत्ता तात्यासाहेबांजवळ होती. स्वाभिमान, स्वतंत्र वृत्ती व मतांचा खंबीरपणा ही तत्वे संपादक म्हणून त्यांनी प्रतिपादिली

त्यांचे विविध, विपुल व गुणसंपन्न लेखन पाहून बहुधान्य प्रसवणाऱ्या धरतीमातेची आठवण येते; एका प्रकारचे ' दौलतीचे दिव्य ठेवे ' भासतात. " हिंदुस्थानच्या पहिल्या दर्जाच्या आजच्या वर्तमान-पत्रकारात तात्यासाहेब केळकरांची गणना केली पाहिजे. कदाचित् ते पहिल्या प्रतीच्या विद्यमान वृत्तपत्रकारांत पहिले आहेत असेही म्हणावे लागेल." बी. जी. हॉर्निमन, संपादक ' सेंटिनल ' यांचे हे उद्‌गार सार्थ वाटतात. ' संपादकांचा राजा ' हीच संज्ञा तात्यासाहेबांना योग्य वाटते.

' स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे ' हा लो. टिळकांचा महामंत्र आणि ' तो मी मिळवीनच ' हा त्यांचा निर्धार तात्यासाहेबांनी देशबांधवांत राजकीय जागृती करून चेतविला. गांधीवादाशी झगडताना त्यांना लोकमतापेक्षा लोकहिताकडे अधिक लक्ष दिले; निर्भयपणा दाखविला. राजकारणात त्यांची दृष्टी दूरगामी, सडेतोड व बेडर होती.

" तात्यासाहेब केळकर म्हणजे मानवी बुद्धीचा एक सर्वसंग्रहच होता- राजकीय विषयांवरील लेखाबद्दल तर विचारावयासच नको. राजकीय लेखनाचे ते व्यासमुनी आहेत. " - असे सार्थ उद्‌गार डॉ. मुकुंदराव जयकर यांनी काढलेले आहेत. राजकारणात ते धुरंधर मुत्सद्दी होते.

तात्यासाहेब केळकरांना ' साहित्यसम्राट ' म्हणून सारे ओळखतात. " तात्यासाहेब हे साहित्य क्षेत्रांतील कर्मयोगी व ज्ञानयोगी आहेत. वाङ्मय-क्षेत्रांत ते खरे भक्तियोगीही आहेत. "- प्रा. वा. म. जोशी. वाङ्मयाच्या कोणत्याही क्षेत्रात निर्भयपणे संचार करणे हा त्यांच्या कर्तृत्वाचा अनन्यसाधारण विशेष होय. ते कवी, नाटककार, लघुकथालेखक, कादंबरीकार, रसज्ञ टीकाकार, संपादक, ग्रंथपरीक्षक, चरित्रकार, इतिहासकार, सर्वश्रेष्ठ निबंधकार आहेत. तात्यासाहेबांच्या या वाङ्मय-साम्राज्यावर त्यांची प्रतिभा तेजाने तळपत होती. त्यांचे हे विविधांगी व विस्तृत वाङ्मय मौलिक व चिरंतन आहे. या सर्व क्षेत्रात ते श्रेष्ठ व आदर्श आहेत.

मराठी नाट्यवाङ्मयाला अभिमान वाटावा असाच ' तोतयाचे बंड ' या प्रमाणसुंदर नाट्य-कृतीचा प्रसन्न विलास आहे. हे नाटक महाराष्ट्र-नाट्यवाङ्मयाचा एक उज्ज्वल अलंकार आहे. चरित्रकार म्हणून इटालियन ' गॅरिबाल्डी, ' लो. टिळकांचे चरित्र, झांशीवाली वगैरे पुस्तके भारदस्त आहेत. ' गतगोष्टी ' अर्थात तात्यासाहेबांचे आत्मचरित्र या हजार पानांच्या ग्रंथाने मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली आहे. सुंदर कल्पना, प्रतिभेची चमक, चमत्कृतिजनकता व सभ्य विनोद हे वाङ्मयाचा उत्कर्ष करणारे सद्‌गुण तात्या-साहेबांचे अंगभूत आहेत. त्यांचे वाङ्मय स्फूर्तिदायक, विचारप्रवर्तक, ज्ञानसंवर्धक, आनंददायक व म्हणूनच आदर्श आहे. ते निरंतर टिकणारे व उपकारक आहे.

तात्यासाहेबांच्या समकालीन अनेक साहित्यिकां-पैकी चिंतामणराव वैद्य, वा. म. जोशी, वि. स. खांडेकर, कृ. प्र. खाडिलकर, सरदेसाई, पोतदार, राजवाडे, पांगारकर, वगैरे लेखकांनी तात्यासाहेबांच्या वाङ्मयीन सेवेबद्दल 'मानपत्र' अर्पण केले. या थोर भाग्याचा महाराष्ट्र अभिमानी आहे. या साहित्य-सम्राटाचा महाराष्ट्र आजही जयजयकार करीत आहे.

पण ' केसरी ' चे क्षेत्र अपुरे पडल्यासारखे वाटूनच जणू काही तात्यासाहेबांनी आपल्या कर्तृत्वाचा प्रवाह इतरही अनेक कार्यक्षेत्रांत खेळवून महाराष्ट्राचे राष्ट्रीय जीवन सर्व बाजूंनी समृद्ध केले. महाराष्ट्रांतील प्रायः सर्व चळवळींचे ते आधार व समाजातील सर्व क्षेत्रांतील कामातील जनतेचे ते विश्वासू सल्लागार होते.

' मी एक सामान्य बुद्धीचा, सामान्य कर्तृत्वाचा मनुष्य आहे ' असे तात्यासाहेब स्वतःबद्दल सांगतात. तात्यासाहेबांनी आत्मसंतुष्टपणे, न्यायी बुद्धीने व प्रांजलपणे केलेले हे स्वपरीक्षण अतीव सुंदर ठरते. तात्यासाहेबांचे चरित्र हे असे बहुरूपी, विविधांगी, व अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे आहे. जनतेशी एकनिष्ठता, त्यागमय जीवन, राजकारणकुशलता, निष्कलंक चारित्र्य, निर्भय देशभक्ती, बुद्धीचा चौरसपणा व स्वतंत्रपणा, प्रगाढ विद्या- व्यासंग, उच्च विचार व लोकसंग्रहवृत्ती या विविध गुणांनी त्यांचे जीवन परिपूर्ण व आदर्श झाले आहे. यापैकी एकेक गुण वा कर्तृत्वक्षेत्र जरी माणसाला लाभले तरी त्याला जीवनाची सार्थकता वाटेल.

महाराष्ट्र गुणग्राही आहे, रसिक आहे. तात्यासाहेबांच्या प्रत्येक कृतीचे महाराष्ट्राने कौतुक केले व आदराने त्यांना आपले राजकीय पुढारी मानले. तात्यासाहेबांचे चरित्र आम्हाला सतत स्फूर्तिदायी घडो !

दिव्यत्वाची जिथे प्रचीती ।

तेथे कर अमुचे जुळती ॥

रुचकर व स्वादिष्ट भोजनासाठी
चवदार रिफ्रेशमेंटसाठी
व आरामदायी निवासासाठी
एअर कंडीशण्ड हॉटेल आपली निवड
**मोराको**



सेशन्स कोर्टासमोर जळगाव
फोन १७८

जळगावात प्रसिद्ध असलेले
**छाया रेस्टॉरंट**
* पुरी भाजी * श्रीखंड
वासुंदीकरिता
– व –
**कमल रेस्टॉरंट**
* फरसाण * चहा * कॉफी
व थंड पेयांकरिता प्रसिद्ध
कृपया एकदा अवश्य
भेट द्या.



खा
न्दे
श

सर्व प्रकारचे व आधुनिक पद्धतीचे
नंबरचे चष्मे, तसेच उत्तम प्रतीचे
गॉगल्स मिळण्याचे खान्देशातील
एकमेव ठिकाण—
**ऑप्टिकल कंपनी**
खान्देश ऑप्टिकल कंपनी
चष्म्याचे व्यापारी; १०५ नवीपेठ,
(माहिजी बाजार) जळगाव.
प्रो. जी. आर. देशपांडे
[ एक वेळ आमच्या दुकानास अवश्य भेट द्या ]



# देह चंदनाचा

– यशवंत काशिनाथ भंगाळे
टी. वाय. बी. ए.

अंधारलेली रात्र हळूहळू पहाटेच्या मार्गावर लागली होती. अजूनही झोप येत नव्हती. पर्णहीन वृक्षावर जशी कोकीळ नसते तसेच निस्तेज डोळ्यात निद्रेचं वास्तव्य नसतं हेच खरं! हॉस्पिटलात सर्व शांत होतं-- स्मशानासारखं. मधून मधून येणाऱ्या रोग्यांच्या आर्त किंकाळ्या घुबडाच्या आवाजा-प्रमाणं भासत. छतावरील पंख्याची मंद मद हवा व घरघर सारखी चालू होती. रूममधील ट्यूब-लाइटच्या प्रकाश अधू डोळ्यांमुळं फारच अंधुक वाटत होता दूरवरून हेल काढून कुत्र्यांचं भुंकणं अस्पष्ट ऐकू येत होतं. रित्या मनानं बेडवर पडलेलो आहे. कूस बदलण्याचं सुद्धा त्राण अंगात उरलं नाही निश्वास सोडताना देखील श्रम पडत आहेत. मन जरी रितं असलं तरी समाधान वाटतं आहे. कुठल्याही प्रकारचे क्लेश मनाला नाहीत. जगाच्या अखेरीचा प्रवास सुध्दा सुखकर होईल अस वाटतय. आपलं जीवन इतरांसारखंच ऊन सावल्यांनी भरलेलं आहे. साठाच्या वर पावसाळे माझ्या अंगणात बरसले असतील. गत जीवनातील सुखदुःखाचे गोड आंबट प्रसंग चिंचेप्रमाणंच मधुर वाटतात. रात्रीचे दोन टोल ऐकू आले. आणि हे टोल ऐकून माझं मन गतकाळात गेलं.

'दोन टोल पडलेत वाटतं'! मी ओठातच पुटपुटलो आणि स्टाफरुममधून तासावर जाण्या-साठी निघालो. व्हरांड्यांत मुलामुलींची फारच गर्दी होती. मुलांच्या हास्यफवाऱ्यांनी व मुलींच्या कुजबुजण्यानं वातावरण फुललं होतं. त्यांच्या रंगी-बेरंगी कपड्यांसारखंच वातावरण बहुरंगी बनलं होतं. मी जात असतांना पुढची बंद होणारी कुजबूज पाठीमागे लगेच सुरु होत होती. त्यातून एक आवाज कानी पडला... 'पहा गं; नवीन आलेले प्राध्यापक हेच वाटतं।'

परंतु ह्या सर्व गोष्टींकडे माझं मुळीच लक्ष नव्हत. माझं अंतःकरण अनामिक भीतीनं धडधडत होतं आणि पावलं झरझर पी. डी. च्या वर्गाकडं पडत होती. माझ्या चालीत सुद्धा मलाच नवखेपण जाणवू लागलं आणि तशाच स्थितीत मी वर्गात प्रवेश केला. मुलं उभं राहून परत बसली. मी भीतीयुक्त कुतूहलानं विद्यार्थ्यांकडं बघितलं. सर्व मुलंमुली शांत पण अनामिक भावनेनं माझ्याकडे बघत होती. क्षण दोन क्षण अशाच स्थितीत निघून गेले. मी पुस्तकाला हात घातला तोच कुणीतरी मागून मांजरीचा आवाज काढला. त्याबरोबर सर्व वर्गात हास्याचा डोम उसळला. मी थोडा गांगरलो पण अवसान गोळा करुन पुन्हा एकवार वर्गावर नजर फिरविली आणि स्वतःलाच सावरण्यासाठी हसलो. त्याबरोबर पुन्हा एक मुलांच्या हास्याची लाट उसळली आणि त्याच लाटेनं माझं नवखेपण धुऊन निघालं. सहजगत्या बोलावं तसं मी म्हटलं, छान! 'आपणहून तुम्ही तुमची ओळख करुन दिली' त्याबरोबर आणखी एक हास्याची लाट उसळलीं आणि वर्गात अगदी आनंदी वातावरण पसरलं.

मी म्हटलं, 'चला मित्रांनो आपल्या पहिल्याच तासाची सुरवात हसण्यानं झाली. आपण असंच हसत हसत अभ्यास करीत वर्ष घालवू या! 'वेल बिगन इज हाफ डन्' असं म्हणतात ना! प्रथम मी माझी ओळख करुन देतो. माझं नाव सुधीर देशपांडे. मागच्याच वर्षी एल्फिस्टनला एम्. ए. झालो मला तरुण मुलं आवडत असल्यामुळं त्यांच्या चिरसहवासा-साठी मी प्राध्यापक होणं पसंत केलं. मी प्राध्यापक झालो ते फक्त एकाच विषयावर जन्मभर पोपटपंची करण्यासाठी नाही. मला तरुण मनांचं आकलन करायचंय, त्यांना घडवायचंय्, जीवनाचा अर्थ मला

पहायचाय, त्यांना पाहून घ्यावयाला लावायचंय् । आताच पहा, तुम्ही कुणी मांजरीचा आवाज काढला. मला त्यात काही वावगं वाटलं नाही; कारण तसं करणं हे तरुण मनाचं लक्षण आहे. मांजरीला सुद्धा आवडत्या दोन वस्तू आहेत. एक म्हणजे दूध आणि दुसरं म्हणजे गणपतीचं वाहन. तरुण सुद्धा मांजरी-सारखेच असतात. त्यांना समाजकार्य करण्याचंही आवडतं आणि खोड्या करणंही. जो त्यांच्याशी जसं वागेल तस ते लोकांबरोबर वागतात. मी मात्र तुम्हाला ज्ञानरुपी दूधच पाजण्याचा प्रयत्न करीन आणि शाकाहारी मांजर बनवीन. '

असाच मी तासभर बोलत होतो. मुलं ऐकत होती. मधून मधून बेंच वाजवीत होतो. माझंही मन आनंदानं फुलून निघालं होतं. माझ्या पहिल्याच तासाला हास्यरुपी पारिजात बहरला होता. मुलांच्या स्नेहार्द्र नजरांनी न्हाऊन निघालो होतो आणि आदर्श शिक्षक होण्याच्या स्वप्नमहालात आशेच्या दीपकांची रोषणाई झालेली होती. कसल्यातरी उत्साहानं माझं मन भारुन गेलं होतं. हाच उत्साह मला आयुष्यभर पुरला. साध्या शिक्षकाच्या जीवनातही राजाप्रमाणं अत्युच्य आनंदाचे व दुखाःचे क्षण असू शकतात. दरवर्षी येणाऱ्या विद्यार्थ्यांकडं मायेनं, जाणाऱ्या विद्यार्थ्यांनी जीवनाच्या आसमंतात मारलेल्या भराऱ्यांकडं कुतूहलानं पाहण्यात जो आनंद असतो त्याच्या ऊर्मी त्या भराऱ्यांपेक्षा किती तरी उंच उसळतात.

इतक्यात दरवाजा उघडण्याचा आवाज झाला. त्याबरोबर माझी विचारशृंखला तुटली आणि नजर दरवाजाकडे गेली. कुणीतरी आकृती दिसत होती. जवळ येणाऱ्या पावलांबरोबर हृदयाची धडधड सुद्धा वाढत गेली. नर्स होती ती. मला जागाच पाहून विचारलं ‘ झोप येत नाही वाटतं ! ’ पण मी उत्तर दिलं नाही. तिनं माझ्या तोंडात थर्मामीटर घालून इन्जेक्शन तयार करू लागली. मी अगदी आज्ञाधारक मुलाप्रमाण तिच्याकडं पाहत होतो. तिनं ताप पाहून इन्जेक्शन दिलं व माझा हात दुखू नये म्हणून छातीवर गळ्याभोवती हळूच ठेऊन दिला. तशाच स्थितीत पुष्कळ वेळ पडून राहिलो हात उचलण्याचं सामर्थ्य माझ्यात राहिलं नव्हतं. परंतु हाच हात माझं मन भूतकाळात ओढून घेऊन गेला.

असाच हात माझ्या गळ्यात टाकून पुष्पा त्या दिवशी झोपली होती. घड्याळात चारचा गजर झाल्यामुळं मला जाग आली होती. मुलांना शिकवण्यासाठी काही नोट्स् काढावयाच्या असल्यामुळं पहाटेचा गजर लावला होता. परतु अशी गोड मिठी सोडून नोट्स् काढण्याचं रुक्ष काम करण्यास माझं मन धजत नव्हतं. मी तिचं झोपेतील मूक सौंदर्य कितीतरी वेळ बघत राहिलो. तिचे बोलके डोळे बंद असतांना देखील ती किती सुंदर वाटत होती याचंच नवल वाटत होतं. जगाच्या अंतापर्यंत असंच पडून रहावंसं वाटत होतं. पण लागलीच मला नोट्स् काढण्याची आठवण झाली आणि माझ्या आनंदावर विरजण पडलं. नोट्स् नाही काढल्या तर आपण मुलांना चांगलं शिकवू शकणार नाही. आज नाही काढल्यातर एकवेळ निभून जाईल; पण दररोज असंच झालं तर ! ह्या क्षणिक मोहामुळं माझ्या ध्येयाला सुरुंग तर लागणार नाही ना ? अशी शंका मनाला चाटून गेली. आणि मोठ्या कष्टानं तिचा हात बाजूला काढून नोट्स् काढण्यास बसलो.

पुष्पाच्या आठवणीनं डोळ्यांच्या कडा ओलावल्या. आपली ती जीवनसाथी मध्येच मला एकट्याला टाकून महाप्रवासाला निघून गेली ! माझी सोबत कदाचित तिला परवडणारी नसेल. सर्व-सामान्य स्त्रीला लाभणारं आई होण्याच भाग्य तिला लाभलं नाही. भरुन आले डोळे पुसण्यासाठी हात वर केला. डोळे पुसता पुसता हात कपाळावर पडलेल्या खोकेवर गेला आणि तिथं स्थिर झाला. मनश्चक्षूसमोर मागचा प्रसंग उभा राहिला.

मी कपाळावरील जखमेवर हात दाबून धरला होता; जखमेतून सारखं रक्त वाहत होतं. क्षणभर काय झालं मलाच समजलं नाही. कॉलेजातून घरी सायकलवर जात असतांना कुठूनतरी एकदम जोरात दगड येऊन कपाळात बसला होता. रस्त्यावर एकदम गोंधळ झाला. कुणीतरी ओरडले, ‘ पकडा ! पकडा त्या पळणाऱ्या मुलाला. ’ परंतु माझं तिकडं लक्ष नव्हतं. माझं मस्तक सुन्न झालं होतं. मला दोनतीन लोकांनी उचलून जवळच्या दवाखान्यात नेलं तरी मला काही समजलं नव्हतं. मला थोडं पाणी पाजण्यात आलं. त्या पाण्यानं जरा बरं वाटलं. डॉक्टरांनी औषध लावून जखम बांधून दिली. तेव-ढ्यात् एक मनुष्य आत आला. त्यानं दगड मारणाऱ्या मुलाला पोलिसांच्या ताब्यात दिल्याचं सांगितलं. काही वेळ गेल्यानंतर समजलं तो मुलगा म्हणजे आपला विद्यार्थी पांडे होय. हे कळताच त्या जखमे-पेक्षा अतिशय खोल जखम माझ्या हृदयात झाली; कधीही न बरी होणारी. पांडेला मी आजच पेपराला कॉपी करतांना पकडलं आणि वर्गाबाहेर काढून दिलेलं होतं. त्याचा सूड त्यानं असा घ्यावा याबद्दल मला फार वाईट वाटलं.

दवाखान्यातून घरी जाताना माझ्या मनात विचारांचं वादळ उठलं होतं. त्या मुलानं कॉपी तरी का करावी ? मी त्याला पेपरातून हाकलून लावलं यात मला काय आनंद वाटला ? ज्या विद्यार्थ्याला मीच वर्षभर शिकविलं त्या विद्यार्थ्यानं नापास व्हावं असं मला कधी वाटेल का ? शिक्षकाची इज्जत म्हणजेच विद्यार्थ्यांचे मार्कस् ! पण कोणच्या आईबापाला आपला मुलगा चोरी करुन जीवन जगतो हे पाहाण्यात आनंद वाटेल ?

घरी पुष्पाला रस्त्यात सायकलीची ठोस झाल्यामुळं लागलं असं सांगून निभावून नेलं. परंतु माझं मन स्वस्थ बसत नव्हतं. माझी मलाच रुखरुख वाटत होती. माझ्या अंतःकरणात खोल कुणीतरी म्हणत होतं, ‘ झाली असेल मुलाच्या हातून चूक; कुणाच्या हातून चूक होत नाही ? क्षमा न करणारा शिक्षक शिक्षकच असू शकत नाही. तोडणाऱ्या कुऱ्हाडीला चंदन सुगंधी करतंच ना ! ’ असा विचार करुन मी माझ्या जामिनावर पांडेची सुटका करवून घेतली. पांडे जेव्हा माझ्याजवळ आला तेव्हा त्याचा चेहरा अगदीच उतरलेला, नजर खाली झुकलेली होती. माझ्याकडं पाहण्याचं त्याला धैर्य होत नव्हतं. जवळ येताच त्यानं माझ्या पायाला मिठी मारली; आणि मोठ्यानं रडत रडत म्हणाला, ‘सर ऽ ऽ सर मला माफ करा. ’ त्याच्या पश्चात्तापानं माझं मन लोण्यासारखं वितळून डोळ्यातून पाझरुन गेलं. मी लागलीच त्याला वर उचललं आणि मिठीत धरलं. तो सारखा स्फुंदत होता. डोळ्यातून आसवांचा पूर वाहात होता आणि माझ्या कपाळावर टिपकत होता. त्यामुळे बांधलेली जखम ओलीचिंब झालेली होती. डॉक्टरांना वाटत असेल ती जखम आपल्या औषधानं सुधारली असेल पण मला वाटत होतं त्या अश्रूंनीच माझी जखम भरुन निघाली होती.

किती दिवस झाले असतील ह्या घटनेला पण आठवणी जखमेच्या व्रणासारख्याच कायम राहतात. आपण काय थोड्या घटकांचे गडी. तरीपण मन भूतकाळात रमून जातं. सारं जीवन अवलोकू पाहत आहे. सासरी जाणारी मुलगी कशी घराकडं वळून वळून पहाते तसंच माझं मन भूतकाळात वळून वळून पहातंय्. प्रत्येक प्रसंग आठवणीच्या मधुर शाहाळ्यांनी भरलेला असतो. आपल्याला वाटेल तेव्हा तहान भागविता येते.

त्या दिवशी मी ‘ डी. एच् लॉरेन्सची “ बेस्ट ऑफ स्कूल ’ ही कविता शिकवीत होतो. सकाळचं वातावरण शांत व उत्साही होतं नुकतीच पावसानं न्हाऊन निघालेल्या सृष्टीसारखं. शिकवण्यात मी रंगून गेलो होतो एकामागून एक वर होणाऱ्या माना, काहीतरी नवीन समजल्याचा, चेहऱ्यावर आनंद दाखवणाऱ्या, फुलपाखरासारख्या उडणाऱ्या शिक्षकावर लागलेल्या नजरा, दाणे टिपून उडून जाणाऱ्या पाखरासारख्या परत खाली होणाऱ्या नजरा. अशा कवितेतील वातावरणातीलच अनुभव मला येत होता. पण तेवढ्यात शेवटच्या बेंच-वरील मुलाला डुलक्या देतांना पाहून माझ्या

शिकविण्याची साखळी एकदम तुटली आणि मन ओघळून पडणाऱ्या मण्याप्रमाणं विखुरलं गेलं. पुष्पगुच्छातून एकदम सर्प निघावा तसा झोपलेल्या मुलाला पाहून मनातला संताप जागा झाला. मी त्याला उठवून उभं केलं आणि राग अनावर येऊन नाही नाही ते बोललो. पण तो शिलेसारखा निश्चल उभा राहिलेला पाहून माझा क्रोधाग्नी आणखीच भडकला. मी त्याला बाहेर हाकलून पुन्हा कधीही तासाला न बसण्याची आज्ञा दिली. वर्गाचं वातावरण क्षणात बदलून गेलं. सर्व मुलं सशाच्या भेदरलेल्या नजरेनं माझ्याकडे पाहत होती. त्यांच्या चेहऱ्यावरील उल्हास मावळून भीतीची छटा पसरली होती. दंशानंतर सर्पाला ग्लानी यावी तसा मला थकवा आला होता. तशातच तास संपला आणि माझा थकवाही !

घरी संध्याकाळी वाचत पडलेलो होतो तोच तो मुलगा आला आणि बाजूला उभा राहिला. त्याला बस न म्हणताच का आला म्हणून विचारलं. तो रडक्या आवाजात म्हणाला, ' माफ करा सर ! माझ्याकडून असली चूक कधीच होणार नाही. सर तुम्ही मला एकच वेळ माफ करा... अगदी एकच वेळ ! ' मी म्हटलं, ' तू वर्गात झोपा काढतोस ? घरी रात्री काय करतोस ?' मग त्यानं सांगितलेली जीवन कहाणी... तो लहान असतानाच वडील वारले. आई अर्धांगवायू झालेली, वयात आलेली बहीण, शिकणारा लहान भाऊ या सर्वांसाठी गिरणीत रात्रपाळी करणारा हा मुलगा आहे. ऐकून माझं मलाच अपराध्यासारखं वाटू लागलं. मी बोललो, 'अशोक, माझीच चूक झाली. मी तुला विद्यार्थी याच नात्यानं बघितलं. तुमच्या परिस्थितीकडं, अडचणीकडं कधीच लक्ष दिलं नाही. किती मोठी चूक झाली माझी ! अशोक, मी तुझा गुरू होण्याच्या लायकीचा नाही रे ! तू ऽऽ तूच मला माफ कर ! ' ' लाजवू नका सर ' असं म्हणून त्यानं डोळे पुसले. लागलीच मी त्याला म्हणालो, ' बघ, हे सारं विसरून जा पण मी तुला असं जाऊ देणार नाही. आज तू माझ्या-बरोबर जेवायला बसल्याशिवाय मला जेवणच जाणार नाही. ' त्याच्याबरोबर जेवताना मला जितका आनंद झाला व जितका जेवलो तितकं कुणाबरोबरही जेवलो नाही.

पोटात एकदम कळ उठली. तिची वेदना सर्व शरीरभर पसरली. ती वेदना सोसवत नव्हती. यमानं आपले पाश टाकून आवळण्यास सुरवात केलेली वाटतेय ! मृत्यू हा अष्टौप्रहर अश्वमेध करणारा विजयी सम्राट आहे. याला जगात कोणीही कधीही अडवू शकत नाही हेच खरं ! लहानपणी रात्री आकाशगंगेकडे पाहतांना वाटत होतं, स्वर्गात जाणारी, फुलांचा सडा पडलेली हीच तर पाऊलवाट नाही ना ! किती सुंदर कल्पना होती मृत्यूविषयी माझी. पण मृत्यूचं खरं अक्राळ विक्राळ रुप समजलं म्हणजे मनुष्य त्यावर तत्वज्ञानाचं सुंदर तलम वस्त्र टाकून त्याचं चुंबन घेऊ पाहतो. आता जगावं अशी इच्छाच राहिलेली नाही. कशाचीही अपूर्णता जाणवली नाही आयुष्यात. सीतेसारखी पत्नी मिळाली. सीतेपेक्षा गडकऱ्यांच्या सिन्धूसारखीच वाटली ती मला. कधी कशाचा हट्ट धरला नाही. दोऱ्यात फुलं ओवावी तसं तिनं आपलं प्रत्येक कृत्य संसाराच्या धाग्यात ओवलं. पंचक्रोशीत आदर्श प्राध्यापक म्हणून मला लौकिक मिळाला. अगरबत्तीच्या वासानं मंदीर भरुन निघावं तसं माझं जीवन विद्यार्थ्यांच्या प्रेमानं गंधित झालेलं आहे. बसमधे स्वतः उठून जागा देणारा, उत्तीर्ण झाल्याबद्दल पहिला पेढा माझ्या तोंडात टाकणारा, एखादं लिहिलेलं पुस्तक अर्पण करणारा, असे कितीतरी विद्यार्थी मला भेटलेत. काही कमी असं आयुष्यात उरलं नाही.

इतक्यात शेजारच्या रुममधून तान्ह्या मुलाचं जोरानं रडणं ऐकू आलं. माझं मन खिन्न झालं हृदयाच्या खोल कप्प्यातील वेदनेचे पडसाद त्या रुममध्ये घुमत आहेत असंच मला वाटलं. आपल्याला मूल नाही म्हणून पुष्पा दुःखी होती हे शल्य हृदयात सलत होतं. पण या आठवणीबरोबर एक गोड आठवण झाली.





त्या दिवशी सकाळी वर्तमानपत्र वाचत पडलो होतो. तोच सलीम दरवाज्यात दिसला. त्याला पाहून मला आश्चर्य वाटलं. पण ते न दाखवता मोठ्या प्रेमानं म्हणालो, ' ये ना आत. ' त्यावर त्यानं एक प्रसन्न हास्य केलं आणि म्हणाला, ' सर थोडं काम आहे तुमच्याशी '. मी किंचित हसून म्हटलं, 'सांग ना!' त्यानं आजूबाजूला पाहिलं व कुणी नाही हे बघून हळूच म्हणाला, ' सर मला पाच रुपये पाहिजे आहेत तुमच्याकडून '. हे ऐकल्यावर माझ्या आश्चर्याला सीमाच राहिली नाही. हा लखपती बापाचा मुलगा माझ्याकडं पाच रुपयाची मागणी का करतो हेच समजेनासं झालं. पण मी आश्चर्य तोंडावर न दाखविता म्हटलं, ' तुला कशाला पाहिजेत ? '. तो म्हणाला, ' सर माझे अब्बाजान मक्केला जात आहेत'. मी मनाशी विचार केला, याच्या अब्बाजानला पाच रुपये कसे काय कमी पडत आहेत ? तो म्हणाला, 'सर तुम्ही आमच्याशी इतक प्रेमानं वागता पण तुम्हाला मूल नाही. म्हणून मी अब्बाजानला मक्केत खुदाजवळ तुम्हाला मूल होण्यासाठी दुआ मागायला सांगितली आहे. पण तुमच्या नावानं पूजा चढविण्यासाठी तुमचेच पैसे पाहिजेत. म्हणून अब्बाजाननं पाठविलं. ' जीवनात इतक्या जवळची मायेची ऊब मी प्रथमच अनुभवीत होतो ' मला मूल नसलं म्हणून काय झालं तुम्ही सर्व माझीच मुलं नाहीत का ! ' इतकं सर्व असून...पण त्याचं माझ्यावरील प्रेम व ईश्वरावरील विश्वास पाहून माझं बोलणं मनातच विरलं. मी नोट काढून दिली व त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे समाधानानं बघत राहिलो.

पुन्हा एकदा एकदम कळ उठली. डोळे ताणले गेले. सर्व हॉस्पिटल गरगर फिरल्याचा भास झाला. कदाचित कुणाच्या तरी पावलांचा आवाज झाला. कदाचित मृत्यूच्या पावलांचा...... छे ! घड्याळात सहाचे टोल पडत आहेत वाटतं ! डोळ्यांना एकदम अंधेरी आली सर्व काही दिसेनासं झालं. हात थरथर कापायला लागले मी तोंड उघडून... हे रा ऽऽ म !

* * *

विजय — बुक डेपो
आकर्षक लग्न-पत्रिका

विजय — विद्यार्थी वाचनालय
S. S. C. ते T. Y. B. A., B. Sc., B. Com.
Texts and Guides.

विजय — प्रिंटर्स
छपाईचे उत्कृष्ट माध्यम

पोलन पेठ, जळगाव.

खास कॉलेज–विद्यार्थ्यांसाठी—

V

भा ग व त

टे ल र

पत्ता– सोसायटी क्लॉथ सेंटरसमोर
बळिराम पेठ, म्युनिसिपालिटीजवळ
जळगाव.

जळगावातील...

प्र ख्या त का प ड दु का न

रामदास आणि कंपनी

भवानी मंदिराजवळ, (फोन नं. १५)

आमच्याकडे—

सर्व पेठांची पातळे, लग्न मौंजीस लागणारे....
सर्व प्रकारचे रेशमी कापड, शालू, खण
आणि रेशमी व जरीची पातळे मिळतील.

किफायतशीर भाव

सर्वोत्कृष्ट, नवीन, गॅरंटीड घड्याळे
मिळण्याचे विश्वासपात्र एकमेव
ठिकाण—

प्रफुल्ल वॉच कंपनी

पंजाब बँकेशेजारी
जळगाव.

अवश्य भेट द्या.



# " तुला काय हवं "

– कु. मंगल धर्माधिकारी
एस्. वाय्. बी. ए.

तू म्हणालास, " तुला काय हवं आज माझ्याकडून ? " अगदी संभ्रमात पडले मी ! काय मागावं याच्याकडून ? आज वाढदिवस आहे, काय घ्यावं याच्याकडून ? साडी ? जास्वंदी रंगाची, सोनेरी धारांची; का कानातले मोत्याचे झुबे ? त्याला नाजुक, सुंदर मोत्यांच्या वेली. कां हातावर रंगणारी मेंदी ? का पुस्तक ? का कविता ? काय काय बरं घ्यावं ह्याच्याकडून ? काही सुचत नाही बाई. किती साधे शब्द ' तुला काय हवं ? ' इतकी का गोंधळले मी !

तुला आठवतं ? मागे तू एकदा म्हणालास... "ए तुझं नाव ' अश्विनी ' का नाही ठेवलं ग ? " किती गोड नांव...हाक तरी किती लाडिक ! 'आशूऽऽऽ'..." यांच्याकडून हे नावच मागून घेऊं का ? छे. आपणहून काय मागायचं बाई ! पण...पण हे कसं शक्य आहे रे ?...मला तुला बंधनात कसं अडकवता येईल ? मी नाही अडकवणार. तू असाच जगावेगळा रहा...तुझं विश्व निराळं...मी नाही येऊ शकत त्यात...आणि...आणि तूं बोलवूं नकोस, खरंच बोलवूं नकोस...तुला नाही म्हणता येत नाही रे मला...

म्हणून काय मी तुझी नाही ?...मी तुझी आशूच आहे...मी लांबून तुझ्याकडे बघेन, सुर्यफुलासारखी...असाच येत जा...तुझ्या स्नेहल दृष्टीतून मला कुशीत शिरल्यासारखं उबदार वाटेल...तुला सांगू मला काय हवं ? तू कवी आहेस... खूप खूप कविता करून स्वत:जवळच ठेवून दिल्यास...वहीमध्ये बंदिस्त करून...तूं समजतोस एव्हढं बाहेरचं जग दुष्ट नाही...तुझा हा खजिना एकदा उधळून दे ना. नव्याच्या स्वागताला जग सदैव सिद्ध असतं...तुझ्या कविता लोक निश्चिच मानतील...खरंच...त्या तशाच सुंदर आहेत...तुझं वेगळंपण त्यांनी मान्य केलंच पाहिजे...ते तुझं नक्की कौतुक करतील. मला तुझ्याबद्दलचा आदर, कौतुक हवं आहे...ही कौतुकाची फुलं मला हवी आहेत. त्याला तुझ्या कीर्तीचा सुगंध आला पाहिजे...देशील मला ही फुलं ?

आणि मी कधी रुसते, फुगते नां, तेव्हा माझी समजूत काढायला, मी रडते तेव्हा माझे डोळे पुसायला, मला धीर द्यायला तुझा प्रेमळ स्पर्श हवा आहे...बस्स ! आणखी काही सुद्धा नको...आणि हो तूं मोठा कवी होणार नां ? मग वेळ नाही मिळणार तुला...पण कधी कधी आपण भेटू ना, तेव्हा तुझ्या चेहऱ्यावर मला आनंदी हास्यही हवं आहे ! ...



# " व सा ण "

– शिवलाल सुकलाल वारी
वी. ए. पार्ट वन

एकट्यानंच केली सुरुवात
लहान रोपटं होऊन
ओसाड गाव वसवायला
दिवस गेले, रात्री गेल्या
वर्षामागून वर्षं गेली...
आता मोठा झाला होता तो तरुवर
नवयौवनात पाऊल टाकलेला
हिरव्या पिवळ्या पानांचे
सुंदर वस्त्र लेऊन
हात पाय डोकं सारं काही झाकून
कुणाची तरी वाट बघत होता तो

त्यालाच शोधत धावत आली
एक लतिका
त्याचा आधार घेऊन त्यालाच जगवायला
त्याची जीवनसाथी होऊन-
दोघांचंही जीवन फुलवायला,
फुलं आली फळंही आली
पण पिकण्याच्या आतच...
कुठल्यातरी वादळानं
कच्चीच... तशीच...
फळं तुटून पडली

तरुवराची प्रिय लता
सोडून गेली त्याला कायमची
बळी होऊन,
आता मात्र तो तसाच उभा आहे
आपली काठी शोधीत
त्याच्या देहावरच
हिरवेपणही जीर्ण झालं आहे
उघड्या जखमांतून वाहून गेला आहे
जीवन रस

त्याच्या मुळ्या खोल गेल्या आहेत
त्याला शोधायला
वेलीनं गाळलेल्या
शेवटच्या अश्रूंच्या पावलावरुन
पावलं टाकीत
कोरड्या डोळ्यांच्या कोपऱ्यातून
तो तसाच बघतो आहे
स्वतःच फुलवलेली फुलं
गळून पडलेल्या फळांचे
अदृश्य झालेले रंग
हरवलेल्या सुखाच्या सफेद सावलीत
कुठंही नाही दिसत
विसावलेली एखादी पाकळी
उष्ण वाऱ्यानंच करून घेतला आहे
सुगंधी अत्तराचा बोळा
विरह आणि विनाशाच्या
कानात घालायला...
त्याचं मस्तक...
कानशिलंही गरम झाली आहेत
दुरूनच त्याला दिसत आहे
निर्व्याज सुखसमाधानाच्या
आयुष्याच्या ढासळलेल्या
सुवर्णमंदिराचं धुळीनं माखलेलं शिखर
एकाकी...उजाड वनात...
दुःखाच्या दरीत स्वतःच्याच मुळ्या
खोलवर जात आहेत
गाव उठलं तरी
मागे उरलेलं
वसाण बघायला
उरलेलं वसाण बघायला...



# पलभरके लिए ......

– कु. मंगला रामदास चौधरी
P. D. Com.

रविवार असल्याकारणानं आज ऑफिसला सुट्टी होती. म्हणून मी विशेष खुषीत होतो. कारण रोजचेच ते चार वाजता उठून डबा घ्यायचा, गाडी पकडायची, भुसावळला जायचं, मान मोडेपर्यंत काम करायचं– आज ह्या सर्वांनाच सुट्टी होती. म्हणून मी आठ वाजेपर्यंत लोळतच पडलो होतो. तितक्यात मातोश्रींची " बंड्या " म्हणून जोरानं मारलेली हाक व दाणदाण वाजत असलेल्या पावलांची चाहूल ऐकून मी त्यांचा रोख ओळखला व शेवटी आलिया भोगासी असावे सादर असं म्हणून उठलो.

मुखमार्जन झाल्याबरोबर पुढ्यात गरमागरम कॉफी, व बटाटेपोहे येताच, " आज काय ? " या प्रश्नार्थक दृष्टीनं मी आमच्या मॉसाहेबांकडं पाहताच " अगोदर खाऊन तर घे, मग सांगते " असं म्हणून माझे पोहे संपत नाहीत तोच तिनं माझ्या पुढ्यात पिशवी व पैसे देऊन " भाजी घेऊन ये " असं सांगितलं. तेव्हा सायकलवर टांग मारुन मी बाजाराचा रस्ता गाठला. बाजारातच चाळीतले गंप्या, दिन्या, नान्या, वगैरे ' जिगरी दोस्त ' भेटले. तेव्हा भाजी खरेदी करुन त्यांच्यात सामील झालो.

रस्त्यात आमचा क्रिकेटपटूंविषयीचा वाद रंगात आला असता, एकदम दिन्यानं ' शू ऽऽ ' करून सर्वांना चुप बसविलं. मी काही बोलणार इतक्यात त्यानं समोर दृष्टिक्षेप टाकला. त्याच्या दृष्टिक्षेपाच्या अनुरोधानं पाहतो, तो एक काळ्या रंगाची साडी व तसलाच मॅचिंग ब्लाउज घातलेली एक तरुणी आमच्या पुढं होती व वेणीचा शेपटा उडवीत मोठ्या तोऱ्यानं जात होती. ते पाहताच दिन्यानं ' हाय् ' केलं; गंप्यानं आवाज काढला; दिन्यानं ' ए मेरी दिलको धडकन् ' असं म्हटलं तर अस्मादिकांनी ' कानमे झुमका, चालमे ठुमका, कमरपे चोटी लटके ' अशी ललकारी मारताच तिनं आमच्याकडं पाहिलं. तितक्यात नान्या– ' का रे इतक्या सकाळी गॉगल लावलास ? ऊन फार लागतं वाटतं ? ' असं मला म्हणताच ती आमच्याकडं रागारागानं पाहत फणकाऱ्यानं निघून गेली. पण हा नेहमीचाच सराव असल्यानं त्याचं आम्हाला काहीच वाटलं नाही.

दुसऱ्या दिवशी मी ऑफिसला जाण्यासाठी घरातून बाहेर पडलो. ऑफिसला तसं उशीराच जायचं होतं. पण अमळनेर यायला अवघा ७-८ मिनिटांचाच अवधी होता. म्हणून मी घाईघाईतच चालत होतो. तोच मला ती चौधरी हॉस्पिटलपाशी दिसली. मी पुढं चालायला लागलो; परंतु एकदम मागे वळून पाहताच तो माझ्याकडंच पाहत असलेली मला दिसली. आलेली संधी घालवण्याइतका मी हा नसल्यामुळंच तिच्याकडं गेलो व " कालच्या घोडचुकीबद्दल (!) क्षमा करा" असं म्हटलं. तिनं ' अं ऽऽ त्यात काय ?' असं म्हणताच पोरगी बरीच सरावलेली दिसते असं म्हणून अस्मादिकांनी स्टेशनकडं रस्त्यानं जायचं सोडून तिच्याबरोबर चालू लागले.

तिच्या कॉलेजच्या व माझ्या आफिसच्या गप्पा चालू असतानाच ' आनंद ' हॉटेल पर्यंत आम्ही

आलो. ' तुझी हरकत नसेल तर आनंद हॉटेलमध्ये जाऊ या का ? ' असं मी विचारताच तो थोडीशी लाजली परंतु पुढं चालायला लागताच मी तिचा रुकार समजलो.

नंतर रोजच असं घडू लागलं. ती रोज वेगवेगळ्या रंगाच्या साड्या व गॉगल लावून नेमकी ' कुठेतरी ' जायच्या गर्दीत असायची व अस्मादिक देखील गाडीच्या वेळेच्या अर्धा पाऊण तास अगोदर निघायचे. अर्थात तो अर्धा पाऊण तास कशाकरता खर्च होत असे हे माझ्या रसिक मित्रांना सांगणे न लगे. कारण 'आनंद' हॉटेलचा मालक आता आमच्या चांगलाच ओळखीचा झाला होता व त्याच्याबरोबरच स्टेशनरोडवरील हॉटेलमालकही चांगल्याच परिचयाचे झाले होते.

अशाच एका रविवारी आमच्या दोस्त मित्रांची बैठक भरली. अर्थात त्यांना अस्मादिकांच्या भानगडी-बद्दल कल्पना होतीच. तेव्हा सभेचा विषय कुठला हे सांगायलाच नको. 'काय यार ! मारु पोरगी पकडली हं' असं गंप्यानं म्हणताच ' भाग्यवान आहे बेटा ' इति नान्या. नान्याचं बोलणं संपत नाही तोच दिन्यानं आमची भानगड अथपासून (इति तोपर्यंत नव्हती) सांगावयाचा आग्रह धरला. अर्थात त्याचा हा ठराव तावडतोब मंजूर करण्यात आला व गंप्यानं ' काय रे प्रथम भेटीत काय गप्पा झाल्या ! ' असं म्हणताच 'क्या बोल दूं यार ! '

' दिल ने तडपके कह दी, दास्तान दिल की,
होठ तो हिले नही और बात भी कर ली '
इति आस्मादिक.

' वाह्, वाह्, माशाल्ला ! अजि बात तो नही की, लेकिन तस्वीरे तो होगी '। इति दिन्या.

' दिल के आईने मे है तस्वीर यार,
जरा गर्दन झुका लूं तो देखलूं। '

गप्पांमधे बराच वेळ गेल्यामुळं मी उठताच सर्वांनी ' काय रे कुठं जायचंय वाटतं ? वेळ झाला का ?' वगैरे प्रश्नांनी मला भंडावून सोडलं. पण त्या प्रश्नांनी लाजायला मी मुलगी नसल्यामुळं सर्वांच्या प्रश्नांना सावकाश उत्तरं देऊन त्यातून निसटलो...

शनिवारी नेहमीप्रमाणं जात असतांनाच तिला हळूच विचारलं, ' राजकमलला उद्या ' जॉनी मेरा नाम ' लागतोय, तुझी हरकत नसेल तर !... 'इश्शं त्यात कसली आलीय हरकत ? ' असं मधुर वाक्य ऐकताच तब्येत खुष झाली. परंतु मी ६ ते ९ च्या ' शो ' ला जायचं म्हणताच तिनं नकार दिला व शेवटी पहिल्याच म्हणजे सकाळी ९ ते १२ च्या शोला जायचं ठरविलं.

दुसऱ्या दिवशी मी ६ वाजताच जागा झालो. तो आई माझ्याकडे डोळे फाडफाडून पाहू लागली. परंतु ते लक्षात यावयास मी शुध्दीत असेन तर ना ? मी तावडतोब उठलो, तोंड धुतलं. आरशात पाहिलं तो दाढी थोडी वाढलेली दिसताच मी जवळ जवळ एक तास दाढी करण्यात घालवला. दहा दहा वेळा साबण लावून आंघोळ केली आणि हे सर्व करीत असतानाच ८। वाजून गेले. शेवटी सर्व तयारीनिशी ८॥ वाजता 'पलभरके लिए कोई हमे प्यार कर ले !' हे गुणगुणत बाहेर पडलो तो समोरच्या गॅलरीत दिनूकाका शेजारच्या कुळकर्ण्यांना डोळे मिचकावीत म्हणाले, " काय अप्पा, आज राजकमलला कुठलं नवीन पिक्चर लागलय ? " मी आश्चर्यानं स्तंभित झालो. तितक्यात आठवलं की काल नीलिमा— हो तिचं नाव नीलिमाच बरं का— काल नीलिमाशी बोलत असताना कोणीतरी खोकलल्याचा आवाज आला होता. परंतु कदाचित भास असेल म्हणून मी त्याकडं दुर्लक्ष केलं. होतं पण मी दिनूकाकांना डरणारा थोडाच होतो ? मनातल्या मनात लंबोदर अप्पांना व बोचऱ्या तोंडाच्या दिनूकाकांना एक इरसाल शिवी देऊन मी निघालो.

रस्त्यातच माझी नीलिमा भेटली. आज 'अबोली' होऊन आली होती. आम्ही बरोबरच टॉकीजमधे गेलो. परंतु पिक्चर सुरु झालं तरी तिनं गॉगल काढला नाही याबद्दल मला आश्चर्य वाटलं. परंतु आजकालची फॅशन आहे, आणि जर तिला त्याबद्दल विचारलं तर ती आपणास बावळटच ठरवील असा विचार करून मी तिला गॉगलबद्दल काहीच बोललो नाही. इंटर्व्हलमधे ऑरेंज-ज्यूस, खारे शेंगदाणे वगैरे घेतल्यामुळं रिकाम्या खिशानिशी परंतु ' भरल्या दिलानं ' घरी परतलो.

नंतर जवळजवळ आठ दिवस आमची भेटच झाली नाही. कारण रोज ऑफिसला उशीर होत असल्यामुळं व २–३ दिवस दांडी मारल्यानं नोकरीवर गदा येण्याची पाळी होती. म्हणून आठवडाभर लवकरच जावं लागत होतं. शेवटी रविवारी मी तिच्या घरावरुनच मार्केटला जायचं ठरविलं. तिच्या घराजवळून जात असतानाच ती बागेतच फुलं तोडत असलेली पाठमोरी मला दिसली व आश्चर्याचा धक्काच बसला. रोज पाठीवर रुळणारा लांब–लचक शेपटा नसून तिची वेणी म्हणजे उंदराची शेपटी होती. पण हा धक्का गिळून तिला हाक मारण्यासाठी मी बागेच्या फाटकाकडं जात असतानाच तिनं मागं वळून पाहिलं. माझं डोकं गरगरु लागलं व मी आता हार्टफेल होऊन पडतो की काय असं मला वाटू लागलं कारण तिच्या केसातील गुलाबाचं फूल तिचं केसाचं सौन्दर्य खुलवीत होतं पण डोळ्यातील जाईचं फूल मात्र एक रहस्य प्रकट करु पाहत होतं... ते पाहताच माझ्या डोळ्यापुढं अंधारी येऊन मी पडणार इतक्यात मला ' बंड्या ' अशी हाक ऐकू आली व दिन्यानं मला सावरुन धरलं. घडलेला प्रकार त्याच्याही लक्षात आला होता. परंतु कसंबसं हसू दाबीत जवळजवळ हात धरुनच त्यानं मला घरी आणलं आणि आमच्या मॉसाहेबांना पटकन् अंथरुण घालावयास सांगितलं. बिचाऱ्या आईनं घाईघाईनं अंथरुण घातलं. दिन्या पुढं म्हणाला, ' अहो काकू, रस्त्यात याला माल्ट्रकचा धक्का बसल्यामुळं तो खाली पडला; परंतु केवळ तुमच्या व्रतवैकल्यानं त्याला साधं खरचटलं सुद्धा नाही. असं म्हणून ' अपघाताची ' बातमी सांगण्यास तो गंप्या व नान्याकडं निघून गेला.

नंतर चाळीत हळूहळू ती खमासदार ताजी बातमी पसरली व एकएक जण मुद्दाम माझ्याकडं येऊन ' काहो धक्का फारच जोरदार बसला का ? ' असं विचारीत होता. स्वयंपाकघरात आमच्या मातोश्री देवाजवळ बसून ' संकट निवारण ' केल्याबद्दल देवाला नारळ फोडीत होत्या. मनातल्या मनात मी दिन्याचे शतशः आभार मानले. अजूनही चाळीतील लोकांचं माझ्यावरील प्रेम कमी झालं नव्हतं. अजूनही काहीजण येतच होते व माझी प्रेमानं विचारपूस करुन जाताना दुसऱ्याना डोळे मिचकावून जात होते.

तितक्यात दिनूकाका आले व मातोश्रीही फुटाण्याचा व नारळाचा प्रसाद द्यावयास बाहेर आल्या. तो प्रसाद त्यांनी माझ्या तोंडात घातला व दिनूकाकांच्या हातात देत असतानाच त्यांनी 'काहो ताई प्रसाद कशासाठी' हे विचारताच देवानं आपल्यावरील संकट निवारण कसं केलं ह्याबद्दल त्यांनी मोठ्या अभिमानानं सांगताच दिनूकाकांनी झाल्या प्रकाराचा गौप्यस्फोट केला. त्याचक्षणी मॉसाहेबांचा अभिमान गळून पडला. इतक्या वेळ साश्रु नयनांनी माझ्याकडं पहात असलेल्या आमच्या मातोश्री निखाऱ्यासारख्या डोळ्यांनी माझ्याकडं पाहत म्हणाल्या, ' मेल्या, मग तिला अगोदरच तो ' काळा चष्मा ' काढायला का नाही सांगितलास ? लाज वाटली होय तुला ? ' असं म्हणून एक जळजळीत दृष्टिक्षेप टाकून तरातरा त्या घरात निघून गेल्या. आज विविधभारतीनं सुद्धा माझ्यावर सूड उगवायचा ठरविलं की काय कोण जाणे ! कारण पहिलंच गाणं ' पलभरके लिए कोई...' लागताच मी रागानं रेडिओ बंद केला. पण शेजारच्या घरातल्या कुळकर्णी अप्पांच्या काळ्या व नकट्या सुशीनं रेडिओचा आवाज मोठा केला. त्या गोष्टीला आता जवळजवळ ४–५ महिने होत आले आहेत तरी अजूनही चाळीतले लोक हे गाणं लागताच रेडिओचा आवाज मोठा करतात.

* * * *

## फॅशन

– एन. बी. कुलकर्णी
तृतीय वर्ष, वाणिज्य

एक व्यक्ती रस्त्यावरती
वणवण भटकत जात आहे
अपुऱ्या तिच्या वस्त्रामधून
अंग उघडे दिसते आहे
आणि शहाणे लोक म्हणतात
" ती भिकारीण वेडी आहे ! "

एक व्यक्ती रस्त्यावरतो
इकडे तिकडे फिरत आहे
तंग अपुरे कपडे घालून
अंग–प्रदर्शन करते आहे
परंतु शहाणे लोक म्हणतात
" ती एक फॅशन आहे ! "

येथून तेथून एकच तऱ्हा
संबोधने भिन्न आहेत
' फॅशन ' या नावाखाली
सारे काही ' झाकत ' आहे

## जमिनदोस्त

– नारायण झिपरू फेगडे
पदवी पूर्व, साहित्य

बेजार झालेला ताड
धापा टाकतो
राक्षसी वारा
हातात धरतो
त्याच्या झिज्या,
भेदरून थंडगार होते
गर्द झाडी
पडक्या भितीआड
प्राण पणाला लावून उमटतात
भुकेल्या कंठातले
नि:श्वासाचे मुके शब्द,
जुनाट देहाच्या फांद्या
जरासा दम घेऊन
झिजलेल्या हातांच्या आधाराने
किंचितसा उचलतात वर झोका
उंच जाऊन पुन्हा
जमिनदोस्त व्हायला...

**श्री गणपती स्टोअर्स**
महात्मा फुले मार्केट
जळगाव. [ महाराष्ट्र ]

**दिलखुष कॅप डेपो**
भवानी पेठ, बोहरा मशिदीजवळ,
जळगाव. [ महाराष्ट्र ]

आमच्याकडे
नवीन, सुंदर, आकर्षक व अद्ययावत डिझाइन्सचे रेडिमेड कपडे
छत्र्या, रेनकोट, बुशशर्ट, शर्ट, सूटपॅन्ट, वुलन होजिअरी
व बनियन यांचा भरपूर नवीन स्टॉक मिळेल.





# एक आशा

# एक आधार

– ज्ञानदेव जंगले
टी. वाय्. बी. एस्. सी. (बॉटनी)

सूर्य पश्चिमेला कललेला होता. आकाशातील ढगांचे डोंगर तांबुस गुलाबी झालेले होते. आणि फिसकीच्या काठावरील झाडांच्या सावल्या दूरवर माळरानावर गेलेल्या होत्या. माळरानावरील पायवाट पूर्वेला थेट चंद्रवाडीत जात होती. फिसकी नदीचा खळखळाट, पक्षांची किलबिल व दूरवर टिटवीची टिव्...टिव् यांनी शांतता भंग न होता ती अधिक भेसूर वाटत होती.

फिसकीच्या एका खडकावर कोणी एक व्यक्ती बसली होती. त्या व्यक्तीनं पाणी पिण्याकरिता पाण्यात ओंजळ घातली खरी पण ती पाण्यातच राहिली व तो मनुष्य पाण्याकडं पाहू लागला. केवजीच होता तो. दाढी मिशा वाढवलेला, कमरेला धोतर नेसलेला नि अडवाणी. तो एकसारखा वाहत्या पाण्याकडं पाहू लागला. त्याला त्याच्या बायकोची, गिरजेची, आठवण तर झाली नसेल ना ? दहा वर्षापूर्वी ह्याच फिसकीनं त्याची गिरजा त्याच्याकडून हिरावून घेतली होती. तिचा चेहरा त्याला पाण्यात दिसू लागला आणि तो पुतळ्याप्रमाणं निश्चल झाला. " महद्या सोनीले चांगलं वागिवा आन् तिचं लगीन लव्हकर करा– करशाल नं लव्हकर बोला; माझी शपत तुम्हाला " असं गिरजा बोलत आहे असा त्याला भास झाला. त्यानं पाण्यातून एकदम ओंजळ काढली आणि पाणी न पिताच ताड्कन् उठला नि चालू लागला. तो जसजसा चालू लागला तसतशी त्याची विचारचक्रं फिरु लागली जलदगतीनं, उलटी सुलटी, अगदी सैरावैरा, त्याच्या डोक्याबाहेर पडतील इतकी.

केवजी माळरानावरील पायवाटेला लागला. त्याचं मन सोनीच्या लग्नाचा विचार करीत होतं. सोनी पुरती सोळा वर्षाची झाली होती. गेल्या तीन वर्षापासूनच केवजी सोनीचं लग्न करु इच्छित होता पण देवच दगा देत आला. तीन वर्षांपासून पाऊसच येईनासा झाला. आणि केवजीच्या पाच त्रिघे जमिनीत काय उत्पन्न येणार ! पण या वर्षी केवजीनं जमिनीची अगदी राबून मशागत केली होती. त्याला एक कारण होतं. अज्ञानींची ओढ भविष्याकडे असते ना ! एकदा एक ज्योतिषीबुवा चंद्रवाडीत आला होता आणि त्यानं या वर्षी पाऊस खूप, हंगाम चांगला, लग्नाचे योग, वगैरे कितीतरी गोष्टींचा गावभर ढिंडोरा केला होता. म्हणूनच केवजीच्याच काय पण सर्व लोकांच्या मेलेल्या मनामध्ये आशा. अभिलाषा निर्माण झालेली होती; आणि तीच आशा केवजीचा एक आधार झालेली होती. केवजी गावच्या महारवाड्याला येऊन पोचला. महारवाडा तसा मोठा नव्हता आणि चद्रवाडी तरी केवढी ? पंधरा सोळाशे वस्तीचं खेडं. संधिप्रकाश अजून होता. " केवजी आर केवजी " वेडू महार त्याला हाक मारीत होता. केवजी थांबला. " आवंदा लई काम कऱ्याले लागला बापा तू ! काय लगीन बिगीन कऱ्याचं हाय सोनीचं ?" वेडू म्हणाला. " व्हय रं येळू " केवजी हसला व म्हणाला, " आवंदा तरी कर देवा सोनीचे हात पिवळे. बिचारी गरीब पोरगी. आईची मयाबी भेटली नाय् नि भाऊ हुता तो पन चिवून गेला. वारे वा देवा " वेडू इतकं बोलला नि केवजी आपले डबडबलेले डोळे लपवून चालता झाला. तरी पण वेळूच्या हे लक्षात आलंच.

चंद्रवाडी सर्व शेतकऱ्यांची आणि मजुरांची होती. संध्याकाळी अंधार पडताच सर्वत्र सामसूम व्हायची नि शेतातून थकून भागून आलेले शेतकरी कामकरी चटणीभाकरी खाऊन मस्त डाराडूर झोपी जात.

" सोने ए पोरी सोने " केवजीनं आवाज दिला. "आली बापा, गरम पानी घिवून " सोनी म्हणाली. केवजीनं गरम पाण्यानं खळखळून तोंड धुतलं नि अंगणात टाकलेल्या गोधडीवर बसला. केवजीपुढं उडदाची भाकरी, मिरचीचा लाल गोळा व कांदा आला पण आपण ढवळ्या पवळ्याला वैरण घातली नाही याची आठवण येताच तो तसाच उठला नि अगोदर बैलांना वैरण घालून जेवणास बसला. जेवण आटोपल्यावर तो तेथेच गोधडीवर आडवा झाला नि सोनी पण जेवण झाल्यावर झोपी गेली.

जेव्हा सर्व गाव झोपलेला असायचा तेव्हा फक्त लालाजी शेट व त्याचा मुनीम धरमचंद कागदपत्र चाळीत बसत. कुत्रे मधूनच रडण्यासारखा भयानक लांब आवाज काढीत तर केव्हा भो-भो असा कर्कश आवाज काढीत असत.

मधूनमधून आकाश काळ्या ढगांनी भरू लागलं पण पाऊस मात्र पडत नसे. केवजी निराश होऊ लागला आणि अशातच एकदा सोसाट्याचा वारा सुटला. कुणाची छप्परं, टपरं उडाली, रस्त्यावर मोडक्या तोडक्या टोपल्या गरागर फिरू लागल्या. झाडं सो सो करून सळसळू लागली. हा हा म्हणता पांढरे ढग काळेकुट्ट झाले. विजांचा गडगडाट होऊ लागला. चंद्रवाडीत थंड हवेची लहर आली नि पाण्याचे टपोरे थेंब रस्त्यावर नाचू लागले. पाण्या-करिता आसुसलेली माती ओली चिंब झाली आणि केवजीचं मन फुलून उठलं. केवजीनं आपली पाच बिघे जमीन पेरली. त्यानं या वर्षी जीव आणि जमीन एक केलं होतं.

दिवसामागून दिवस जाऊ लागले. जमिनीतील बीजं इवलीशी कोवळी पानं घेऊन वर मिचकावू लागली, माना मोडून तरातर अंग धरून वाढू लागली. माळरान हिरवं झालं. गाईम्हशी गवत खुरटू लागल्या. लहान वासरं मागचे पाय फेकून शेपट्या उंचावून टुणटुण उड्या मारू लागली.

पिकं गुडघ्यापर्यंत आली खरी पण आता पाणी येईनासं झालं, आकाश स्वच्छ होऊ लागलं. चंद्रवाडीतून धोंड्या निघू लागल्या. गल्लीगल्लीतून " धोंडी धोंडी पानी दे, साय मही पिकू दे " चे आवाज ऐकू येऊ लागले. आणि अंगावर पाण्याचे लोटे खाली होऊ लागले.

केवजी उदास झाला. पिकांना एका पावसाची गरज होती. तो आकाशाकडे पाहू लागला. रात्रीच्या रात्री जागू लागला. सोनी त्याला म्हणायची, " झोपलं नाय का बापा ? आंग दुखताया ? गरम पान्यानं शेकू का ? डोकं दुखताया ? आवषीद वाटू का ? " पण केवजी केवळ बहाणा करायचा. पोरीची समजूत घालायचा नि अंगावर गोधडी ओढून हुंदके द्यायचा.

शेतातून परत येताना आज तो फिसकीच्या त्याच एका खडकावर बसला व पाण्याकडे वळला. तोच " लगीन ठरविलं का महया सोनीचं ? बोला ठरविलं का ? " असे गिरजा विचारत आहे असा केवजीला भास झाला. केवजीचे डोळे पाण्यानं डब-डबून आले आणि त्याचे अश्रू पाण्यावर टपकू लागले. केवजीला दिसणारा गिरजेचा चेहरा नाहिसा झाला. केवजी तसाच उठला नि तरातरा घरी आला. सोनी गरम पाणी घेऊन आली पण केवजीनं हातपाय धुतले नाहीत. सोनीला त्यानं छातीशी कवटाळलं व तो तिला म्हणाला, " सोने बेटी, तुहं आवंदा लगीन कऱ्याचं बरं. " " पन बापा, आवंदा पानी येत बी नाय मंग पैसा कुठून येनार ? आन मोठा हुंडाबी लागतो लगीन कऱ्याले " सोनी म्हणाली. " लई नदान पोर हाय तू. सोने आपली पाच भिगे जमीन का गेली चलीत, ती... बरं तू जप आता." इतके बोलून केवजी पण झोपला—न जेवताच.

केवजीला हंगाम जेमतेमच पोटापुरता झाला. पण त्याच्यापुढं सोनीच्या लग्नाची समस्या नव्हती. कारण तो आपली पाच बिघे जमीन लालाजी शेटजीला कर्जात लावणार होता आणि मिळणाऱ्या दहाबाराशे रुपयात सोनीला, आपल्या एकुलत्या एक पोटाच्या गोळ्याला, बंधनात बांधणार होता. केवजीला आयुष्यात दोनच लेकी लाभल्या होत्या. एक शेती नि दुसरी सोनी. त्यानं दोघांवर मनापासून प्रेम केलं. ह्या म्हातारपणात केवजीला दोघीही हव्या होत्या. एक सहारा म्हणून एक आधार म्हणून. पण आता दोघीही दूर जाणार होत्या. फार दूर— केवजीला एकटं करून. केवजीची एक लेक शेती, परोपकारी होती तर दुसरी लेक सोनी, स्वार्थी होती. छे ! सोनी स्वार्थी कसली तिला दुनियेच्या चालीनं मतलबानं स्वार्थी बनवलं होतं. केवजीला शेती सोनं देणारी तर सोनी सोनं नेणारी होऊन बसली होती. एक आपल्या कर्त्याला मुकणारी, मायेपासून पारखी होणारी केवजीच्या रोमारोमात भिनलेली निर्जीव वस्तू होती तर दुसरी सौंदर्यानं मुसमुसलेली पण सुशील, गरिबीचं वरदान लाभलेली पण मनानं श्रीमंत, अशी सजीव मूर्ती होती.

अशीच एक दाट अंधारी रात्र होती. चंद्रवाडी काळोखात अगदी शांत झोपी गेली होती. दूर कोठे-तरी कुत्र्यांचे रडके आवाज काळोखाला अधिकच जागृत करीत होते. मधूनच घुबडांचे घुत्कार तर कुठे वटवाघळाची फडफड कानावर येत होती. अशा स्थितीत एक व्यक्ती अंधारातून अंधाराकडेच रस्त्या-वरून सरकू लागली. पायांचा वेग जड पण चोरपावलांचा होता. ती व्यक्ती आता सरकू लागली होती थेट लालाजी शेटच्या घराकडे. की जीवनाच्या......

* * *

## शापित

– प्रकाश हरताळकर
द्वितीय वर्ष, कला

मन बुडाले धुक्यात
नव्हता स्पर्श स्पर्शात
ना आकार... ना भावना
मनाच्या काळोखांतून सुटली
काळी हत्तीण मोकाट... !

नव्हे छाया, नव्हे माया
माझे नाही उरले आभाळ...
मीच माझे भक्ष्य...अन्
शापित मी ! उ:शापलेला
आला धावत काळ...!!

## हरवलेला क्षण

– संजय भेंडे
F. Y. B. Com. (A)

हरवलेला एखादा क्षण
कधी कधी सापडतो
चटका लावून परत
दूर निघून जातो

हरवलेले सापडते कधी
परत हरवण्यासाठी
हरवून जातो जीव
पोळून निघण्यासाठी

जाळून टाकणारे क्षण
जपून ठेवले जातात
धुमसत राहून कायम
धुगधुगी तेच ठेवतात

## रंग....

डोळ्यात रंगवून गहिरे रंग
झालीस तू स्वप्नात दंग

पण...... एक मात्र विसरू नकोस
स्वप्नातल्या जगात गुरफटू नकोस.

या जगात... डोळ्यातले रंग डोळ्यातच राहतात
संसाराचे रंग भंगून जातात

कारण...... स्वप्नातले जग सत्यात उतरत नाही
सत्यातले जग स्वप्नात बसत नाही

हाय !...... महद् अंतर असते दोन्ही सृष्टीत
नि एकमेकांच्या समविरोधी गोष्टीत

पण...... असते कुणाला याचे भान ?
डोळ्यातले रंग भासतात छान !

पण जेव्हा... हेच रंग येतात
समाजात प्रतिष्ठा बनून
तेव्हा रंगविणारेही जातात
त्यात भस्मसात होऊन !

## शब्द–

– भीमराव शिरसाळे
एफ्. वाय. बी. कॉम

शब्द......
सुविचारी
अंतः करणात
भिडणारे
हृदयात जाऊन–
मिळणारे

शब्द......
नालायक
हवेत उडणारे
वातावरण
कलुषित करणारे

शब्द......
कोमल

शब्द......
मारक
शब्द तारी
शब्द मारी


रेडिमेड कपडे घ्यावयाचे म्हटले की—
कॉलिटीचा विचार येतो
आणि पहा

**फिरके ब्रदर्स**

चेच नाव लक्षात येते,

* वुलन जरकिन्स् * कश्मिरी कोट
तसेच लेटेस्ट रेडिमेडकारिता—

**फिरके ब्रदर्स**

म. फुले मार्केट
दुकान नंबर ९९
जळगाव.

मफतलाल ग्रुप रेडिमेडचे
अधिकृत विक्रेते




# गुलमोहर

– कु. मिनाक्षी मांडे

कां कुणास ठाऊक – पण माझ्या मुलानं नितीननं– तो प्रश्न विचारल्यापासून मी बेचैन झाले होते. खरं म्हणजे मी सुद्धा गेले तीन दिवस तो प्रसंग पहात होते परंतु त्याला जाणिवेत टिपून घेण्याचा प्रयत्न कधीच केला नव्हता. तरीही वेळ मिळेल तेव्हा, उत्कटतेनं म्हणा किंवा औत्सुक्यानं म्हणा त्या घटनेभोवती माझं मन रुंजी घालत होतं आणि मोठ्या आधाशीपणानं मी सुद्धा ते दृश्य एकटक पाहत होते.

सुमारे तीन दिवसापूर्वीची ती जळजळती दुपार होती. सकाळचं सारं काम आटोपून मी नुकतीच लवंडले होते. जरा डोळा लागत आला; तोच धावत धावत नितीन आला आणि मला गदागदा हलवीत म्हणाला, 'आई ! पाहिलछ का आमी काय आनलय ते ?' त्याच्याकडं फारसं लक्ष न देता मी त्याला दटावलं आणि खेळायला पाठवून दिलं. १०-१५ मिनिटं होत नाहीत, तोच पुन्हा नितीन मघासारखाच घाईघाईनं आला. आणि 'आई ! थोलंसं पानी देना गं !' असं म्हणाला. त्याच्या त्या स्वरात थोडासा आर्जव होता. मी कुरकुरत उठले. खरं म्हणजे मी अक्षरशः वैतागले होते. पण नितिनची एवढी धावपळ कशासाठी चालली आहे, ते बघायचं मी ठरविलं. त्याला एका वाटीत पाणी देऊन पाचच मिनिटांनी मी बाहेरच्या खोलीत डोकावलं. नितीन एका चिमणीच्या छोट्या पिलाला पाणी पाजण्यात गर्क झाला होता. त्याच्याच वयाची सर्व बालगोपाल मंडळी त्याच्याभोवती गोल बसून अधीरताही नाही व उत्सुकताही नाही– एका वेगळ्याच स्नेहानं ओथंबलेल्या डोळ्यांनी त्या पिलाकड पाहत होती.

" नितीन, हे रे काय ? कुठून आणलंस हे पिलू ? त्याच्या आईपासून त्याला दूर आणल्यावर देवबाप्पा तुला शिक्षा नाही कां देणार ? " मी त्याला समजावून सांगितलं. पण माझं वाक्य संपायच्या आतच नितीननं स्पष्टीकरण केलं, "नाई काही आई, देवबाप्पा मला बक्षीसच देईल." मला जरा आश्चर्यंच वाटलं. त्या भरातच मी त्याला विचारलं, 'हे रे कसं ?' त्याच्याकडून मला कथा कळली ती वेगळीच. एक चिमणीच छोटं पिलू झाडावरुन खाली पडलं होतं आणि त्याच्या आईला त्याला झाडावर उचलून नेणे शक्य नव्हतं. त्यामुळे ती फक्त त्याच्याभोवती घिरट्या घालण्यापलिकडं काहीच करु शकत नव्हती. शेवटी नाइलाजानं, अगतिक होऊन, त्रासून, एकदा चिवचिवाट करुन ती घरट्याकडं इतर पिलांची काळजी घ्यायला निघून गेली. मग नितीननं त्या पिलाला घरी आणलं होतं. काही वेळानं त्या पिलाची आई चोचीत काहीतरी घेऊन आली. मी नितीनला पिलापासून बाजूला केलं. संधीचा फायदा घेऊन चिमणीन छोट्या पिलाच्या चोचीत घास भरविला आणि ती भुर्रकन् उडून गेली. गेले दोन तीन दिवस हा क्रम चालू होता. नितीननं मला प्रश्न विचारला होता, " आई ! एवढी मी त्या पिलाची काळजी घेतो तरी त्याची आई सुद्धा त्याची काळजी घेतेच ! इतकं कस गं तिला कळत नाही ? " " अरे ती त्याची आई आहे नां शेवटी ! तिला काळजी वाटणारच ! मी नाही कां माझ्या बाळाची काळजी घेत ? असं म्हणून मी नितीनच एक गालगुच्चा घेऊन छानसा गोड पापा घेतला. खरं म्हणजे नितीनचा प्रश्न अगदी साधा होता. पण नकळतच त्यानं माझ्या मनात खळबळ उडवून दिली होती. होय ! मी नितीनची आई होते, मला त्याची काळजी होती. प्रत्येक आईलाच काळजी असते. प्रत्येक आईलाच माया असते. मग माझी आई 'आई' नव्हती का ? प्रत्येक आईला कां तिला माझ्याबद्दल माया नव्हती ? प्रत्येक आईला

आपल्या मुलाबद्दल असणारे स्वाभाविक प्रेम तिला माझ्याबद्दल कधीच वाटलं नसेल का? माझ्या विचारचक्राची धाव पुढे पुढे धावत होती.

× × × ×

अनाथाश्रमात वाढलेली, अनेक अनुभव लहान वयातच घेतलेली, तरीही केवळ अनाथाश्रमातील म्हणून जगानं जिच्याकडं फक्त सहानुभूतीच्या दृष्टीनं पाहिलं आहे, अशी मी मुलगी ! कुणाशीही बोलताना, बोलणाऱ्या व्यक्तीच्या स्वरातला करुण भावनेचा गडदपणा मला नेहमीच जाणवे. तोच नेमका मला नको असायचा ! वारंवार का मला सर्वांनी सहानुभूती दाखवावी ? का माझ्याशी कुणीच इतराशी बोलतात तसं बोलू नये ? या जगांतील लोकांशी मी फारसे संबंध ठेवलेले नाहीत केवळ कारणपरत्वे येतील तेवढेच ! माझे जवळचे संबंध आहेत ते फक्त माझ्या जगातल्या लोकांशी–निसर्गातल्या ! पशु-पक्षी माझ्याशी बोलतात. वृक्षवेली माझ्याकडं पाहून हसतात. लुकलुकणारी चांदणी कसलातरी गहन संदेश मला देत असते. चांदण्याचं आकंठ पान करीत असतांनाच मी चंद्राशी बोलण्यात गढलेली असते.

तशी मी दिसायला फार सुंदर नाही. चेहरा मात्र मोहक, लोभसवाणा आहे. पण त्यावरही पुष्कळदा कारुण्याची छटाच विलसते. वागण्यातही मी फारशी अवखळ नाही. जसं परिस्थितीनं मला घडविलं तशी मी घडले आहे. ‘परिस्थितीची गुलाम’ अशा शब्दात माझं वर्णन केलं तर ते फारसं चूक होणार नाही. मी बी. एड पर्यंत शिक्षण घेतलं आणि आश्रमचालकांच्या परवानगीनं तेथेच शिक्षिका म्हणून नोकरीस लागले. कोणत्याही गोष्टीचा सारासार विचार करण्याची पात्रता माझ्या बुद्धीला आता आली होती. त्या लहान लहान, गोजिरवाण्या मुलांकडं पाहून माझ्या मनाला आल्हाद वाटे. कधी कधी मनात यायचं, ‘ मी जर शिक्षिका नसते तर ही हसरी मुलं, हे निष्पाप गोड चेहरे, माझ्या दृष्टिपथात कशाला आले असते ? ’ पण लगेच या विचाराची दुसरी बाजूही डोळ्यापुढून तरळून गेली. ही निरागस, निष्पाप मुलं उद्या मोठी झाल्यावर या व्यवहारी जगात वावरतील आणि त्या क्षणी माझ्यासारखेच अनुभव यांना आले तर ?... तर या मुलांना काय वाटेल ! त्यांची संवेदनाक्षम मनं काय म्हणतील !

खरं तर त्यांच्या आयुष्याचा विचार करण्याची मला आवश्यकताच नव्हती. पण लहानपणापासूनच मनाला विचार करण्याची एक सवयच जडलेली आहे. आमच्या अनाथाश्रमाचं आवार खूप विस्तृत आहे. रस्त्याच्या कडेला आवाराच फाटक आहे. आवारातच गुलमोहोराचं एक फुललेलं झाड आपलं लक्ष वेधून घेतं. त्या झाडाखाली बसून रस्त्यावरची गंमत बघणं हा माझा छंदच आहे. मी बघत असते रस्त्याकडं... पण खरं म्हणजे रस्त्याकडे बघतच नसते. कसलेतरी विचार मनात गर्दी करीत असतात...पुस्तकात वाचलेल्या कथेचे किंवा कादंबरीच्या नायकाचे ! त्या गुलमोहराचं आणि माझं अतूट नातं आहे. त्याचे लालसर गुच्छ माझ्या मनाला भुरळ घालतात, मन आकर्षून घेतात. जेव्हा त्या गुलमोहोराला बहर येतो तेव्हा माझ्या मनालाही बहर येतो. त्याच्या फुलांचा लालसर रंग माझ्या हृदयातही भरून रहातो. अनुरक्ततेचाही रंग लाल असतो असा संकेत आहे म्हणतात ! मला प्रत्यक्ष तसा अनुभव नाही. कधीतरी तो अनुभव येईल असा विचारही मनाला शिवला नाही. भविष्याविषयी मी कधीच विचार केला नाही. जीवन ज्याच्या आधारानं उन्मीलित होईल, सुगंधानं दरवळेल, असा आधार मला मिळेल गवसेल असं कधीच वाटलं नव्हतं भविष्याविषयी मी निश्चिन्त होते. समजा एखादे वेळी कुणी गवसले, तरी केवळ मित्रत्वाच्या नात्यापलीकडं इतर विचार माझ्या मनात कधीच डोकावत नसत पुढच्याच क्षणी तर मी त्या व्यक्तीची ओळखही विसरलेली असे.

लहानपणी मुले ऊन-सावलीचा खेळ खेळतात ना, त्यांत ते चांदण्यालाच ऊन म्हणतात. पण माझ्या आयुष्यात मात्र नेमकी याच्या उलट अवस्था होती. उन्हालाच चांदणे समजून माझा जीवनक्रम व्यतीत होत होता. समजायला लागल्यापासून मी माझ्या आईच्या भावनांचाच विचार अधिक करीत होते. जीवनात ज्या गोष्टींचा अभाव असतो, साधारणतः त्याच गोष्टीचा विचार माणूस अधिक प्रमाणात करतो. ती गोष्ट त्याला वारंवार खटकत राहते. हा निसर्गनियमच आहे. खूप विचारान्ती ती माझी ‘ खरी आई ’ असल्याचे मला जाणवले. मुलीचे आपल्याजवळ राहून हाल होण्यापेक्षा अनाथाश्रमात तरी ती सुखानं वाढेल ! अशीच तिची समजूत असेल, नाही का ? त्या दिवशीही असाच विचार करीत गुलमोहराकडं पाहत मी जरा विसावले होते. तोच जवळून आवाज आल्यासारखा वाटला “ नमस्ते... ओळखलंत ! ” मी झट्कन मागं वळून पाहिलं. चेहरा ओळखीचा वाटत होता पण नाव मात्र काही केल्या आठवत नव्हतं. तो अनोळखीपणा लपविण्याचा मी प्रयत्नही केला नाही. “ जरा आपल नाव... ” माझं वाक्य पूर्ण होण्याच्या आतच प्रश्नाला उत्तर मिळालं होतं, ‘ डॉ. सुधेश ’. होय ! हे डॉ. सुधेश कधीकधी मुलांना तपासायला येत असत. नुकतेच M. D. झाले होते. स्वभावानं सुद्धा मनमिळाऊ असल्याचं मी ऐकलं होतं. माझी आणि त्यांची फारशी, म्हणजे बोलण्याइतपत सुद्धा, कधी ओळख नव्हती. कधीतरी पाहिलं असेल एवढंच ! पण आज ते माझ्याकडं पाहुणे म्हणून आले होते. त्यांचे आदरातिथ्य करणं मला भाग होतं मी त्यांना रूमवर चलण्याविषयी आणि चहाबद्दल आग्रह करताच ते म्हणाले, “ एवढं आकाशाचं विशाल निळं सौंदर्य सोडून खोलीत काय स्वारस्य आहे ? खाण्यापिण्यातच काय मजा आहे ? बसा ना ! आपण येथेच थोड्या गप्पा मारू. ” डॉक्टर असूनही त्यांच्यातील सुप्त साहित्यिकाचा पैलू माझ्या दृष्टोत्पत्तीस आला. त्या पैलूनं, मनमिळाऊ स्वभावानं मी पूर्ण भारली गेले. इतरांच्यापेक्षा त्यांच्यात काहीतरी विशेष असल्याचं जाणवलं. पण क्षणभरच ! पुन्हा मी अनाथाश्रमातली मुलगी आहे ही वास्तवता लक्षात आल्यावर मी मनातील विचाराला विंचवासारखं चिरडून टाकलं. डॉ. सुधेश बोलत होते. कदाचित मला सहानुभूती दाखविलेली आवडत नाही हे त्यांना कळलं असावं. त्यांनी सुरुवातच अशी केली, “ मला तुमच्याबद्दल केवळ सहानुभूती आहे असं समजू नका. पण एक गोष्ट विचारली तर चालेल ? तुमच्या भवितव्याचा विचार तुम्ही कधी केला आहे का ? या वातावरणात तुम्हाला प्रसन्न वाटतं कां ? आपलं असणाऱ्या कुणाकरतां तरी झटावं, कुणाकरता तरी त्रास भोगावा हा स्त्रीस्वभावच आहे. तुम्हाला नाही का तसं वाटत ? ” शेवटी हे इतके उच्च विचार सहन न होऊन मी डॉ. सुधेशांची प्रश्नांची मालिका थांबवली आणि एकच, माझ्या मनाला सतत डाचणारा, प्रश्न त्यांना विचारला “ मी, समाजाकडून जिच्याकडं केवळ सहानुभूतीनच पाहिलं जातं अशी अनाथाश्रमातील मुलगी आहे हे तुम्हाला माहीत नाही का ? ” समाजाकडून मिळणारी सहानुभूती वारंवार माझ्या मनाला डाचत होती. जरा बरं वाटलं मला एवढं बोलल्यावर ! नाहीतरी इतक्या जवळचंही मला कुणीच नव्हतं. का मीच जोडून घेतलं नव्हतं हेही मला कळत नाही डॉ. सुधेश गोड हसले आणि स्वतःशीच पुटपुटले, “ फुलाला कधीच स्वतःजवळील गंधाची जाणीव नसते– ती कळते दूरस्थ भ्रमरांना ! स्वतःचं सौंदर्य स्वतःला कधीच कळत नाही. सौंदर्याला हा एक शापच असतो की काय नकळे ! ” नंतर माझ्याकडं वळून म्हणाले, “समजा, समाजाला ठोकरुन तुम्हाला कुणी आपलंसं करण्याचा प्रयत्न केला तर तो यशस्वी होईल ? ”

अर्थ न कळण्याइतकी मी लहान नव्हते. सौंदर्याची कल्पना सापेक्ष आहे. डॉ. सुधेशना माझ्यात सौंदर्य दिसलं होतं, नव्हे त्यानं ते आकर्षित झाले होते. मला सुद्धा त्यांच्या रूपानं परिकथेतला एक राजकुमार गवसला होता– चुकले–गवसला नव्हता तर त्याने मला आपणहून मागणी घातली होती. कधीच न पडलेलं स्वप्न अवचित साकार होऊन माझ्यापुढं उभं राहिलं होतं आणि लवकरच स्वप्न–पूर्तीही झाली. एका सुमुहूर्तावर मी सौ. सुधेश झाले.

× × × ×

जो जीवनपट माझ्या डोळ्यापुढून हळूच पुढं पुढं सरकत होता तो एकदम थांबला. विचारमालिका गळून पडली ती नितीनच्या हसण्यानं ! सहजच समोर लक्ष गेलं तर नितीन अगदी हास्यसागरात पोहत होता. इतकं प्रसन्नतेनं हसताना नितीनला मी प्रथमच पहात होते. त्याच्या या प्रसन्नतेचं कारण शोधण्याची, ऐकण्याची मलाही एकप्रकारे उत्सुकता होतीच ! मी हळूच त्याला जवळ घेऊन विचारलं, ' नितीन ! काय झालं राजा ? ' नितीननं उत्तर दिलं, " आई ! त्या पिलाची आई किनई त्याला भुलकन् उडवून घेऊन गेली. " मला ते ऐकून आश्चर्य वाटलं. कारण पिलू उडून गेलं म्हणून खरं म्हणजे नितीनला वाईट वाटायला हवं होतं पण उलट तो खळखळून हसत होता. नितीनइतकाच मलाही त्या गोष्टीचा आनंद झाला होता. बाळाला त्याची आई मिळाली होती नां ?

नितीनशी दंगामस्ती करण्यात, त्याच्या खेळण्यांशी खेळत खेळत त्याच्या खेळात समरस होण्यात मी आनंद लुटीत होते. " काय नितीन, आई खूप त्रास देतेय नाही तुला ? " या आवाजानं मी भानावर आले. पहाते तो दारात उभे राहून सुधेश नुकताच दवाखान्यातून घरी येऊन माझी आणि नितीनची दंगामस्ती पहाण्यात गर्क झाला होता. हसत होता स्वतःशीच......... मिष्किलपणे खोडकरपणे !

आदर्श सेवा, सचोटी व योग्य भाव
या सूत्रानुसार शून्यातून उभे केलेले...

**वृन्दा बुक डेपो ◎ वृन्दा लायब्ररी**

पंजाब बँकसमोर, महात्मा गांधी रोड, जळगाव.

प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन
पुस्तके व धार्मिक ग्रंथ
व
शालेय स्टेशनरी

एस. एस. सी., प्री डिग्री,
व एफ्. वाय्. आर्टस, सायन्स व कॉमर्ससाठी
अनेक लेखक नवीन आवृत्त्या
विविध प्रकार

**तसेच**

ग्रीटिंग कार्ड्स, व्हिजिटिंग कार्डस व आकर्षक
लग्नपत्रिका







# नाट्याचार्य खाडिलकर

– कु. अलका बक्षी
तृतीय वर्ष, साहित्य

' मम मनी कृष्ण सखा रमला ' –हे पद ऐकताच मराठी रसिक मंत्रमुग्ध होतो. खाडिलकरांच्या ' संगीत स्वयंवर ' ह्या नाटकातील वरील पद हे रुक्मिणीच्या तोंडी आहे. ' स्वयंवर ' मधील किती–तरी पदे आजही लोकप्रिय आहेत. इतक्या वर्षांनंतर आजही मराठी रसिक 'स्वयंवरा 'चे तितक्याच उत्साहाने स्वागत करताना दिसतात. फक्त 'स्वयंवर'च का ? –अशा किती तरी जुन्या परंतु उत्कृष्ट नाट्य–कृतींचे मराठी रसिक मन आजही तितक्याच उत्कटतेने स्वागत करताना दिसते. मराठी रसिक नाट्यवेडा आहे. नाटकाचे रंगभूमीवर नवीन नवीन प्रयोग केले गेले तरी त्याचे मराठी रसिकाकडून सहर्ष स्वागत होत असते. ज्या मराठी रसिकांनी किर्लोस्करांची अद्भुतरम्य नाटके पाहिली त्याच मराठी मनाने खाडिलकरांच्या ऐतिहासिक आणि पौराणिक नाट्य–कृतींचे तितक्याच सहर्षतेने स्वागत केले.

१८४३ साली मराठी रंगभूमीवर पहिले नाटक– ' सीता स्वयंवर ' हे आले. त्याचे लेखक विष्णुदास भावे हे मराठी रंगभूमीचे आद्य जनक होत. परंतु त्यानंतर १८८० पर्यंत मराठी रंगभूमी अंधकारात होती. एकही प्रतिभावान नाटककार पुढे आलेला नव्हता. विष्णुदास भावे ह्यांची नाटके विशेषशी गाजलेली नव्हती. त्यामुळे मराठी प्रेक्षकांचे मन ते आकर्षित करू शकले नाहीत. परंतु १८८० साली एका नव्या ताऱ्याचा रंगभूमीवर उदय झाला आणि मराठी रंगभूमी नाट्यप्रकाशाने उजळून निघाली. १८८० साली किर्लोस्करांचे ' सौभद्र ' हे नाटक रंगभूमीवर आले. त्या पाठोपाठ देवलांचा उदय झाला. १८८९ साली ' मृच्छकटिक ' आणि १८९९ साली ' शारदा ' ही नाटके रंगभूमीवर आली. किर्लोस्कर–देवलांनी ज्या तेजस्वी कालखंडाला प्रारंभ केला त्याला ' वैभवकाळ ' म्हटले जाते. खाडिलकर, गडकरी यांनी पुढे २० वर्षे हा 'वैभवकाळ' चालविला.

खाडिलकरांचे नाट्यलेखन मराठी रंगभूमीवर १८९८ ते १९३६ च्या दरम्यान झाले असले तरी त्यांच्या प्रतिभेच्या ऐन उमेदीचा काल म्हणजे १९०६ ते १९२० हा होय. १९२० सालानंतर जरी त्यांची लेखणी चालू असली तरी त्यात पहिला जोम व रस नव्हता. त्यांनी १८९६ साली ' सवाई माधवराव यांचा मृत्यू ' हे नाटक लिहिले असले तरी नाटककार म्हणून ते मराठी प्रेक्षकांना अज्ञातच होते. परंतु 'कांचनगडची मोहना ' ' स्वयंवर ' ' मानापमान ' अशी एका पाठोपाठ एक नाटके रंगभूमीवर आल्याबरोबर ते नाटककार म्हणून ओळखले जाऊ लागले.

कुशल आणि प्रतिभावान नाटककार म्हणून ते रसिकांना ज्ञात आहेतच. मराठी वाङ्मयाच्या इतिहासातील नाट्यशाखेत खाडिलकरांचे नाव 'एकमेवाद्वितीय' असे 'नाट्याचार्य' म्हणूनच ओळखले जाते. किर्लोस्कर, देवल, खाडिलकर आणि गडकरी ह्यांनी मराठी रंगभूमीवर नाटकांचे वैभवपर्व सुरू केले. तरीही खाडिलकरांइतके मराठी नाट्यलेखन कोणीच केलेले नाही. मराठी रंगभूमीची सेवा अधिक काळ त्यांच्याच हातून घडलेली आहे. १८९६ सालच्या 'सवाई माधवराव यांचा मृत्यू' पासून १९३६ साली संगीत 'त्रिदंडी संन्यास' हे नाटक लिहून नाट्यलेखनातून निवृत्त झाले. खाडिलकर हे 'लोकप्रियतेच्या सिंहासनावर' अधिक काळ बसले होते. म्हणूनच नाट्याचार्य ह्या पदवीला ते पात्र ठरतात.

नाट्याचार्यांच्या ऐन उमेदीच्या काळात कोल्हटकरांचा मराठी रंगभूमीवर फारसा प्रभाव पडलेला दिसत नाही. परंतु त्याच काळात गडकऱ्यांची एका मागोमाग एक नाटके रंगभूमीवर येत होती अणि ती लोकप्रियही ठरत होती आपल्या कल्पना-विलासाने, भाषासौष्ठवाने आणि शाब्दिक कोट्यांनी गडकऱ्यांनी मराठी रसिकांची मने अक्षरश: जिंकली होती. गडकऱ्यांच्या ह्या असामान्य नाट्यलेखनाने कोल्हटकरांची नाटके निष्प्रभ करून टाकली. शिष्याने गुरुवर मात केली ! परंतु गडकऱ्यांच्या संपूर्ण दशकाच्या अलौकिक नाट्य लेखनाच्या काळातही त्यांची नाटके खाडिलकरांच्या नाटकांना निष्प्रभ करू शकली नाहीत. खाडिलकरांकडे गडकऱ्यांचे असामान्य कलावैभव नव्हते, चमकदार भाषाशैली नव्हती, थक्क करणारा कोटिबाजपणा नव्हता, परंतु खरेखुरे नाट्य म्हणजे काय ह्याचा आविष्कार नाट्याचार्यांच्या नाटकात दिसतो. व्यक्तिमनाचे विविधरंगी प्रभावी नाट्य प्रकट करण्याची अतुलनीय शक्ती त्यांच्यात होती आणि अत्यंत श्रेष्ठ दर्जाची वैचारिकता होती. या भक्कम पायावर त्यांची नाटके उभी होती. गडकऱ्यांसारख्या श्रेष्ठ नाटककाराच्या नाट्याचा परिणाम जसा नाट्याचार्यांच्या नाटकांवर झाला नाही. तसाच न. चि. केळकर, वरेरकर, वीर वामनराव जोशी, ह्यांच्या उदयोन्मुख आणि नव्या धर्तीच्या नाटकांचा परिणाम त्यांच्या नाटकावर झाला नाही. वासुदेवशास्त्री खरे यांची ऐतिहासिक नाटके लोकप्रिय होती. केळकरांचे नाट्य लेखन सामर्थ्यशाली नाही तरी नीटस होते. 'तोतयाचे बंड' ह्या नाटकाने प्रेक्षकांचे आणि टीकाकारांचे मन आकर्षित करून घेतले होते.

अनुभव - नाट्याने खाडिलकरांना आकर्षित करून घेतले होते. त्यासाठी पुराणांकडे, इतिहासाकडे त्यांचे मन धाव घेत होते. ह्यासाठी किर्लोस्कर-देवलांपेक्षा शेक्सपिअरच्या नाट्यतंत्राचा त्यांना अधिक उपयोग झाला. खाडिलकरांच्या कुमार वयात किर्लोस्कर-देवलांप्रमाणेच आंग्ल कवी शेक्सपिअर ह्याचा प्रभावही मराठी रंगभूमीवर पडलेला होता. १८६२ ते १८९३ सालापर्यंत शेक्सपिअरच्या गाजलेल्या कितीतरी नाट्य कृतींचे अनुवाद मराठी रंगभूमीवर अवतरले होते. किर्लोस्कर-देवलांच्या नाट्य-लेखनावर शेक्सपिअरचा परिणाम झालेला नाही. देवलांनी 'ऑथेल्लो' चा अनुवाद केला परंतु त्यांचे स्वत:चे नाटक शेक्सपिअरच्या प्रभावापासून दूरच राहिले. खाडिलकरांची नाट्यप्रतिभा किर्लोस्कर-देवल ह्यांच्या नाट्य-प्रतिभेप्रमाणे सरळ मार्गी नव्हती. ती जात्याच गंभीर व काव्यात्म होती. वैचारिकता हा तिचा धर्म होता. घटनांचा अर्थ लावणे, लोकोत्तर स्त्री-पुरुषांच्या व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्ये पाहणे, हा तिचा स्वभावधर्म होता. विशिष्टातून सामान्याकडे जाण्याची प्रवृत्ती शेक्सपिअरची होती. त्यात आपल्या प्रकृतीला साजेसे खाडिलकरांना काही तरी आढळले. विश्वविद्यालयात असताना संस्कृत नाटककारांपेक्षा आंग्ल कवी शेक्सपिअरने त्यांना अधिक आकर्षून घेतले.

खाडिलकरांचे पहिले नाटक-'सवाई माधवराव यांचा मृत्यू' ह्यात शेक्सपिअरच्या नाटकातील दुपदरी वीण दिसते. शेक्सपिअरच्या दोन अत्यंत गाजलेल्या नाटकातील- 'हॅम्लेट' आणि 'ऑथेल्लो' ह्यातील-दोन अत्यंत गाजलेल्या खलपुरुषांच्या व्यक्तिरेखा घेऊन त्या त्यांनी एकाच नाटकात साकार केल्या आहेत. 'हॅम्लेट' ची मनस्वी व्यक्तिरेखा 'माधवरावां'च्या व्यतिचित्रणात आणि 'आयागो'ची आगलावी, खलपुरुषाची व्यक्तिरेषा केशवशास्त्र्यांच्या व्यक्तिचित्रणात रंगवून ती नाट्यकृती यशस्वीपणे त्यांनी प्रेक्षकांपुढे सादर केली. दोन नाटकातील दोन भिन्न व्यक्तिरेखा एकाच नाटकात साकार करणे ही अत्यंत कठीण गोष्ट. परंतु त्यातही नाट्याचार्य यशस्वो झाले. आणि म्हणूनच त्यांच्या ह्या नाट्य-कृतीचे रसिकांनी सहर्ष स्वागत केले.

नाट्याचार्यांच्या नाटकातील पात्रे व त्यांची भाषा ह्यात अभिन्नत्व जाणवते. असे अभिन्नत्व कोल्हटकर-गडकरी ह्यांच्या पात्रांच्या भाषेत आढळत नाही. खाडिलकरांच्या भाषेत जोरकसपणा आहे, ओजोगुण आहे. त्यांच्या नाटकातील पात्रे स्वत:ची भाषा बोलतात. आनंदीबाई, हरिश्चंद्र, रामशास्त्री हे जेव्हा आपली भाषणे बोलायला लागतात तेव्हा ती भाषणे कृत्रिम न वाटता प्रत्यक्ष रामशास्त्री, आनंदीबाई हेच आपल्यापुढे बोलत आहेत असे वाटते. शुक्राचार्य, भीष्मक, हरिश्चंद्र तारामती ह्यांची कारुण्यमय भाषणे मनात अनुकंपा निर्माण करण्याऐवजी त्यातील ओजस्वितेमुळे मनात गंभीर भावना निर्माण करतात ओजोगुण हा खाडिलकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि लेखन-प्रकृतीचा मुख्य गुण असल्यामुळे तो त्यांच्या स्वभावचित्रणात, प्रसंगयोजनेत, वैचारिकतेत भरलेला आहे. आणि तो नाटकातील भाषेतही दिसून येतो. त्यांची भाषा अनलंकृत असूनही जोरकस व नाट्यपूर्ण वाटते ती ह्यामुळे.

नाट्य लेखनाच्या ऐन उमेदीच्या काळात खाडिलकरांचे राजकीय गुरु लो टिळक हे होते. लो. टिळकांचे कर्मयोगाचे प्रभावी तत्वज्ञान, प्रखर राष्ट्रवाद हा खाडिलकरांच्या अध्यात्मप्रवण मनाचा प्रमुख आधारस्तंभ होता. खाडिलकरांच्या प्रतिभेचा खराखुरा आविष्कार ज्यात दिसतो ते लेखन टिळकांच्या व्यक्तित्त्मवाने भारलेल्या मनाने केलेले होते. ह्याचे प्रत्यंतर त्यांच्या 'भाऊबंदकी' ह्या नाटकात यते. रामशास्त्र्यांच्या तोंडी असलेल्या भाषणातून टिळकांची निस्पृहता जाणवते. परंतु १९२० मध्ये टिळकांचे निधन झाल्यानंतर ते मन गांधीवादाकडे वळले. जरी ते गांधीवादाकडे वळले असले तरी टिळकांच्या प्राण-ज्योतीबरोबरच खाडिलकरांच्या लेखणीचा प्रखरपणा विझला. ज्या पुरुषार्थात, वीरवृत्तीत ही लेखणी रमली होती ती जणु दृष्टिपथातून दूर झाली. विशिष्टाला सामान्यत्व देण्याची उमेदीच्या काळातील त्यांची वृत्ती उत्तरकाळात तितकीच जोरकस वा दमदार राहिली नाही.

खाडिलकरांच्या वीरवृत्तीचे, पुरुषार्थाचे दर्शन त्यांच्या अनेक नाटकातून घडते. 'स्वयंवर' मधील श्रीकृष्ण वीर, पराक्रमी आहे. रुक्मी-शिशुपाल ह्यांना पकडण्याचे सामर्थ्य त्याच्या बाहूत आहे. त्याने १७ वेळा रुक्मी-शिशुपालादी राज-मंडळाचा पराजय केलेला असतो. तरीही रुक्मी-शिशुपाल ते अमान्य करतात. म्हणून परत १८ व्या वेळी तो लढण्यास तयार होतो. तो रुक्मी-शिशुपाल ह्यांना पकडतो व रुक्मिणीपुढे आणतो. परंतु रुक्मिणीच्या विनंतीमुळे त्यांना सोडून देतो व त्यावेळी म्हणतो, 'जा, रुक्मी तुझ्या बहिणीने तुला बंधमुक्त केले आहे. जा, शिशुपाला, ह्या त्रैलोक्यसुंदरीच्या कोमल अंत:करणाने तुझ्यावर दया केली आहे. नाजुक अबलांनी लावलेले वेड कठोर वृत्तींना मर्यादित करीत असते.' किती अर्थपूर्ण वाक्य आहे.

मराठी संगीत व गद्य-विशेषत: संगीत-नाटकांच्या ऐन वैभवाचा हा काळ होता. तरीही त्या काळी खाडिलकरांची गद्य नाटके लोकप्रिय ठरलेली होती. खाडिलकरांनी आपल्या आगळेपणाने मराठी नाट्यरसिकाला लुब्ध केले होते आणि आहेही ! 'कांचनगडची मोहना', 'सत्यपरीक्षा', 'सवतीमत्सर', 'कीचकवध' इ. श्रेष्ठ दर्जाच्या व्यक्तिमत्वा-मधील विचारनाट्य आणि त्यांच्या संघर्षातून निर्माण होणारे विचारनाट्य प्रकट करण्यात त्यांची लेखणी रस घेते. नाट्यकलेत वसणारे उद्बोधनाचे, जीवन साक्षात्काराचे सामर्थ्यच मनाची उत्कटतेने पकड घेते.

आणि ते सामर्थ्य खाडिलकरांनी उत्कृष्टपणे रंगविले आहे. ‘कीचक-वध’मधे कीचक व सैरंध्री ह्यांचा वैचारिक संघर्ष उत्कटपणे रेखाटला आहे. तर ‘भाऊबंदकी’ मध्ये सत्यप्रिय, न्यायप्रिय, सत्त्वशील रामशास्त्री आणि महत्वाकांक्षी, सत्ताधारी, सौंदर्याचा गर्व असलेली आनंदीबाई ह्यांचा तीव्र संघर्ष रेखाटला आहे.

नाट्याचार्यांची पूर्वकाळातील गद्य नाटके लोकप्रिय ठरली, तशीच काही संगीत नाटकेही लोकप्रिय ठरली आहेत– ‘संगीत स्वयंवर’, ‘संगीत मानापमान– ‘संगीत विद्याहरण’. परंतु त्यांची उत्तर–काळातील नाटके तितकीशी लोकप्रिय ठरलेली नाहीत. आपले विचार समाजापुढे मांडण्यासाठी, आपल्या गुरूचे तत्त्वज्ञान लोकांच्या मनावर ठसविण्यासाठी त्यांनी ‘संगीत द्रौपदी’, ‘संगीत मेनका’ ह्या नाटकांचे मूळ कथानकच बदलून टाकले आहे. द्रौपदीची महाभारतातील मूळ कथा अत्यंत साधी, व सुटसुटीत आहे. परंतु ह्या कथेच्या द्वारे नाट्या–चार्यांना गांधींच्या अहिंसेचा प्रचार करावयाचा होता. त्यासाठी त्यांनी मूळ कथानकाला नवे नवे रंग देऊन त्याचे स्वरूपच बदलून टाकले आणि ते ‘संगीत द्रौपदी’ ह्या नावाने प्रेक्षकांपुढे सादर केले. ‘संगीत मेनका’ ह्या नाटकाद्वारे त्यांनी गांधींचा शांतिपाठ सांगितला आहे. येथेही मूळ कथानकाचे रूप बदलले आहे आणि मातृसुखासाठी आसावलेली मेनका त्यांनी प्रेक्षकांपुढे उभी केली आहे.

खाडिलकरांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व आणि चारित्र्य ह्यांचा घनिष्ठ संबंध आहे. त्यांच्यातील संवादित्व अत्यंत लक्षणीय आहे. त्यांचा मितभाषी–पणा, प्रखर तत्त्वनिष्ठा, आचार-विचारांची विलक्षण आवड, मनाचे औदार्य, द्रष्टेपणा प्रसिद्धी–पराङ्मुख वृत्ती, आत्मस्तुती आणि परनिंदा ह्याबद्दल तीव्र नावड असे त्यांचे कितीतरी गुण दिसतात. त्याना नाट्य-व्यावसायिकांबद्दल प्रेम, जिव्हाळा वाटत असे. कर्तव्यबुद्धी, विलक्षण चातुर्य त्यांचे ठायी होते. खाडिलकर हे व्यक्तिमत्त्व उग्रप्रकृती व विलक्षण तत्त्वनिष्ठ आहे. त्यांच्या मनाची बैठक अध्यात्म विचारावर होती. त्यांच्या प्रकृतिस्वभावामुळे अवतीभवतीच्या लोकांना त्यांच्याबद्दल दरारा वाटत असे. ह्या स्वभाववैशिष्ट्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व अतिशय तेजस्वी दिसते.



खाडिलकर हे उग्रप्रकृति लेखक असल्यामुळे जेथे सत् आणि असत् ह्यातील संघर्ष रेखाटावयाचा असतो, तेथे त्यांची लेखणी अधिक रमते, प्रतिभा जास्त फुलून येते. नाट्याचार्यांना वीर रसाइतकाच शृंगार रस आकर्षून घेतो. ‘स्वयंवर’ ह्या नाटकातील रुक्मिणी – श्रीकृष्ण ह्यांच्यातील शृंगारवर्णनात त्यांची लेखणी रंगलं आहे. रुक्मिणी ही प्रेमव्याकुळ प्रणयिनी आहे. पण त्याचबरोबर समंजस, चतुर असे तिचे व्यक्तिमत्त्व रंगविले आहे ज्यावेळी श्रीकृष्ण स्वयंवरासाठी येतो तेव्हा रुक्मिणीच त्याला प्रथम पाहते परंतु घराण्याच्या संस्कृतीप्रमाणे तिला आपल्या (भावी) पतीचे नाव उच्चारता येत नाही. पण ती रुक्मीला म्हणते, ‘दादा, ते आले ना ! त्यांना सामोरे नाही का जायचे ? ते आले ना !’, एवढे बोलताच ती गोंधळून, गडबडून जाते. मैत्रिणी–जवळही आपल्या प्रियकराचा उच्चार ती सूचकतेने करते. खाडिलकरांनी अतिशय नाजुक हातांनी ह्या नाट्यकृतीत रंग भरले आहेत. नाटकातील प्रत्येक व्यक्तीला खाडिलकरांनी स्वतःचे असे प्रकृति–वैशिष्ट्य दिलेले आहे. नाट्याचार्यांनी कृष्णाची प्रेयसी म्हणून रंगविलेले रूक्मिणीचे व्यक्तिचित्र अत्यंत विलोभनीय आहे. प्रेमाच्या विशुध्दतेबद्दल, सफलतेबद्दल यथोचित बोलणारी रूक्मिणी, अबला असून सबला बनली आहे. प्रेक्षकांचे लक्ष ती स्वतःकडे आकर्षून घेते. तिच्या सगळ्याच भाषणात खाडिल–करांनी खरीखुरी रसिकता ओतली आहे. त्यात शृंगार रसाला जन्म देणारी नाट्यपूर्ण काव्यमयता आहे. ‘स्वयंवर’ हे खाडिलकरांच्या यशाचा व कर्तृत्वाचा कळस आहे.

परंतु खाडिलकरांना हास्य रस, विनोद तितकासा जमलेला नाही. ‘स्वयंवर’ मधील विनोद मनावर थोडासा परिणाम करून जातो. दिनेश्वर - स्नेहलता ह्यांचा संवाद विनोदी आहे. दिनेश्वर सतत खोटे बोलत असतो. आणि दुसऱ्याने सांगितलेले खरे असेल ते मी माझ्या भविष्याने जाणले असे म्हणतो. स्नेहलतेला तीनदा नमस्कार करायला लाऊन ‘तुझी कवटी उलटी आहे त्यामुळे माझे भविष्य खोटे ठरणार असे म्हणतो. प्रत्यक्षात ते खोटेच ठरलेले असते. कारण शिशुपाल हा स्वयंवराला येणारच असतो. येथील विनोद थोडाफार साधला आहे. परंतु ‘भाऊबंदकी’ ह्या नाटकात नमकशास्त्री–चमकशास्त्री ह्यांच्या संदर्भात निर्माण झालेला विनोद मनावर तितकासा परिणाम करू शकत नाही. परंतु त्यामुळे अखंड गांभीर्याने प्रेक्षकांच्या मनावर निर्माण झालेला ताण थोडासा हलका होतो.



विनोदापेक्षा गंभीर आणि खंबीर विषयातच त्यांची लेखणी रमते. वैयक्तिक सुधारणेमधे त्यांना रस आहे. ‘कांचनगडच्या मोहनेत’ स्वराज्यप्राप्तीचा उपदेश केला आहे. ‘वायकांचे बंड’ ह्यामधे स्त्री–पुरुषांच्या समानतेवर घाला घातला आहे. ‘भाऊ–बंदकीत’ भाऊबंदकीचे इष्टानिष्ट परिणाम दाखविले आहेत. तर ‘कीचक-वधात’ असहाय्य सैरंध्रीच्या दुखावलेल्या मनाच्या समाधानासाठी कीचकासारखा मदोन्मत्त वीर लोळविला आहे. त्यांच्या नाटकाचा प्रतिपाद्य विषयच जिवंत असल्यामुळे नाटक चिरंजीव झाले आहे.

नाट्याचार्यांची बहुतेक नाटके नायिकाप्रधान आहेत. आनंदीवाई, तारामती, मोहना इ. प्रभावी आणि तेजस्वी नायिका आहेत. आनंदी ही व्यक्तिरेखा महत्वाकांक्षेची मूर्तिमंत प्रतिमा आहे. पेशवेपद आपल्या वंशाला मिळावे म्हणून ती वाटेल ते कृत्य करावयास तयार होते. पतीने सत्याचरण सोडू नये म्हणून तारामती स्वतःस विकून घेते. तर राज्य लयाला जाऊ नये म्हणून सरदाराचा वेष धारण करायला लऊन मोहनेला ‘कांचनगडच्या मोहने’त हातात तलवार घ्यायला लावले आहे. तर सैरंध्री आपली इज्जत टिकविण्यासाठी अखेरपर्यंत कीचकाच्या नाटकशाळेत दाखल होत नाही. वेळ प्रसंगी त्याचा रोषही ती पत्करते. रुक्मिणीही प्रेमव्याकुळ प्रणयिनी रंगविली आहे.



कथानकाच्या बाबतीत खाडिलकरांनी स्वतंत्रता, स्वतःची सृजनशक्ती केव्हाच दाखविली नाही. जुने ऐतिहासिक अगर पौराणिक कथानक घेऊन त्यालाच तत्कालीन परिस्थितीचा मुलामा चढवून, त्यात कलात्मकता योजकता, यांचा समन्वय करून ते प्रेक्षकांपुढे सादर करीत होते. तरीही नवीन झिलई दिलेली त्यांची जुनी आख्याने बाजारात येता क्षणीच लोकप्रिय होत होती. उदा. मानापमान, कीचकवध, द्रौपदी, भाऊबंदकी.

खाडिलकरांच्या नायिका प्रभावी, तेजस्वी आहेत, तर त्यांचे नायक वीर, धैर्यशील, पराक्रमी आहेत. राघोबादादा हे आनंदीच्या सौंदर्याला भाळून तिच्या हातातील बाहुले बनले असले तरी ते पराक्रमी राघो भरारी आहेत. त्यांनी अटकेपार झेंडे नेऊन लावले आहेत. कीचकवधात महापराक्रमी कीचक आहे सत्त्वपरीक्षेत सत्यशील, स्वप्नात दिलेल्या वचनाचाही भंग न करणारा हरिश्चन्द्र आहे. तर स्वयवरामध्ये राजमंडळाला १७ वेळा पराभूत करणारा कृष्ण आहे.

खाडिलकरांची नाटके पहात असताना आपण जणू काही त्या कालखंडात वावरत असल्याचा भास होतो. त्यांची काही अपयशी नाटके सोडली तरी त्यांच्याइतकी लोकप्रियता कोणत्याच नाटककाराच्या नाटकांना लाभलेली नाही. त्यांची संगीत नाटके विशेष लोकप्रिय झाली नाहीत. परंतु त्यातील पदे हा नाटकातील संवादाचा अविभाज्य घटक आहे. काही पदे तर अत्यंत लोकप्रिय आहेत. ‘सुरसुखखनी तू विमला, सगुणा कविबाळा’–विद्याहरण. ‘शूरा मी वंदिले... मानापमान.’ ह्या पदांशिवाय गद्य संवादाने ते अधिक रसविष्कार निर्माण करू शकले असते कां ?

लोकप्रियतेची खरी कसोटी रंगभूमीवरच समजते. खाडिलकरांच्या नाटकांना रंगभूमीवर स्थैर्य आणि लोकप्रियता लामली आहे. परंतु पुढे गंधर्वांसाठीच नाटक लिहावयःचे ह्या न्यायाने त्यांनी नाट्यवैभवाला उतरती कळा आणली. तरीही त्यांची नाटकाच्या लोकप्रियता अजूनही कायम आहे.

गुणसंपन्नतेवर भर देऊन नाटक लिहिले की ते लेखकाला फायदेशीर होते. व्यक्तिनिष्ठ लेखन फायदेशीर होत नाही ह्याची नाट्याचार्यांना जाणीव होती.

अशा ह्या नाट्याचार्यांची स्मृती आदराने जोपासणे आज आवश्यक आहे. ध्येयप्रवण लेखन–प्रवृत्ती हीच त्यांच्या वाङ्मयाची बैठक होती. आणि ते ध्येयप्रवण, वीरवृत्ती, पुरुषार्थाचा साक्षात् आविष्कार असलेले, नर्म विनोद तसेच शृंगाराचे उत्कट वर्णन असलेले लेखन समाजाकडून आजही आवडीने वाचले जात आहे. खाडिलकरांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने घेतलेल्या त्यांच्या नाटकांचा, वाङ्मयाचा धावता आढावा पूर्ण करून, त्यांना ही श्रद्धांजली अर्पण करू या !

* * *

## तन–मन–धन

– सौ. सुशीला पगारिया

चार फांद्या तनाच्या
अशा झुलत्या राहू दे
वादळवात विस्मितसा
भवती झिम्मा घालू दे.

चार कोपरे मनाचे
भरून भरून वाहू दे
रुख्या सुख्या माळावर
उन्हं भिजून गाऊ दे.

चार गाठी धनाच्या
आत कुठे माऊ दे
दिवली हाती घेतल्याविना
अंधार–वाट उजळू दे.


स्टेशनरी
सर्व प्रकारचा कागद
शाळा, कॉलेज व लायब्ररीसाठी पुस्तके
यासाठी....

● अरुण बुक डेपो ●
म्युनिसिपल धर्मशाळा, जळगाव.

वह्या, लेटरबुक्स, रजिस्टर्स इत्यादि
माफक दरात मिळतील.
दर्जेदार माल व माफक दर यासाठी अवश्य भेट द्या.




# साफल्य


– एम्. व्ही. कुलकर्णी
F. Y. B. A. (B)


मनीषा मृदुलाबाईंचे पाय चेपत होती. त्या तिच्याकडे पहात होत्या. किती सोज्वळ दिसत होती ती पोर ! सालस, प्रेमळ, कामसू मनीषा त्यांची फारच लाडकी होती. तिच्याकडे पहाता पहाता तिचे मन भूतकाळाच्या गर्तेत सापडले.

मृदुला अन् मुकेश दोघच भावंडे. ते नेहमी एकत्र खेळत, शाळेत जात. मुकेश मृदुलेपेक्षा चार वर्षांनी मोठा होता मृदुलेला आई मुळीच स्मरत नव्हती. तिच्या आठवणीपासून ह्या दोघांचे खाणे, पिणे, व इतर गोष्टी यमुनाबाई, त्यांची मोलकरीण, करत होती. वडलांचा कागदाचा कारखाना होता ते नेहमीच कामात दंग असत. त्यांनी मुलांना कधीच प्रेमानं गोंजारलं नाही.

मृदुला जसजशी मोठी होत होती तसतसे तिला कळू लागले की आपल्याला आई नाही. आपल्याला जगात आणून तिने जगाचा निरोप घेतला आहे. त्या दुखाने वडील drink घेतात व स्वतःला कामात गुरफटून घेतात ह्यामुळेच मृदुला व मुकेशला कधी मायेची ऊब मिळाली नव्हती. वडील मुलांबद्दलचे आपले कर्तव्य चोख बजावीत. कपडेलत्ते, खाऊ, पुस्तके, खेळ यांचा कधीच तोटा नव्हता. तोटा होता फक्त मायेच्या ओलाव्याचा !

मुकेश मृदुला दोघेही हुषार होती ते भराभरा शाळेच्या इयत्ता ओलांडीत होते. त्यांची नावे शाळेत चमकत होती. मुकेशला क्रिकेटची आवड होती तो त्यात नावारुपाला येत होता. मृदुला सुंदर गात असे. दोघेही अभ्यास व कला यांच्यात स्वतःला हरवून घेत.

एक दिवस शाळेत बाईंनी कवी यशवंतांची कविता शिकविली. ‘ चारा मुखी पिलांच्या चिमणी हळूच देई । गोठ्यात वासरांना त्या पाजतात गाई ।। वात्सल्य हे पशूंचे मी रोजरोज पाही । दुर्भाग्य ह्या-विना का आम्हास नाहि आई ॥ ” बाईंनी कविता खूपच सुन्दर शिकविली. मुली खूप तन्मय झाल्या होत्या. मृदुला तर हमसून हमसून रडली. नंतर तिचे वर्गात मुळीच लक्ष लागेना, डोके दुखते असे सांगून ती घरी आली.

घरी आल्यावरही उशीत डोके खुपसून ती रडतच होती. तिच्या डोक्यात सारख्या कवितेच्या ओळी घुमत होत्या. “ शाळेतुनी घराला येता धरील पोटी । काढून ठेविलेला घालील घास ओठी ॥ उष्टचा तशा मुखाच्या धावेल चुंबना ती । आई तुझ्याविना गे का ह्या करील गोष्टी ? ॥ तूझ्याविना न कोणी लावील सांजवाती । सांगेल ना म्हणाया आम्हा शुभंकरोती– ॥ ” संध्याकाळी यमुनाबाई मृदुलेला जेवण्यासाठी बोलवायल्या आल्या. मृदुलेने रडतच भूक नाही म्हणून सांगितले. एक शब्दही न बोलता यमुनाबाई निघून गेल्या. मुकेश अजून क्रिकेट खेळून परतला नव्हता. पण यमुनाबाई मात्र एकट्याच जेवायला बसल्या होत्या !

असेच दिवस जात होते. दोन जीव मोठे होत होते. मायेशिवाय ! ममतेशिवाय !! मृदुला वयात आली. वडिलांनी स्थळं पाहण्यास सुरूवात केली. आणि एक दिवस मृदुलेचे ‘ शुभ मंगल ’ झाले. तिला वाटले आता आपले जीवन बहरेल, फुलेल. पण छे ! तिला वाटले तसे तिचे घर “ उबेचे घरटे ” नव्हते. नवरा तसा प्रेमळ होता. पण हेकेखोर होता. इतर मंडळी आपल्यातच दंग असत.

तिचं जीवन पुन्हा नव्यानं तरीही पहिल्यासारखंच सुरू झालं. जीवनाची आगगाडी दिवस. रात्रीच्या रुळावरून संथपणे सरकत होती. पण दैवाला हे पाहवलं नाही. अपघातात तिचा नवरा अचानक गेला. गाडी रुळावरून घसरली. ती एकटी पडली.

एक दिवस अनाथाश्रमात संचालिका पाहिजे अशी जाहिरात होती. तिनं अर्ज केला. तिला होकार आला. ती तेथे जाऊन राहिली. घरच्या मंडळींनी कोणताही आक्षेप घेतला नाही. ती स्वतः लहानपणापासून आईच्या मायेशिवाय वाढली होती. तिला आई नसलेल्या बालकांच दुःख ठाऊक होतं. तिनं ठरविलं ह्या मुलांना हे दुःख आपण भोगू द्यायचं नाही.

आश्रमातील चालीप्रमाणे मुलं तिला बाई म्हणत. पण तिनं मुलांना आपल्याला मावशी म्हणण्यास सांगितलं. कारण " आई मरो अन् मावशी उरो " म्हणतात. तेव्हापासून ती आश्रमातील चिमण्यांची मावशी बनली. ती नावाप्रमाणं मऊ स्वभावाची होती. ती मुलांचा अभ्यास घेई. त्यांच्या गुणांचं कौतुक करी. त्यांना प्रेमानं कुरवाळून खाऊ देई. आजारपणात धीर देई. मुलांना तिचा व तिला मुलांचा लळा लागला. ती मुलांमध्ये तहानभूक हरपू लागली. तिला आता मुलांकडून प्रेम मिळत होतं. तिच्यावर सर्वच जण खूष होते.

अशा प्रकारे अनेक चिमण्या जीवांना तिनं मायेच्या पंखाखाली घेऊन उडण्यास समर्थ केलं. ती आता थकली होती. मृदुलेची मृदुलाबाई झाली होती. सर्व मुलं तिला आपल्या मुलाप्रमाणं वाटत. ते आश्रम सोडून जात तेव्हा मृदुलाबाई त्यांना भरघोस आशीर्वाद देत. त्यांच्या डोळ्यात पाणी येई. त्या परस्परांमध्ये अतूट प्रेमाचं नातं निर्माण झालं होतं.

असाच एक दिवस सत्येन आला. तो मृदुलाबाईंचा खूपच लाडका होता. त्यानं त्यांच्यासाठी पातळ आणलं होतं. पहिल्या पगाराचं ! रुपेरी रंगाचं ते रेशमी पातळ होतं. त्यावर पिवळा जरीचा पदर होता. मधून मधून बुट्टे चकाकत होते.

मृदुलाबाईंनी ते पातळ घेण्यास नकार दिला. त्यांनी अजून कोणाकडूनही काहीच घेतलं नव्हतं. पण सत्येननं डोळ्यात पाणी आणून सांगितलं, "मावशी, आजपर्यंत तू मला तुझाच मुलगा असावा असं वागवलंस, कोडकौतुक केलंस. मला कधीही पोरका असल्याची जाणीव दिली नाहीस. माझ्या आजारपणात उशाशी बसून रात्र न् रात्र जागरण केलंस. प्रेम केलंस. आणि चुकलो तेव्हा रागावलीस. तो तुझा अधिकार होता. पण, मावशी तू माझ्याकडून हे पातळ घेतलं नाहीस तर मात्र मी समजेन मी पोरका झालो. माझ्या आईला मी पातळ आणलं असतं तर तिनं ते घेतलं नसतं का ? मला नाही म्हटलंच नसतं. मग मावशी, इतक्या वर्षांनी या पातळाचा अव्हेर करून तू मला पोरकेपणाची जाणीव करून देणार का ? बोल मावशी. आजपासून मला तू पोरका बनवणार का ? " त्याचा कंठ दाटून आला. मृदुलाबाईंनाही त्याचं म्हणणं पटलं. त्या म्हणाल्या " रडू नकोस बाळ ! नेसते मी हे पातळ !" त्यांनी ते पातळ हातात घेतलं. मुलायम रुपेरी असे ते पातळ त्या दोघांमधल्या धवल व निरपेक्ष प्रेमाचे प्रतीक होतं.

ते पातळ नेसून त्यांनी विचारलं, ' हं झालं ना समाधान तुझं ?' त्याने हसत म्हटलं, " अं हं. अजून नाही. जर तुझा मुलगा असता तर त्यानं तुला ह्या वयात नोकरी करू दिली नसती. घरीच आरामात ठेवलं असतं. मीही तेच करतो. मला कंपनीनं जागा दिली आहे. तेथे चल. मी तुला कधीच अंतर देणार नाही. आई येशील ना ! " त्याच्या तोंडून नकळत शब्द आले. त्या गहिवरल्या. पण त्यांनी हसत म्हटलं, " माझ्या मुलाने ह्या वयात मला सुनमुखही दाखवलं असतं ! खरं ना ! " त्या व सत्येन मनापासून हसले.

त्यानंतर खरोखरच मृदुलाईंनी नोकरी सोडली. त्या सत्येनच्या बंगल्यावर राहायला आल्या. त्यांनी सुनमुखही पाहिलं. त्यांची सून हसरी, देखणी, गोरीपान होती. त्यांनी तिचं नाव मनीषा ठेवलं. ती खरोखर त्यांच्या इच्छा पुरवीत असे.

" चहा घेता ना ? " असे जेव्हा मनीषा म्हणाली तेव्हा कुठे मृदुलाबाई वर्तमानकाळात परतल्या. विचार करतांना मनीषा केव्हा उठून गेली ते त्यांना कळलेही नव्हते. त्यांनी मनीषेकडं पाहिलं ती त्यांच्यासाठी चहा ओतत होती. सत्येनही जवळ येऊन बसला. त्यानं विचारलं ' कसा काय आहे आता खोकला ? ' त्यानं त्यांना औषध दिलं. त्या मनीषा व सत्येनकडे पहात होत्या. त्यांचं मन समाधानानं तुडुंब भरलं होतं. त्यांच्या जीवनाला पूर्णत्व आले होते केलेले श्रम सफल झाले होते.

* * *

# निर्माल्याची झाली फुलं !

– निशा दत्तात्रय कुलकर्णी
टी. वाय्. बी. ए.

दिनूदादा ! हो दिनूदादाच म्हणत होते सर्व त्याला. त्याची आई राधाकाकू, आमच्या घरी रोज स्वयंपाक करायला यायची. मला आठवतंय, खूप गोड बोलायच्या त्या. स्वयंपाक पण छान करायच्या त्या. मी लहान होते तेव्हा. राधाकाकू स्वयंपाक करायच्या कारण दिनूला वडील नव्हते. त्याच्या पाचव्या वर्षीच त्याचे वडील वारले असे माझी आई सांगते. पण तेव्हापासून राधाकाकूंनी दिनूला तळहाताच्या फोडासारखा जपला. तो सुद्धा खूप हुषार होता. आमच्या दादाच्याच वर्गात पहिला दुसरा नंबर असे त्याचा !

तो खूपखूप शिकला; पण स्कॉलरशिप मिळवून. आई त्याच्यासाठी हाडाची काडं करीत होती. त्याचे वडील वारले तेव्हा राधाकाकू तशा काही मोठ्या नव्हत्या. पुनर्विवाहासाठी त्यांना खूप सांगून पाहिलं पण त्यांचं एकच पालुपद. " माझा दिनू– केवळ त्याच्यासाठीच मी जगतेय. ह्या जगात दुसरं माझं काऽही नाही ! "

दिनू सी. आय. डी. इन्स्पेक्टर म्हणून नाशिक येथे आला. दिसायला स्मार्ट, स्वभाव गोड आणि शिवाय हुषार. त्यामुळे सी. आय. डी. इन्स्पेक्टरचे काम पण चोख होतं. त्यामुळं स्टाफवर त्याचं मोठं इंप्रेशन पडत असे. लाचलुचपतीचा पैसा तर रोज घरबसल्या चालून येत असे पण तो पैसा कधीच घ्यावयाचा नाही अशी आईची शिकवण ! ती रोज त्याला सांगे, " दिनू, तू कितीही मोठा झालास, कितीही संपत्ती तुला कोणी देऊ केली तरी तू सत्याला सोडून जाऊ नकोस. फुकटचा पैसा घेऊ नकोस. दिनू, ते पैसे घेणं म्हणजे शाप असतात शाप ! "

दिनूचं लग्न व्हावं असं राधाकाकूंना फार फार वाटे. त्याला चांगल्या चांगल्या मुली सांगून आल्या. ' सूनबाई लवकर आण ' म्हणून राधाकाकूंचा सारखा लकडा चालूच असे. शेवटी दिनूनं त्यातली एक मुलगी पसंत केली. नाशिकचेच रावबहादुर, विख्यात असे पुढारी, त्यांची मुलगी रत्नप्रभा. मुलगी पाहून राधाकाकूंना धन्य वाटलं. " नावाप्रमाणंच रत्न आहे रे दिनू ! " असं म्हणून दिनूला त्यांनी शाबासकी दिली. लग्नाची तारीख ठरली. रावबहादूरांची मुलगी. मग काय विचारता ! दणदणीत लग्न पार पडलं. दिनूचे दोनाचे चार हात झाले. राधाकाकूंना तर आकाश दोन बोटं उरलं होतं.

लक्ष्मी माप ओलांडून घरात आली. ' हळूच ये हो पोरी, घाबरू नकोस, मी तुझ्या आईसारखी माया करीन तुझ्यावर. जसा माझा दिनू तशीच तू !' असं म्हणून तिला पोटाशी धरलं. असेच दिवस जात होते.

आपली सासू म्हणजे पोळ्या लाटणारी एक बाई; म्हणून रत्नप्रभाला त्यांचा तिरस्कार वाटे. मनातच नाही तर उघडपणं ती सतत त्यांच्यावर खेकसत असायची. मूळचंच चढेलखोर रक्त. सी. आय. डी.–ची पत्नी म्हणून मान मिरवतांना त्यांत आणखीच भर पडली. राधाकाकू सुनेच्या छळाला कंटाळल्या व त्यांनी घर सोडून पंढरपूरला जायचं ठरवलं.

असंच एके दिवशी कपाटातून भाड्यातोड्या– पुरते पैसे व एक लुगडं घेऊन त्या दिनूच्या नकळत घराबाहेर पडल्या. पंढरपूरला पंढरीच्या मंदिराजवळ एका खोपटात त्या राहू लागल्या. सुनबाईनं त्यांना अनाथ केलं तरी पांडुरंगनाथाच्या भरवशावर त्या

जगत होत्या– मरण येत नव्हतं म्हणून ! शिकलेल्या नसल्यानं पोळ्या करण्याचंच काम त्यांच्या नशिबी आलं. दोनचार घरी त्या पोळ्या करायला जात असत.

एकदा एका घरी त्या पोळ्या लाटायला गेल्या होत्या. त्या स्वयंपाकघरात पोळ्या लाटत होत्या. त्यांना बाहेर जरा गडबड चालू असल्याचं जाणवलं. त्यांना संशय आला की हे घर साध्या माणसाचं नसून काहीतरी पाणी मुरतंय इथं ! कोणाला तरी पकडल्याची जाणीव त्यांना झाली व शेजारच्या खोलीत बांधून तोंडात बोळा कोंबून ठेवलं असावं असा त्यांना अंदाज येत होता. स्त्रीसुलभ उत्सुकता त्यांना वाटत होती. पकडलेल्या माणसाची सुटका करावी असं त्यांना एकदा वाटलं. पण त्यांनी तो विचार सोडून दिला. पण मनात मात्र सारखं तेच विचारचक्र सुरु होतं. हे लोक कोण असावेत ? तो पकडलेला माणूस कोण ? त्याला का पकडलं असावं ?

त्यांचे विचार चालूच होते. " काकूबाई, आज फर्मास बेत झाला पाहिजे. आज आमचा मोठा आनंदाचा दिवस आहे. आज मोठं काम होणार ! एकदम खूष, मजा आयेगा ! " असं बरळत एक माणूस आला. राधाकाकू शिकलेल्या नव्हत्या पण... पण डोक्यात शक्कल आली. त्यांनी दूध आणायला लावून त्यात छानपैकी मसाला घालून बासुंदी तयार केली. त्यांनी जायफळ खूप उगाळून त्यांत घातलं.

झालं ! सर्व मंडळी जेवायला बसली. " आज मीच तुम्हाला जेवायला वाढते. मग घरी जाईन. " असं म्हणून त्या जेवण वाढू लागल्या. चांगला आग्रह करकरून त्या बासुंदी पाजीत होत्या. त्यांचा आग्रह, प्रेमळ बोलणं व आपुलकीची वागणूक पाहून " काकू, आज इथेच जेवा, दुपारी मग विश्रांती वगैरे घेऊन घरी जा " त्यातलाच एक जण बोलला. सर्वांनी ' हो ! ' म्हणून त्यास संमती दिली. काकूंना तेच हवं होतं. सर्वांची जेवणं झाल्यावर ते गाढ झोपले. काकू जाग्या होत्या. पण खोलीला कुलूप लावलेलं होतं. बरं आत काहीतरी गुप्त आहे, पण कळणार कसं ? कोणाला कळवावं तर घर गावापासून अगदी दूर. दाराच्या फटीतून त्यांनी पाहण्याचा प्रयत्न केला पण आत अंधार असल्यानं त्यांना काही दिसू शकलं नाही.

त्या झपाझप पावलं टाकत गावात आल्या व थेट पोलीस स्टेशनवर गेल्या. त्यांनी घडलेली हकिगत तेथे सांगितली. झालं ! समजण्याचा अवकाश तोच पोलीस व्हॅन सांगितलेल्या पत्त्यावर निघाली. पोलीस ऑफिसरनं त्यांना तेथेच थांबवून घेतलं. डाव आपल्यावर तर उलटणार नाही ना ? आधीच आपण निराधार, त्यात ही भानगड. उगाच आपण हा उपद्व्याप केला असं त्यांना आता वाटायला लागलं होतं. पण बाण सुटला होता ! पांडुरंगावर हवाला ठेऊन त्या गप्प बसल्या.

थोड्याच वेळात पोलिस– व्हॅन परत आली. ऑफिसरला सर्व गडबड जेव्हा समजली तेव्हा ते धावतच राधाकाकूंकडं आले व त्यांचं हार्दिक अभिनंदन करून, ' आपण नासिकच्या एका बड्या अधिकाऱ्याची, म्हणजे सी. आय. डी. इन्स्पेक्टरची, सुटका केलीत तुम्हाला फार मोठं बक्षीस द्यायला हवं. थांबा तुमची त्यांच्याशी ओळख करून देतो. ख' म्हणजे ते फार संकटात होते " असं म्हणून ते निघून गेले. राधाकाकूंना एकदम दिनू डोळ्यासमोर आहेसा भास झाला.

येताना त्यांनी सी. आय. डी. इन्स्पेक्टर जेव्हा बरोबर आणला तेव्हा त्यांनी धावतच जाऊन दिनूला हृदयाशी धरलं. अतिशय आनंदानं त्या बोलूच शकल्या नाहीत. दिनूही आश्चर्यानं व आई भेटल्याच्या आनंदानं नुसता पुतळ्यासारखा उभा होता. एकदम् भानावर येऊन राधाकाकूंच्याकडे पाहून त्यानं ' आई ! ' म्हणून तिला मिठी मारली. पोलीस– ऑफिसर हे सर्व पाहून बुचकळ्यातच पडला. त्याला जेव्हा सर्व समजलं तेव्हा त्यालाही खूप आनंद वाटला व या योगायोगाचं कौतुक वाटलं. इतका हुषार, मुत्सद्दी असलेला सी. आय. डी. पकडला जावा ! कदाचित आईच्या विरहामुळं मन ठिकाणावर नसावं असा विचार करीतच ते केबिनमध्ये शिरले.

दिनू आईला घेऊन घरी आला. तेव्हा पत्नीला सर्व हकिकत सांगून तो तिला खूप बोलला. त्याला आईचे झालेले हाल केवळ पत्नीमुळं ही गोष्ट मनाला लागली. पण संसारात वितुष्ट येऊ नये ही राधाबाईंची इच्छा. दिनूला दुःख असह्य झालं. पण–

रत्ना धावत घरात गेली तिनं साखरेचा डबा आणला सासुबाईंच्या हातात साखर दिली व इतका वेळ आवरलेल्या अश्रूंना वाट देऊन ती एकदम रडू लागली व सासूबाईंच्या पायावर पडली. तिला उचलून छातीशी धरीत त्या म्हणाल्या, ' उगा, रडू नकोस '. काय बोलावं हेच त्यांना सुचत नव्हतं.

" सासुबाई, मी तुम्हाला पुरतं ओळखलं नव्हतं. पण ह्या क्षणाला मला आपली ओळख चांगलीच पटलीय. आपण माझं सौभाग्य मला परत मिळवून दिलं. " असं म्हणून ती आणखीच ओक्साबोक्शी रडू लागली.

" रत्ना, रडू नकोस. पश्चात्ताप झाला की गुन्हा हा गुन्हा राहत नाही. आई शिकलेली नाही पण तिचं शिकवण फार थोर आहे. तिचं मन समुद्रासारखं विशाल आहे. ती तुला क्षमा करील. पुन्हा असं वागू नकोस " असं म्हणून दिनूनं दोघींकडं पाहिलं. दोघींच्याही डोळ्यात जणू मातापुत्रीचं प्रेम ओसंडत होतं.


घड्याळे व रेडिओ

विक्री व दुरुस्ती

* विशेषता *

* अनुभवी व कुशल कारागीर

* त्वरित व गॅरंटीची सर्व्हिस

* अचुक वेळ

* रीझनेबल चार्जेस

आमच्या आकर्षक शो–रूमला आपण आजच भेट द्या !

नॉव्हेल्टी एम्पोरियम

महात्मा गांधी रोड, जळगाव.


## म्हणून पाऊस पडत नाही

– विकास भिरुड
प्रथम वर्ष वाणिज्य

एकदा एक पुढारी म्हणाला,
" येरे येरे पावसा
तुला देतो लई लई पैसा "
पग पैसा होता ब्लॅकचा
मग पाऊस यतो कसचा !

—×—

# सदाफुली

– कु. जया जावळे

आकाश भरलेले होते, हवा बंद होती. पावसाच्या सरीवर सरी कोसळत होत्या. त्या सरीमध्ये जग बुडत होते. एखाद्याच्या डोळ्यातून दुःखामुळे सरीवर सरी आपोआप सरसराव्या त्याप्रमाणे पावसाच्या सरी ओघळत होत्या. वातावरण उदास होतं, नीरस वाटत होतं. समोरच्या लिंबाच्या झाडावरून थेंब घरंगळत खाली टपटपत होते. घराच्या छतावरून धारा सरसर पडत होत्या. त्यात एकसुरीपणा वाटत होता. समिधाने हळूच वर पाहिलं. तिच्या डोळ्यातल्या सरीही त्या वातावरणाशी जणू स्पर्धा करीत होत्या. उदासीन डोळ्यात निराशेची झाक तरळत होती. समिधाने समोरच्या बागेकडे पाहिले. सर्व दवाखान्याच्या बागेतली फुलझाडं जणू तिच्या दुःखात सहभागी झाली होती. त्यांच्या पानापानांवरून थेंब हळूच झरत होते. फुलं फुललेली होती पण जणू ती देखील निर्जीव आहेत असे समिधाला वाटले. समिधाला वाटले जणू आपल्यासारखीच ती सुद्धा कुणाची पूजा न करता निर्माल्य झाली आहेत.

निर्माल्य ! आपल्याच मनातील विचारानं ती दचकली. खरंच ती निर्माल्यवत नाही कां ? तिच्या मनानं कौल दिला. महेशच्या पहिल्या भेटीतच समिधाला तो आवडला होता. पण तिचे त्याच्यावर सिनेमातल्यासारखे प्रेम बसलं होतं असं नाही. अगदी रीतसर तो तिला पहायला आला होता. तो अति सुंदर नसला तरी रेखीव होता. काळासावळा उंच. भरीव शरीराला आरोग्याची झळाळी होती म्हणून त्याचा चेहरा आणखीच रेखीव वाटत होता. त्याला बऱ्यापैकी नोकरी होती. घरदार शेतीही होती. म्हणून तिच्या नानांनी हे स्थळ गमावू नये असं ठरविलं आणि साखरपुडा झाला.

महेश गावातच राहत असल्याने मधून मधून घरी येत असे. ते दोघे कधी फिरायला, सिनेमाला जात असत. त्या ओळखीतूनच त्यांच्या मनाचे धागे वस्त्र विणू लागले होते. महेशच्या स्वभावाचे वेड समिधाच्या मनाला वेधू लागले होते. जीवनाच्या जोडिदाराचे चित्र जणू तिच्यासमोर साकार झाले होते, मन उल्हसित झाले होते. महेश आला की तिचे अंग अंग फुलून येई, मन आनंदाने ओथंबून वाहू लागे. समिधाचे नाना व आई सुधारक मताचे असल्याने त्यांना मोकळेपणी बोलण्याफिरण्याला मनाई नव्हती.

एकदा असाच तो आला होता. समिधा व महेश बाहेर जायला निघाली होती. फाटकातून बाहेर पडता पडता महेश लाल गुलाबाजवळ थांबला. दोन उमलल्या कळ्या त्यानं पानापासून खुडल्या नि हळूच समिधाला देत म्हणाला––

"ह्या ताज्या कळ्यांसारखे आपले जीवन नेहमी ताजे, फुलत राहावे." समिधाने खुदकन गमतीनं म्हटलं, "शी ! कसली कल्पना ही ? फुलं काय नेहमी ताजी राहतात ? शेवटी ती निर्माल्य बनतात ना" "जीवन क्षणभंगुर आहे खरं पण जीवनात पवित्रता असली की त्याला जो सुगंध असतो त्यानं ते निर्माल्य देखील पवित्र मानलं जातं. आपल्या प्रेमाच्या स्मृती सुगंध देत आपणास अखेरपर्यंत नेहमी ताजी ठेवतील." नंतर तो हसत म्हणाला 'अरे आपण तर अगदी म्हातारपणाच्या गोष्टी करायला लागलो की ! नि त्याने चटकन विषय बदलला होता.

रोज ती दोघं फिरायला जात. सुखस्वप्नांच्या मोहनगरीत गुंग होत, संसाराची मनोरम चित्रं डोळ्यात साठवीत असे दिवस जात होते. लग्न लांबलं होतं ते महेशच्या बहिणीच्या, पल्लवीच्या लग्नाकरिता. पल्लवीचा सुद्धा साखरपुडा झाला होता व नियोजित वर आर्मी ऑफिसर होता. त्याला रजा मिळाल्यावर ते लग्न करणार होते. त्यानंतर त्यांचेही लग्न होणार होते. मनोरथांनी मनं भारलेली होती. त्याच वेळी एक वादळ आलं आणि मनोरथांची दीपमाळ वादळात कोसळून पडली. मनोरथांच्या दीपमाळेचे तुकडे छिन्नविच्छिन्न झाले.

महेश मेव्हण्यांना आणायला रांचीला गेला होता. येताना त्यांच्या मोटारीला अपघात झाला त्यात नेमका महेश सापडला. त्याचे मेव्हणे मात्र वाचले होते. एका ट्रकशी त्यांच्या गाडीची टक्कर झाली होती. महेशचा पुरापुरा चुराडा झाला आणि पल्लवीचा नियोजित पती लांब फेकला गेला होता. पण जखमा जीवघेण्या नव्हत्या त्यामुळे तो वाचला.

महेशच्या नातेवाइकांना हसावं की रडावं कळत नव्हतं. त्यांच्या दुःखाला सीमा नव्हती. त्यांची मनस्थिती द्विधा होती.

समिधाला हा आघात सोसवला नाही. ती कितीतरी तास बेशुद्ध पडली होती. तेव्हापासून दवाखान्यात होती. नुकतीच दोन दिवसांपासून ती शुद्धीवर आली होती. सर्व तिला धीर देत होते. दवाखान्यातील डॉक्टर मोहन वारंवार येऊन तिची चौकशी करीत होते, तिला धीर देत होते. डॉक्टर साधे **B. A. M. S.** होते पण भारी प्रेमळ होते. डॉक्टर गोखल्यांच्या हाताखाली ते काम करीत होते. का कोण जाणे त्यांचे मन समिधाने आकर्षित केले होते. ते तिला धीर देत आणि समजावीत. समिधाची हकीकत त्यांना कळली होती. समिधाच्या मनाची जाण त्यांना झाली होती. ते तिला म्हणत–

"जीवन म्हणजे का एकसुरी गीत आहे? ते कधीतरी बेसूर व्हायचंच. तारा तुटल्या म्हणून का गाणं म्हणायचं सोडायचं ? तुमच्यावर आघात झालाय खरा पण तो तुम्ही आता विसरायला हवा. तुमच्या नानांकरिता, आईकरिता."

समिधा मुकेपणाने बसून राही. हळूहळू ती थोड्याफार प्रमाणात इतरात मिसळू लागली. नंतर तिला घरी जाण्यास परवानगी मिळाली होती. तरी डॉक्टर मोहन घरी यायचे, समिधाला धीर द्यायचे. एकदा समिधा बागेत बसली होती समिधाला फुलझाडं फार आवडत. प्रत्येक झाडाची ती स्वतः निगा राखी. त्यांच्याशी जणू समरस होई. त्या झाडांचे डोलणे, हालणे तिला आनंद देई. पण आज त्याच झाडांकडे ती उदासीन नजरेनं पाहत होती. त्याचवेळी डॉ. मोहन आले आणि म्हणाले, "अरे, अशा खिन्न का बसलात? किती सुंदर फुलं फुललेली आहेत पाहिलीत.'

"हो क्षणभंगुर हसणारी, नंतर निर्माल्य होणारी; माझ्या सारखीच कोणाचीही पूजा न करता निर्माल्य होणारी." समिधा म्हणाली.

"काहीतरीच कल्पना. ही फुलं तर आम्हाला संदेश देत आहेत उन्हात, वादळात, पावसात हसण्याचा. जीवनात वादळं येतात, पाऊस पडतो, ऊन रणरणतं तरी आम्ही हसतच राहिलं पाहिजे, टक्कर दिली पाहिजे."

"पण जी फुलं या उन्हात सुकू पहात आहेत त्यांचं काय ?"

"दुपारच्या उन्हात ही फुलं थोडी काळवंडली तरी त्यांचं हास्य कोमेजणार नाही. उन्हाचा कडकडीतपणा कमी झाल्यावर ती पुन्हा जमिनीचा ओलावा शोधतील व टवटवीत होतील"

"जी कोणत्याही देवाला वाहिली नाहीत ती निर्माल्य होत नाहीत, पण जी कोणत्याही देवाला वाहिली आहेत त्यांचं काय?"

" ती सुद्धा कोणी पायदळी तुडविणार नाहीत. त्यांनाही लोक पवित्र म्हणून माथी चढवतील. कदाचित मूर्ती बदलेल इतकच " समिधाने वर पाहिलं. तिच्या डोळ्यात आसवं जमा झाली.

समिधाच्या मनाची थोडी चलबिचल झाली नंतर तिने आपले मन स्थिर केले आणि निश्चयी आवाजात उत्तर दिलं–

" नाही मोहन, मूर्ती कधीच बदलत नाही. तुम्ही माझ्यावर रागावू नका. मला तुम्ही धाकटी बहीण समजा व नेहमी माझ्या डगमगणाऱ्या पावलांना धीर द्या. मी हसणार आहे या फुलांसारखीच, पण दुसऱ्यांसाठी. नर्स होऊन रोग्यांना दिलासा देत जगणार आहे. व त्यात आनंद मानणार आहे. " आणि ती हसू लागली. हसता हसता तिच्या डोळ्यात आसू आले. तिने ते झटकन पुसून टाकले.

* * *

सलूनच्या बाकावर एक खूप केस वाढवलेला तरुण बसला होता. न्हाव्याने हातातील गिऱ्हाइकाचे काम संपवले व त्या तरुणास म्हणाला, ' चला, बसा कटिंगला '

' छे, छे, मला कटिंग करायची नाही '

' मग इथे का बसला आहात ? '

' मी वडिलाना चुकवून फिरत आहे. ते माझ्या शोधात आहेत. मी इथे येईन असे त्यांना जन्मात कधी वाटणार नाही. '

⁂ ⁂ ⁂

⁂ एक शिक्षक अल्कोहोलचे परिणाम विद्यार्थ्यांना समजावून सांगत होते. त्यांनी एक किडा पाणी भरलेल्या ग्लासात टाकला. तो किडा वर चढून ग्लासबाहेर आला. नंतर त्याने तो किडा अल्कोहोलमध्ये टाकला. तो किडा मेला. शिक्षकाने विचारले ' याचा अर्थ काय ? ' एक विद्यार्थी उत्तरला, ' अल्कोहोल प्यायले म्हणजे जंत होणार नाहीत. '

⁂ ⁂ ⁂

⁂ पोहायला शिकवत असलेला शिक्षक एका शिकाऊ प्रौढाला सूचना देत होता,

' तोंड बंद ठेवणे हा सर्वात महत्त्वाचा नियम आहे '

तो प्रौढ उद्गारला, ' उद्यापासून माझ्या बायकोलाही शिकायला आणतो '

⁂ ⁂ ⁂





# संस्कृती

– रामदास वालजी ऊर्फ तात्या सिंगनूरकर
मू. जे. कॉलेज, कार्यालय

मनुष्य व इतर हीन योनी यात फार फरक आहे. प्रत्येक मनुष्य हा स्वतंत्र प्राणी नसून त्याचे स्वातंत्र्य व स्वैरवर्तन यास समाजातील इतर व्यक्तींच्या हरघडीच्या संबंधामुळे व तदनुषंगिक कर्तव्यामुळे बंधन घालणे जरुरीचे असते. हरएक प्रसंगी योग्य वर्तन ठेऊन प्रत्येकाने आपली स्वतःची सर्वांगीण उन्नती व अभ्युदय करण्यासाठी निरंतर प्रयत्न केले पाहिजेत. या प्रगतीच्या मुळाशी संस्कृतीची बीजे असतात हे ध्यानात असू द्यावे.

व्यवहारात आपण सहजगत्या म्हणतो की सुसंस्कृत व शीलसंपन्न घराण्यात जन्मास येणे हे परम भाग्य होय. कारण, त्या व्यक्तीस ऐहिक व पारलौकिक अशा दोन्ही गोष्टी साध्य होतात. संस्कृती हीन असली म्हणजे व्यक्तीचा ऱ्हास होतो व समाज अधोगतीस जातो.

विचारांची शुचिता, उच्चारांची सुस्पष्टता, आचारांची अकलंकिनता व त्या सर्वांची एकवाक्यता साधण्यास सुसंस्कृती उपयोगी पडते. आर्चिबाल्ड रॉबर्ट्सन म्हणतात,

"When we use the word "Civilization", we mean a society with enough command over nature to raise it above savagery or barbarism."

संस्कृतीला श्रद्धेची जोड मिळाली म्हणजे दुधात साखर पडल्यासारखे होते.

" श्रद्धामयोऽयं पुरुषः " । पुरुष हा श्रद्धामय आहे असे गीतेत म्हटले आहे. मात्र डोळस श्रद्धा असावी. आंधळ्या रीतीने केलेली उपासना अथवा कर्म मुक्कामास पोचविण्याऐवजी नाशालाच कारण होतात. सुसंस्कृत व्यक्तीस ज्ञानाची गोडी असते. आंधळ्याला गरुडाचे जरी पंख प्राप्त झाले तरी त्यात त्याचा घातच होतो, तशी ज्ञानाशिवाय कर्मे निरर्थक होत.

आसुरी दुर्गुण बंधनास कारण होतात. बालपणी मनुष्याचे मनावर उत्तम संस्कार घडले नाहीत व प्रौढावस्थत मनुष्याचे अंतःकरणावर सद्विकासांची भर पडली नाही तर त्यास जन्माचे सार्थक करता येणार नाही.

प्रत्येक मनुष्याने, जणू काय या जगात त्याच्या संस्काराप्रमाणे एका विवक्षित गाडीचे तिकिट काढलेले असते. त्यात एकदा बसले म्हणजे ठिकाणापर्यंत गेलेच पाहिजे. त्याला स्वातंत्र्य एवढेच की, त्याने गाडीत साफ अज्ञानाची पथारी पसरून झोप काढावी किंवा जागे राहून सहप्रवासी लोकांमध्ये चार क्षण सत्कारणी लावावे. अर्थात सात्त्विक, राजस अगर तामस वृत्तीपैकी ज्यांचा प्रादुर्भाव असेल त्याप्रमाणे त्यास सुखाचा लाभ कमीजास्त प्रमाणात होईल. कमल सूर्याच्या किरणांनी उमलते त्याप्रमाणे सुसंस्कारांनी अंतःकरणप्रवृत्ती प्रफुल्लित व विकसित होते.

मानवी जीवन हे सुंदर आहे, मधुर आहे पण त्याला केव्हा कीड लागेल त्याचा नेम नाही, म्हणून सुसंस्कृत दृष्टीस आवश्यक त्या गुणांचा विकास व्हावा हे पाहणे जरूरीचे आहे.

"Simple living and high thinking the way to prosperity."

साधी राहणी व उच्च विचारसरणी ही भर– भराटीला मार्गदर्शक होत.

"It is necessary to cultivate simplicity, simplicity in dress and diet, simplicity, too, in speech. Let us not forget that simplicity is an inner energy. For true simplicity is not possible without humility of heart."

चारित्र्य हाच जीवनशिक्षणाचा पाया होय. संस्कृती ही शिक्षणाने घडत असते व शिक्षण हे संस्कृतीतून मिळते.

सदाचरणापासून कल्याणप्राप्ती होते व दुराचरणामुळे आपत्ती ओढवते याबद्दलचे धडे होतकरू मंडळीस शिकवून त्यांतील सिद्धांत त्यांचे मनावर उत्तम रीतीने ठसले म्हणजे भावी पिढीचे कल्याण होईल. सोनार हातोडीने सतत ठोकून ज्याप्रमाणे सुवर्णाचा दागिना बनवितो, त्याप्रमाणे अंत:करणावर सद्बोधाचा कायम ठसा उमटून हे मानवी अंत:करण शुद्ध बनविले पाहिजे. संस्कृती ही शिक्षणाने घडत असते व शिक्षण हे संस्कृतीतून मिळते. संस्कृती ही शिक्षणाचा पाया असल्याने शिक्षणाच्या बौद्धिक अंगापेक्षा सांस्कृतिक अंगाला गांधीजींनी अधिक महत्त्व दिलेले आहे.

पाश्चात्य संस्कृती जडवादी, भोगप्रधान आहे. आपली संस्कृती अध्यात्मवादी व त्यागप्रधान आहे. ती मनोनिग्रहावर आधारली असून मानवी मनाला पावित्र्याकडे, दिव्यत्वाकडे, आनंदाकडे, अनंताकडे नेत आहे. विज्ञान अपूर्ण असून जगातील हिंसेस व अशांतीस कारणीभूत झाले आहे. विज्ञान व आत्मज्ञान यांनीच मानवाचे प्रश्न सुटतील. सबब भारतीय संस्कृतीने विज्ञान व तत्त्वज्ञान आत्मसात करून मानवतेचे प्रश्न सोडवले. पाहिजेत ही महान कामगिरी चालू पिढीवर आहे.

भारतीय संस्कृतीचे दिव्यत्व मलीन झाले आहे. स्वामी विवेकानंदांच्या शब्दांत "मध्यान्हरात्र उलटली आहे. उष:कालास सुरवात झाली आहे. सर्वांनी जागे होऊन झालेल्या चुका, हेवेदावे विसरून, देशासाठी, धर्मासाठी, सर्वस्वाचा त्याग करून कामास लागले पाहिजे. आपल्यातील पशुवृत्ती नाहीशी केली पाहिजे. मानवाचे दैवी शक्तीची जोपासना केली पाहिजे. हे बाहू उभारून मानवाला सांगणारा फक्त हिंदु धर्म आहे." आपले तत्त्वज्ञान जगद्वंद्य आहे.

विद्यार्थी हा केवळ शाळेशी अगर कॉलेजशी निगडित नसून कुटुंबांतील भावी पालक व समाजातील जबाबदार नागरिक आहे. तसेच शिक्षण हे शाळा, कॉलेज, समाज, कुटुंब या प्रमुख पायावरच उभे राहत असते. यातूनच संस्कार होत असतात.

आजचा विद्यार्थी शाळा–कॉलेजापेक्षा बाहेरील वातावरणात जास्त वेळ घालवितो व त्यामुळे शाळा कॉलेजपेक्षा समाजातील व कुटुंबातील विचारांचा त्याच्या मनावर जास्त परिणाम झालेला दिसतो.

आजच्या ध्येयशून्य नि संस्कृतिशून्य तरुण मंडळीत अमली पदार्थांच्या सेवनाची फॅशन बेगाने रूढ होत आहे. जो नवीन समाजवादी समर्थ भारत आकाराला येत आहे त्याच्याविषयी आस्था नाही आणि या देशाच्या संस्कृतीची जी शाश्वत मूल्ये आहेत त्यांच्याविषयी अभिमान नाही असा ... सत्त्वशून्य व नादान समाज–विभाग अ ज " मॉडर्न नि प्रगतिशील म्हणून या देशात मिरवीत आहे. त्याने निर्माण केलेला नैतिक अध:पात हा संस्कृती... पोषक नाही.

विषकुंडात विषवल्लीच निर्माण होते, अमृतवेल नव्हे! त्यासाठी सामाजिक परिवर्तन आवश्यक आहे.

* * *

आशि...



# फूल

– वंदना गगडाणी
S. Y. B. A.

प्रकाशाच्या आगमनामुळे घाबरलेल्या अंधाराने आपले अस्तित्व स्वत:च मिटवायला सुरवात केली होती. प्रकाशाला खरं म्हणजे याची जाणीव नव्हती. एखाद्या मित्राला भेटावं त्याचप्रमाणे तो अंधाराशी हातमिळवणी करीत होता. पळून चाललेल्या अंधा–राशी होत असलेली त्याची भेट दिसत होती एखाद्या मित्रासारखी !

...ही भेट पाहून सगळेच आनंदले होते. तलावातील कमळं प्रकाशाकडे पाहून लाजत लाजत हसत होती. पाकळ्यात दडलेला भुंगा सुद्धा बाहेर पडायची वाट पहात होता. अंधाराने नेलेला हिरवा रंग प्रकाशाने पानांना मिळवून दिला होता. वाऱ्याशी मस्ती करण्यात पाने रंगून गेली होती. चिऊताई पिलांसाठी खाऊ आणायला लगबगीने निघाली होती. त्या बागेतलं एक फूल सुद्धा असेच आनंदाने बेभान होऊन नाचत होते–– डोलत होते ! कधी इकडे पाही तर कधी तिकडे ! आपल्याशीच खेळत होते ते. आजूबाजूचे जग विसरून आपल्यात हरवले होते. प्रकाशावरती भलतेच खुष दिसत होते. ह्या प्रका–शानेच त्याला एक नवीन जीवन दिले होते. कालच्यापेक्षा आजचं जग कित्ती वेगळं दिसत होतं त्याला ! यापूर्वी स्वत:भोवता गिरक्या घेतल्याचं आठवत नव्हतं, की शुद्ध नसतांना जगल्याचं स्मरत नव्हतं ! पूर्वी त्याच्या स्वत:च्या जगापेक्षा बाहरचं जग त्याला खूप खूप मोठं वाटायचं. पण आज त्याचा आनंद त्या जगात सुद्धा मावत नव्हता ! काहीतरी न सांगता येण्यासारखं, वेगळं त्याला मिळालं होतं. आनंद लपवावासा वाटत होता पण तो दाखविल्या–शिवाय सुद्धा रहावत नव्हतं ! काय करावं ते उमजत नव्हतं. पण काही केल्याविना स्वस्थही बसता येत नव्हतं. आपल्या सौंदर्याने त्यालाच वेड लावलं होतं... अंधारात घडलेल्या ह्या चमत्काराला प्रकाशाने प्रकाशात आणलं होतं !

...डोलता डोलता ते एकदम स्तब्ध झालं... घाबरलं...बावरलं. इतक्या वेळ त्याला वाटत होतं भास होतोय् आपल्याला. पण कुणीतरी नक्की त्यालाच साद घालत होतं. तो आवाज त्याला मुळीसुध्दा आवडला नाही. बरोबरच होतं ते...नाजुक फुलपाखराला अवाढव्य घार कशी आवडावी ? मनातून रागावूनच त्याने सभोवताली पाहिले. आवाज तर अगदीच जवळून येत होता...फुलाच्या लक्षात आलं...काटा बोलत होता त्याच्याशी !...

... "केव्हाचा ओरडतोय् ! पण तू आपल्याच नादात गुंग आहेस. हळू नाच बाबा. त्रास होतो मला. दुसऱ्याचा विचार करत जा जरा !"

"काटचा ! तू सांगतोस मला दुसऱ्यांचा विचार करायला ? नवलच आहे !"

"आज भाषा बदललेली दिसतेय् तुझी. स्वत:च्या सौंदर्याचा एवढा गर्व कामाचा नाही काही."

"तुला रूप नाही काटचा, म्हणून मला उपदेश करणं सुचत आहे. स्वत:जवळ काहीच नसून केवढी ही तुझी बटबट !"

" हां ! सांभाळून बोल जरा ! मला रूप नाही म्हणजे माझ्याजवळ काहीच नाही असं समजू नकोस. रूपापेक्षा महत्त्वाचं सगळं काही दिलं आहे मला परमेश्वरानं ! "

... " छट् ! सौंदर्यच मुळी सर्वात महत्त्वाचं ! त्यापेक्षा महत्त्वाचं दुसरं असूच शकत नाही. आहे काय तुझ्याजवळ ? ना रूप ना सुगंध ! ना बोलण्यात मार्दव ना रूपात गोडवा ! कुणाला तुझ्याकडे पहायची इच्छा नाही की कुणाला तुझं वेड नाही ! माझ्या जन्मापासून पहातो आहे तुला, कुणाचा चुकून जरी तुला हात लागला तरी डोळ्यात आसवं उभी करतोस बिचाऱ्याच्या. स्वतःला हासता येत नाही म्हणून दुसऱ्याचं हास्य हिरावण हा तुझा उद्योग ! अन् म्हणे सगळं आहे माझ्याजवळ ! तुला अन् मला एकाच देवानं कसं बनवलं याचंच मला मुळी नवल वाटतं ! "

" हो ! हो ! सगळं आहे माझ्याजवळ. तुझ्यासारख्या मोहक रूपाची मला इच्छा नाही की नाजुकतेची आशा नाही. मी आहे फक्त माझा ! दुसऱ्याच्या स्वाधीन होणं मला रुचत नाही. अन् म्हणूनच कुणी माझ्या चुकूनही जवळ आलं तरी मी लगेच त्याला दूर करतो. तेवढं सामर्थ्य माझ्याजवळ आहे. माझ्या ह्या सामर्थ्यालाच मी माझं सर्वस्व मानतो. "

.. " नसूदे सामर्थ्य माझ्याजवळ ! माझ्या सौंदर्याने मी दुसऱ्याला आनंदित करतो हे काही कमी नाही ! "

" दुसऱ्याला म्हणजे कुणाला ? ह्या माणसांनाच ना ? त्यांना आनंद देण्यात तुला कुठला आनंद मिळतो देव जाणे ! तुला माहीत नसेल, इथंच आपल्या समोर एक झाड होतं. त्याच्या सावलीत ही माणसं येऊन बसायची. अन् त्यांनीच पाडलं की रे त्या झाडाला. अस्सं वाईट वाटलं त्या दिवशी मला. माझ्या या सामर्थ्याची जाणीव सुद्धा मला त्याच दिवशी झाली. फारकार कृतघ्न आणि स्वार्थी आहे ही माणसांची जात ! "

" मला तर थोडसं सुद्धा पटत नाही तुझं म्हणणं! "

" तुझ्यावर वेळ आली की पटेल आपोआपच. आधीच तुझं आयुष्य किती लहान. त्यात तुला आमच्यापासून दूर करून ते आणखी लहान करण्यात काय मिळतं रे ह्या माणसांना? आपल्या सुखासाठी जे दुसऱ्यांचा जीव घेतात त्यांनामी रडवलं तर बिघडलं कुठं ? उलट मी त्यांच्या मानानं फार दुबळा आहे याचंच मला वाईट वाटतं. "

...... " काय ?... माझं आयुष्य लहान... "

—— छे ! फूल पुढे बोलूच शकले नाही. अन् काटाही गप्प झाला...

... एक नाजुक हात फुलाजवळ आला... दुसऱ्याच क्षणी फूल त्या हाताने ताब्यात घेतले... थोड्याच वेळात ते काळ्याभोर केसांच्या जाळ्यात अडकून पडलं... सुटण्याची सगळी खटपट व्यर्थ गेली... फुल अडकूनच राहिलं... काट्याचे शब्द आठवत... आपल्या भविष्यकाळाची वाट पहात...

—— सकाळी पळून गेलेला अंधार आता जय्यत तयारीने आला होता. प्रकाशाला जिंकायचं होत ना त्याला! अन् दिवसभराच्या श्रमाने प्रकाश थकला होता. केव्हा एकदाचा आईच्या कुशीत शिरून निजतो असं त्याला होऊन गेलं होतं ! अन् म्हणूनच तो आपला पसारा आवरत होता... अंधाराला वाटत होत घाबरला मला हा...

... जाणाऱ्या प्रकाशाकडे आपल्या नसलेल्या प्राणात त्राण आणून फूल पाहत होतं. रडण्यासाठी दवं आसवं सुद्धा नव्हती त्याच्याजवळ. बागेतल्या एका कोपऱ्यात कचऱ्यात फेकलं होतं त्याला. आजूबाजूची दुर्गंधी सहन करता येत नव्हती. पण सुगंध तरी कुठं होता जवळ? सकाळचं काहीच आता उरलं नव्हतं. सगळं देऊन काहीच मिळालं नव्हतं! फक्त... एकच करणं शक्य होतं त्याला... तेच करत पडलेलं ते... मृत्यू येईपर्यंत सकाळी साखरझोपेत स्वप्न आठवणं......

* * *



# कधी कधी देवावरचा विश्वास उडतो !

– प्रभुदास दामोदर चव्हाण
एफ्. वाय. बी. कॉम.

तसं पाहायला गेलं तर तो माझ्यापेक्षा पंधरा वर्षांनी मोठा. पण इतर लोकांप्रमाणं मी त्याला कधीही ' बाळासाहेब ' म्हटलं नाही. कारण मला अजूनही तो ' बाळ ' च वाटतो. त्याला त्या एकेरी नांवाने हाक मारतांना मला आत्मीयता वाटते, त्या संबोधनाची यथार्थता खूपच वाटते. बाळ ... निरागस, निष्पाप, भोळा. कलियुगाच वारं त्याला अजूनही शिवलं नाही ... असा माझा खास आत्मीय दोस्त. दोस्तापेक्षा ' निअर टु ब्रदर ' ... त्याच्या सहवासात मला तो कधीही ' बाळासाहेब ' आहे असं वाटलं नाही. तीच दिलखुलास बोलणी, मस्ती, जोक्स्, गुद्दागुद्दी ... दूरदूरचे प्रवास आणि अनेक चर्चा व वादविवाद ... तसा तो ' रॅशनॅलिस्ट ' आहेच. राजकारणाचा त्याचा अभ्यास दांडगा, व्यक्तिमत्त्व प्रदर्शनीय कायमची छाप ठेवणारे ... पण मी त्याला नेहमी ' बाळ ' म्हणूनच संबोधतो ... त्याला माझ्या तोंडून ते ऐकायला आवडतं. तो खळखळून हसतो आणि माझ्या पाठीवर ठोसा लगावत म्हणतो ... " बाळका बच्चा " !

गेल्या अनेक वर्षापासून आम्ही दोघं शेजारी आहोत. मला आठवतं, काही वर्षापूर्वी अविनाश व क्षमाबाई आमच्या शेजारच्या बंगल्यात रहायला आल्या ... आणि थोड्याच दिवसांनी क्षमाबाईंचा भाऊ त्यांच्याकडे रहायला आला. त्याला येथे कॉलेज करायचे होते. आईला लहानपणीच मुकलेला ' बाळ ' वडिलांची छाया निघून गेल्यावर आपल्या बहिणीकडे राहायला आला. त्यांच्या घरचं सगळं काम तो करी. सुरुवातीला काही दिवस मी आपल्या घरातून त्याला तासन् तास पाहत असे. तो बागेत काम करीत आहे, कपडे ' प्रेस ' करीत आहे, दळण आणत आहे. एक ना दोन; मला कीव यायची. इतका शांत निर्विकार माणूस मी पूर्वी पाहिला नव्हता. आणि सहानु–भूतीच्या पोटी आत्मीयता जन्माला आली. दुपारी त्याच्याकडे अभ्यासाला जात असे. इंग्रजी टॉप शिकवायचा. पण माझे सारे लक्ष शिकण्या–ऐवजी त्याच्याकडंच असायचं.

त्याचे कावरेबावरे पण मिष्किल डोळे. बहीण किंवा मेव्हणे जरी फाड फाड बोलले तरी तो मान खाली घालून गुपचूप ऐकून घेई. स्तब्ध... कधी प्रतिकार नाही... उलट बोलणे नाही. मला राग यायचा कित्येकदा त्याच्या या गरिबपणाचा. कित्येकदा हसूही यायचं... एकदा मेव्हण्यांनी रागानं लाल होऊन त्याला ओरडून म्हटले, ' गेट आउट '... आणि तो खरंच दाराबाहेर मुकाट्यानं गेला. ढळाढळा रडायला लागला त्यामुळे मला त्याची जवळीक इतकी आवडायची की उगीचच शिष्टाचार–दर्शक मानसूचक संबोधन मला ' आई ' ला ' माँसाहेब ' म्हटल्या सारखं वाटायचं.

त्याच्या छोट्या खट्याळ भाच्याला त्याला नेहमी सांभाळावं-खेळवावं लागे... छोट्या क्षितिजला तो विचारायचा, " छितुरे! देव कुठे आहे? " मामाच्या या गहन प्रश्नाचे उत्तर तो छोट्या आपले नाजूक हात गोल फिरवून बोबडे बोलत द्यायचा, " देवबाप्पा इथेय "... सर्वाभूती ईश्वर आहे हे ह्या छोट्याला " शुभं करोति "

च्या वेळेस क्षमाबाईंनी पोपटासारखे पढविलेले मला माहीत होतं... आम्ही त्याचं कौतुक करून मोठ्यानं हसत असू... सीनियरला असताना बाळ भयंकर आजारी पडला... माझ्या भावुक काळजात चरं झालं. परीक्षा जवळ आली. नवऱ्याच्या तुसटपणामुळं बहीण भावाकडे लक्ष देऊ शकली नाही. मग योग्य औषधं तर दूरच. मी शाळेतून आल्याबरोबर आईनं दिलेली फळं किंवा रस घेऊन त्याच्याजवळ धावत जाई. भकास डोळे. वाढलेली दाढी... क्षीण शरीर... माझ्या स्नेहानं तो गद्‌गदित होई... आवेगानं माझा हात दाबत तो म्हणायचा, ' यू आर ग्रेट '. हरवऱ्याच्या झाडावर चढण्यापूर्वी मी म्हणत असे, ' यू आर ग्रेट बाळ '... तो रानफुलासारखा वाढला ... पण परिस्थितीशी त्याच्या स्वभावानं किंवा त्यानं कधीहि संघर्ष केला नाही... शिक्षण अपुरंच राहिलं... परावलंबी जीवन. मेव्हण्यांनी त्याला कोठेतरी कारकून म्हणून चिकटवून दिलं... फुकट पोसणं त्यांना परवडत नव्हतं... मला चीड आली. तो निमुटपणे क्लार्क झाला म्हणून. कारण मला ते पटत नव्हतं... नो... नो..., बाळ आणि क्लार्क ! नॉट प्रॉपर मॅचिंग... माझ्या स्वप्नसृष्टीत मी त्याला ' मोस्ट ब्रिलियंट प्रोफेसर ' म्हणून पाहत आलो आहे. पत्राखाली त्यानं अत्यंत तडफदार सुंदर इंग्रजीत सही केली की माझ्या डोळ्याचं पारणं फिटे व प्रसन्न होऊन मी म्हणत असे, " हॅट जाव गव्हर्नर ऑफ... " तो बाळ क्लार्क व्हावा! पण तो झाला नाही बनवला गेला... त्याचा जीवनचित्रपट झरझर माझ्या डोळ्यापुढून सरकतो... ' मध्यान्तर ही झाला... वय झालं. . . यौवनाच्या कळचा विरु... तो प्रौढत्वाच्या निवडुंग पसरलेल्या मार्गाला लाग... होता. . . . . . तोच साधेपणा. . . निर्विकार. . लग्नाचं कोणी विचारलं नाही. प्रयत्नही के... नाही. . . त्यानं विचार केला असेल का? बाळ म... कोड्यासारखा वाटतो. त्याच्या भावना काय झाल्या... मला कसंसंच होतं. त्याच्या स्वतः विषयी तो विचा... करत नसेल तेवढा मी करतो त्याचा विचार. . पण बाळ. . .

आपल्यापेक्षा मोठा, कितीतरी मोठा बा... अजून बॅचलरच का? स्वतःवर तो अन्याय करी... आहे. पण हे सगळं मी का त्याला सांगायचं?.. परवा संध्याकाळी मी पुतणीला घेऊन बागेत ति... उडणारी फुलपांखरं दाखवीत होतो. . . तोच बा... आला. वैशूला घेत तिचा गालगुच्चा घेऊन त्या... तिला विचारलं, " देव कुठे आहे!! " उत्तरात... झक्कास हसली. . . तिच्या गालात पडणारी खळी... बाळाच्या या प्रश्नातील वेदना पूर्वी जेव्हा तो त्या... भाच्याला खेळवतांना हा प्रश्न विचारायचा ते... मला समजली नव्हती. भारावलेल्या हृदया... त्याच्या खांद्यावर हात टेकून मी म्हणाले... " बाळ, तिला मी शिकवणार आहे, देव कु... नाही ". माझं उत्तर ऐकून त्याचा चेहरा काव... बावरा झाला आणि त्याच्या डोळ्यातून अश्रू ब... लागले. तोंड फिरवून तो संथपणे फाटकाकडे... " बाळ " माझ्या तोंडून कसे बसे शब्द निघा... डोळ्यात जमा झालेल्या आसवांमुळं त्याची पाठमो... आकृती मृगजळात थरथरल्यासारखी मला दिस...

* * *

एक वेडा स्वतःला शिवाजी समजून वागत होता. इस्पितळात आलेल्या एकाने त्याला विचारले,
' तू शिवाजी आहेस हे तुला कोणी सांगितले ? '
' कोणी म्हणजे ? प्रत्यक्ष देवाने '.
' नाही हो. मी नाही सांगितल, ' पलिकडल्या खोलीतून आवाज आला.



# अजिंठा

## हिन्दी विभाग

जहाँ सब सब की तरह देखते हैं, वहाँ साहित्य नहीं है। जहाँ एक अपनी तरह, बिलकुल अपनी तरह देखता है, वहीं साहित्य है। यह आत्म-अभिव्यक्ति, अभिव्यक्ति की यह आत्मीयता, सर्जनात्मक साहित्य मात्र का गुण है। यही उसका पहला और अंतिम सत्य है। जिस अर्थ में और जितने सच्चे अर्थ में वह रचनाकार की यह आत्म-अभिव्यक्ति उसकी अपनी है, वह प्रयोग करने के लिए, हर बार हर नयी रचना के समय प्रयोग करने के लिए बाध्य है क्योंकि भाववस्तु के शिल्प में ढलने की रचना-प्रक्रिया ही प्रयोग की है। सार्थक प्रयोग वही है। वरना तो प्रयोग करने के लिए भी प्रयोग किया जाता है, केवल अपनी कला--चातुरी दिखाने और लोगों को चाकाने के लिए। यह घटिया प्रयोग है बल्कि उसको बहुत बार प्रयोग कहना भी नहीं चाहिए क्योंकि वह प्रयोग नहीं इसका--उसका अनुकरण होता है।

– अमृतराय

# कहाँ तुम छिपी रही— !

– कवि संजय भेंडे
F. Y. B. Com.

मादकसी अंगडाई लेकर,
तारों के गुलदीप सजाकर,
मुख पर घूँघट सरकाकर,
जोहती है वाट यामिनी, तब कहाँ तुम छिपी रही ?

मेघों की मखमली शय्यापर,
चन्दा लेटा है सकुचाकर,
प्रिया से मिलने को हो आतुर
दमक उठी तब दामिनी, तब कहा तुम छिपी रही ?

गका चंदासे लिपटती,
सुरभि श्वासोंमें सिमटती,
झूम झूम रागिनियाँ सजतीं,
बहारों के गीत गाती, तब कहाँ तुम छिपी रही ?

* * *

## इंतजार

बनके रहा अँखियोंमें कजरा,
इक सुंदर सपना बचपन का,
कहती थी सदा दिल की धडकन,
तू बैठ बिछाके अपने नयन,
सच्ची है अगर ये तेरी लगन,
लौट आएगा साथी तेरा सनम,

## बेवफाई

मेरे प्यार की कोई मिसाल नहीं
तेरी बेवफाईका भी जवाब नहीं,
प्यारका दीप तू ने अबतक जलाया नहीं
तेरे दिलमें मुझे जगह नहीं
तेरे संग औरों का फिरना मुझे गवारा नहीं
मैंने औरोंके लिए तुझे सँवारा नहीं।

× × ×

* * *



# " प्यार की एक बूँद "

– अविनाश एन. खरे
एम्. ए., प्रथम वर्ष (हिंदी)

ड्राइंगरूम में सिगरेट के टुकडे इधर उधर पडे थे। राजेश अपने विचारों में खोया गुमसुम बैठा था। सूर्यकी किरणें ड्राइंग रूम में प्रवेश कर रही थीं। " राजेश, तुम्हें क्या हो गया है ? तुम ऐसे कटेकटे से क्यों रहने लगे हो ? " " कुछ नहीं। " राजेश ने जवाब देते हुए सामने देखा तो उसकी पत्नी नीलिमा सुंदर वस्त्र में सज्ज खडी थी। उसके उलझे हुए रेशमी बालोंपर अपने गालों को रगडती हुई, रोती रोती बोली– " क्यों साताते हो मुझे ? " राजेश फिरभी मौन हो रहा । राजेश अपने खयालों की दुनिया में सफर कर रहा था। नीलिमा ने उठकर चाय बनायी, नाश्ता तैयार किया। परंतु न तो राजेश ने चाय पी न नाश्ता किया। नीलिमा ने कहा– " क्या बात है राजेश, अपना दुःख मुझे न कहोगे ?" राजेश ने कहा, "मेरे लिए ये सारी बातें जरूरी नहीं है, तुम्हें इनकी जरूरत है। तुम कमाती हो तुम्हें दिनभर दफ्तर में सिर खपाना पडता है। मुझे इनकी क्या आवश्यकता है, मैं निकम्मा, बेकार; औरत के टुकडों पर पलता हूँ। " यह कहता हुआ राजेश सिगरेट पीता हुआ बाहर चला गया।

नीलिमा कुछ अनमनीसी–घुटी–घुटीसीही प्लेट में रखे हुए अछूते अशोक–ब्रेडको देखती रही। राजेश के साथ गुजरी हुई मधुर यादें उसे याद आती थीं। उस के स्मृतिपटल पर एक के बाद एक दृष्य सामने आने लगते और फिर मिट जाते। उसे याद आया वह दिन जब उसकी शादी राजेश से हुई थी। शादी की वह सुहाग–रात, दोनों प्यारभरे जवान दिल एक–जान हो गये थे, दो मन एक हो गये थे और एक दूसरे के रंग में रंग गये थे। दो जवानियों का वह मिलाप, एकान्त वातावरण में प्यार की शहनाई बजा रहा था। दूसरे ही दिन राजेश को कंपनी में मॅनेजर के पद पर नियुक्त किया गया था। राजेश ने दौडकर नीलिमा को अपनी बाँहों में भर लिया था। " तुम तुम . . . लक्ष्मी हो नीलिमा लक्ष्मी। कल तुम इस घर में आई और आज मैं कंपनी का मॅनेजर बन गया। " आँखों से निकली हुई आँसू की बूँद मोती बन गयी। पीडा से तन सिहरा, मन टूटा। आँखका आँसू टेबल क्लॉथपर गिरकर फैल गया और नीलिमा उस मधुर स्मृतियों को भुलाकर वास्तविकता देखने लगी। वह चौंक गई। फिर पलक झपकी, चित्र उभरा, नई नौकरी, नया घर, नई वधू। नया नया संसार, नई नई मधुर बातें और नया नया प्यार। सब रंगीन, सब सुहाना। अपने ही गीत अपनाही संगीत। स्नेह और प्यार मे दृश्य सजे, घर सजा, दीवारें सजीं। ड्राइंगरूम सजा, और जब तन और मन विहँसते तो दीवारें भी मुस्कराती हुई उन दोनों का साथ देती थीं। प्यार भरा जीवन। दिन गुजरते गये...गुजरते गये। फिर एक दिन कंपनी बंद हो गई। राजेश की नौकरी छूट गयी। सारे सपने टूट गये। हँसते–किलकते चेहरोंपर चिंता की आग छा गई। खुशीका सारा वातावरण एक पल में गम में बदल चुका। चार महीने तक साहस बँधे रखा। नीलिमाने एक एक कर अपने सारे गहने बेच डाले। भूखे पेटने जवाब दे डाला।

सहपाठिनी हेमा की सहायतासे नीलिमा को एक दफ्तर में नौकरी मिल गई। नीलिमा को नौकरी मिलने पर राजेश का दिल टूटा। वह उदास, चिंतित, सदा खोया खोया सा रहता था। उसकी दशा तो पंख टूटे

हुए पक्षी की तरह थी। पर क्या करता, मजबूर था...।”

एक दिन राजेश के आते ही नीलिमा बडे मान और अदासे बोली “मेरे हुजूर की सवारी अब आ रही है। हम यहाँ पलक पावडे बिछाये बैठे हैं। कहाँ रहे अबतक?” “अपने लिए जगह ही कहाँ है सिवा इधर उधर मारे मारे घूमने के, यह तुम्हारी दया है जो तुमने निकम्मे बेकार पति को जगह दी है।’ राजेशने कहा। नीलिमा ने गले में बाहें डालते हुए कहा– “सुनो, जलदी से हम खाना खाकर बाजार चलेंगें।’ ‘क्यों?’ राजेश ने कहा। “तुम्हारे लिए स्वेटर का ऊन लाना है।” “क्यों तकलीफ करती हो मेरे लिए, तुम मेरे लिए ऊन में बेकार पैसे न खरचना, तुम चाहो तो अपने लिए साडी ले आओ, तुम कमाती हो, तुम्हें समाज में घूमना उठना–बैठना पडता है। मैं भला कहाँ जाता हूँ। यहीं घर में ही पडा रहा हूँ ना? फिर क्या लाभ?” राजेश ने उत्तर दिया। नीलिमा मन मसोसकर रह गई। राजेश कुर्सीपर बैठा लंबे पाँव फैलाये सिगरेट का धुआँ छोडता रहा। नीलिमा भी अनमनी सी एक घुटन सी लिए नई–नई पत्रिका के पन्ने उलटती बैठी रही।..., दूसरे दिन दफ्तरसे आते ही नीलिमा बोली– “राजेश, क्या तुमने सेन्ट्रल बँक में अर्जी नहीं की? यह सर्व्हिस तो श्योर थी। संगीता के पिताजी ही तो इस सिलेक्शन बोर्ड के प्रमुख थे। मैंने संगीता से कहा था, आज उत्तर आया कि राजेश के नाम से कोई अर्जी आई नहीं। तुम ने अर्जी क्यों नहीं भेजी राजेश?” “उहूँ! क्यों? यूँ ही” अन्तर की पीडा फिर उभर आई, “रजिस्ट्री करने के पैसे नहीं थे” “ओह, राजेश, मुझसे माँग लेते।” राजेश मौन बैठा रहा। हिला तक नहीं। नीलिमाने धीरेधीरे उसके दोनों हाथ अपने हाथ में ले लिए। उसके कपोल आँसुओं से भीग चुके थे। “कहो राजेश, कुछ भी कहो। बोलो ना राजेश, मधुर न सही तिक्त भी, कुछ भी सही, मगर चूप न रहो। तुम्हारी नीलिमा कुछ प्यारभरी बातें सुनना चाहती है।” राजेश ने कहा– “उस दिन कहाँ गई थी तुम्हारी भावनाएँ, ‘जब हम सिनेमा देखने गये थे। हेमा और अनिता भी साथ थे। याद आया? मैंने उस दिन कौनसा सूट पहना था याद है? एकही सूट तो रह गया था, और तुम्हें याद है तुमने क्या पहना था– नया चेस्टर, अनिता जो कश्मीरसे लाई थी, उस दिन मुझे पुराना सूट पहनाकर स्वयं नया चेस्टर पहना। अपनी सहेलियों के बीच मुझे नीचा दिखाने के लिए। बेकार निठल्ले पतिको इसतरह रखा जाता है! और मैं स्वयं... “नहीं नहीं राजेश, तुमने अपनी नीलू को गलत समझा, जरा उसकी ओर देखो तो, ऐसी भावनाएँ रखती वह तो आज ऐसी न रहती। तुमने उसका प्यार नहीं समझा।”

“मैं अब तुमपर और बोझ नहीं बनूंगा। बहुत दिन तुम्हारे टुकडोंपर पला, मैं यहाँसे चला जाऊँगा। शायद तबतक वापस नहीं आऊँगा जब तक कि स्वयं न कमाने लगूँगा, और इतना नहीं कमा लूँगा कि मुझपर जो तुमने खर्च किया है, उसका हिसाब चुकता न कर दूं। रुपया ही सबकुछ है। रुपया ही इस दुनिया की ताकत है। कलसे तुम स्वतंत्र होगी, मैं कहीं और जगह चला जाऊँगा, अगर किस्मतने यारी न दी तो मुझे झाडू की तरह कोने में जगह दे देना। नीलिमा रो पडी, ‘अखिर तुम यही चाहते थे राजेश, आजकल तुम्हें यह क्या हो गया है:? किससे पूछूँ कि मेरे भाग्य को किसने शाप दिया है! मैं कैसे समझाऊँ कि मैं सैकडों, हजारों, नहीं, लाखों भी कमाऊँगी तो भी तुम्हारे प्यार की एक बूँद के लिए प्यासी की प्यासी ही रहूँगी, तुम्हारे प्यार की प्यासी। सिर्फ प्यार की एक बूँद के लिए मेरा गला भी घोंट दो राजेश! मैं ऊफ् तक नहीं कहूँगी, पर यों रह रहकर नश्तर न चुभाओ।’ नीलिमा रोती रही, सिसकती रही, राजेश बाहर चला गया।

इस तरह उन दोनों के बीच एक दीवार खडी हो गई। दोनों इस तरह रहने लगे जैसे एक दूसरे को पहचानते नहीं हो। कोई किसी के कार्य में दखल नहीं देता। राजेश अपना समय बाहर रहकर गुजारता, और नीलिमा अपनी नौकरी और घर के





कामकाज में। नीलिमा उससे बोलना चाहती परंतु राजेश मौन ही रहता। एक दिन की बात है, राजेश के टेबलपर अर्जीका एक लेटर लिखा हुआ नीलिमा को दिखाई दिया। अर्जी सर्टिफिकेट के साथ पोस्ट के लिए तैयार थी। दफ्तर जाते समय लिफाफेपर अफसर श्री. एस. एल. वर्मा लिखा नाम नीलिमा ने देख लिया। वह उनकी सेक्रेटरी संगीता बहनसे मिली। उसने कहा कि वर्माजी रुपयों के सिवा किसी से रिश्ता नहीं रखते। उन्होंने कह रखा है, नौकरी की जगह के लिए चारसौ रुपये और अगर नौकरी यहीं करना चाहे तो दो सौ अलग, ये न देनेपर कहीं भी रख सकते हैं। नीलिमा स्तब्ध रह गई। छ सौ रुपये देगा भी कौन? राजेश को बताऊँ, पर वह भी क्या कर सकता है?

उसने साहस किया, अपने हाथ की घडी, चार सोने की चूडियाँ, एक अँगूठी, तथा रेडियोसेट बेचकर और सौ रुपये बँक से बटोरकर वर्माजी को दिए और वह नौकरी तयकर आई। राजेश ने रेडियो सेट के बारे में पूछा तो उसने खराब होने का बहाना किया।... एक सप्ताह बाद राजेश को नौकरी का अपॉइन्टमेन्ट लेटर आया। राजेश के आते ही नीलिमा ने उसका हाथ पकडा और उसके गले में बाहें डालकर कहा, ‘राजेश तुम्हें नौकरी मिल गई, लाओ मिठाई।’ पर नीलिमाने क्या सोचा था, और क्या हो गया? राजेशने उसके गालपर चाटा रसीद किया। “तुम तो कह रही थी रेडियोसेट खराब है! गहने जवाहरत गिरवी रख आयी हो। तुम समझती थी मुझे अंधेरे में रखोगी, क्या नौकरी तय कर आई थी। वाह! नहीं चाहिए मुझे ऐसी नोकरी, इससे तो अच्छा था कि मैं भूखा रह लेता, गरीब रहूंगा मगर रिश्वत देकर नौकरी नहीं करूंगा।” नीलिमा को क्या मालूम था कि जिसके लिए वह यह सब कर रही है वही आदर्श के लिए उसे ठुकरा देगा, अपनी नीलिमा को। काफी रात गये राजेश घर लौटा। बत्ती बुझाकर सोनाही चाहता था कि उसने पलंग के पास लगी टेबलपर लिफाफा देखा तो उसे मालूम हुआ कि वह नौकरी तय होने का है। उसने तो अर्जी भी नहीं पोस्ट की थी। नीलि–माका गहने, और रेडियोसेट बेचना, नौकरी तय होनेका अपॉइन्टमेन्ट लेटर आना, नीलिमाका गले में बाहें डालना आदि सब बाते चल-चित्रकी तरह उसके सामने घूमने लगीं। आधी रात के बाद... उसने देखा अपने पाँवों में सिर रखे नीलिमा कुछ कहना चाहती है “मेरे देवता, नारीकी उस अंतर्वेदना को देखो जो आजतक तुम्हें नहीं मिली, मेरे स्वामी उस पीडाको सहलाकर देखो, उसके अरमानों की कल्पना करो, जो तुमने सदा अधूरेही रखे हैं।” राजेशने पाँवोंको समेट लिया। वह चौंककर उठ बैठा। कोई नहीं था। नीलिमा सो रही थी। पर वह तो अब भी राजेशके प्यार की एक बुंद के लिए प्यासी थी। पास होते हुए भी उसके और राजेश के बीच दीवार थी, पास होते हुए भी वह बहुत दूर थी।

* * *

वक्तके साथ सभी मित्र बदल जाते हैं;
उम्रके साथ सभी चित्र बदल जाते हैं;
क्या बताऊं? मुसीबत में इन्सान ही नहीं,
चांद के बाद नक्षत्र भी बदल जाते हैं।

संग्राहक– कु. विजया चि. नागडा
T. Y. B. Sc.

# तीन कविताएँ :-

## अन्योक्ति

अरे–ओ हंसी–सुन ओ सागरकी लहरें–
अभीतक तुम्हें हैं किनारोंके पहरे ?
जरा उछलकर तोड दो जंजीरोंको–
ये जर्जर किनारोंकी बकवास रोको !

**  **

## दिले नादाँ–

दिले नादाँ ! जरा संभल, ये मोमकी नगरी
पैसोंसे गरम कर तो पिघल जायेंगे ये लोग ।
कुदरतकी तमाचोंसे गिरगिरके जी जरा–
तेरे जख्मोंसे बहा खून निगल जायेंगे ये लोग ।

**  **

## संगदिल सुंदरी

तुझे देखा–तो दिलसे आह–सी निकली–
मनकी आँखोंने सुने सूर भी शहनाईके–
हाय ! बेदर्द, तूने जबसे दिल दुखाया है,
आशिक हैं हम तभीसे शामे-तन्हाईके ।।

प्रमोद कुलकर्णी
प्रथम वर्ष, वाणिज्य

## – एक बार आकर कह देना –

एक बार आकर कह देना
प्रीत तेरी झूठी ना थी,
जो छेडा था गीत सुहाना
आस उसीकी रूखी ना थी... १

अँखियों में जो सपने झूले
खुशबू उनकी रूठी ना थी,
बोली में झरते झरनों की
मत्त मधुरिमा सूखी ना थी... २

एक बार ही आकर ऐसी
प्रियाकी कोई बात बता दे
उर में जलती सी आहोंपर
कुछ थोडी आशा छिटका दे.... ३

एक नया विश्वास मिला फिर
प्रीत लिये मैं जी आऊँगा,
मरते दम तक बाँट जोहना
नैन बिछा मैं भी सीखूँगा.... ४

–संजय भेंडे
एफ. वाय. बी. कॉम.





# मनुष्य जीवन में परिश्रम का स्थान

– कु. नलिनी बी. लखोटे
S. Y. B. A.

किसीने कहा है कि, " श्रम ही सों सब मिलत है, बिनुश्रम मिले न कछु " इस पंक्तिसे हमें यह ज्ञात होता है कि मनुष्य के जीवन में परिश्रम का महत्त्वपूर्ण स्थान है। इसके द्वारा असंभव कार्य संभव हो जाते हैं। आजकल जो बडे से बडे काम हुए हैं, वे इसी के बलपर। परिश्रम दरिद्र को धनी बना सकता है। जिसने परिश्रम को अपनाया उसको मनुष्यने अपनाया है। जिस व्यक्ति, या समाज, या देश ने इसका सहारा लिया वह संसार में चमक उठा। परिश्रम की पूजा करने से कभी कोई गिरी अवस्था में नहीं रह सकता। वास्तव में परिश्रम बहुत बल है। यदि सभी लोग जीवन में परिश्रमी बननेकी ठान ले तो संसार से दैन्य और दरिद्रता का नाश हो जाय।

बडे या महान पुरुष जो इतने ऊँचे पदपर पहुँच गये, यह एक क्षण में नहीं हो गया। उन्होंने दिनरात परिश्रम किया तभी वे ऊँचाईपर पहुँचे। बडी–बडी सभ्यताओं और संस्कृतियों की ओर देखने पर हमें यह ज्ञात होता ह कि उनको इस दशा में पहुँचाने के लिए कितने महान् योद्धाओं, महान् नेताओं, महान् राजनीतिज्ञों और महान् लेखकों ने वर्षों दिनरात परिश्रम किया है। उसी तरह संसारके महान् धर्मके पीछे भी परिश्रम छिपा है। महात्मा बुद्ध ने वर्षों तपस्या करके सत्य की खोज की, पैगंबर साहब मक्का और मदिनाकी खाक छानते फिरे। आज उनको देवता के उच्च आसनपर आसीन देखकर हम दाँतोंतले ऊँगलियाँ दबाने लगते हैं। उनके परिश्रमनेही उन्हें मनुष्यत्वसे उठाकर देवत्व में परिवर्तित किया है।

वास्तव में संसार में सभी को कुछ न कुछ परिश्रम करनाही पडता है, चाहे वह धनी हो या निर्धन। जो परिश्रम से जी चुराते हैं वे कहते हैं–

अजगर करे न चाकरी, पंछी करे न काम।
दास मलूका कहि गये सबके दाता राम॥

ठीक हैं ? परंतु क्या ये पक्षी अपने भक्ष्य की तलाश में कहीं नहीं भटकते ? अजगर भी अधिक नहीं तो थोडा तो परिश्रम अपने भोजन की तलाश में करते ही होंगे। तात्पर्य यह है कि परिश्रम अनिवार्य है।

परीक्षार्थी कठिन परिश्रम करने के पश्चात् ही परीक्षा में अच्छी श्रेणी पाकर जीवन में उन्नति कर पाता है। इसलिये बिना परिश्रम के उन्नति पाना संभव नहीं है। परिश्रम के साथ साथ अपना मस्तिष्क भी उन्नत होता है।

कोई यह भी कहेंगे कि A Will will find a way. इच्छा होगी तो मार्ग मिलेगा। ठीक है, परंतु केवल इच्छा होनेसे मार्ग नहीं मिलता। इच्छा के अनुसार परिश्रम करने पर ही रास्ता मिलता है, अन्यथा नही। मान लीजिये, हमारे सामने एक खजूरका पेड है। उसपर रसीले खजूर लटक रहे हैं, उन्हें देख मुँह में पानी आया, परंतु वे खजूर अपने आप हमारे मुँह मे नहीं आएँगे। हम पेड पर चढेंगे तभी हमको खजूर मिलेंगे। ऊपर चढनाही परिश्रम करना है।

एक प्रसिद्ध वक्ता था। शुरु शुरु में वह धारा प्रवाह बोल नही सकता था। उसका व्याख्यान सुनकर लोग हँसते थे। पर वह नित्य सुधार करता गया और अंततः सफल वक्ता बन गया। सच है " जिन खोजा तिन पाइयाँ गहरे पानी पैठ " बिना उद्योग तथा परिश्रम के कुछ नहीं मिलता।

प्रकृति के छोटे छोटे जीव तक हमें परिश्रम का पाठ पढाते हैं। चींटी को देखने से ज्ञात होता है कि वह नित्य परिश्रम करती है। मधुमक्खियाँ फूलोंमेंसे मधु इकठ्ठा करके लाती हैं। कितने परिश्रम के बाद वे शहदका छत्ता बनाती हैं। क्या प्रकृति के इन साधनोंसे हमें कुछ सीख नही मिलती?

जो मनुष्य हरदम कठिन परिश्रम में जुटा रहता है उसके लिए work is worship के अनुसार परिश्रम ही ईश्वरकी उपासना है। परिश्रमरूपी अमृतसे मनुष्य अमर बन जाता है। जो मेहनत नहीं करता और अकर्मण्य बना रहता है, वह स्वतः दुराचार की ओर प्रवृत्त होता है। किसीने ठीक कहा है। ' शून्य मस्तिष्क शैतान का घर है।'

जवाहरलाल जो ने ठीक कहा था– " आराम हराम है।" इसका मतलब यही है कि हरएक आदमी परिश्रम करे। अपने ऊपर कार्य का बडा भारी बोझ होते हुअे भी वे लिखने पढने में समय निकाल लेते थे। वे केवल चार घंटे सोते थे। अपने इन कठिन परिश्रमसे ही वे ऊँचे पदपर पहुँचे थे।

विद्यार्थी आजकल विद्योपार्जन में आवश्यक परिश्रम नहीं करते। इसीलिये हम कलाकौशल, विज्ञान तथा शिक्षाके क्षेत्र में नीचे गिरे हुए हैं। जब तक हम परिश्रम करने का बोझ न उठायेंगे, तबतक हमारा देश उन्नति न कर पायेगा। परिश्रम पूजा है। इसके बलसे मनुष्य सफलता पा सकता है।

धनवान हो या निर्धन, परिश्रम सब का स्वागत करता है। फिर हम क्यों न परिश्रमका स्वागत करें? मतलब, हम सब को परिश्रम करना ही चाहिए।

* * *

## दीप–ज्योति

देखिये, मैं दीपक हूँ। प्रकाश का अनुपम केन्द्र; ज्योतिर्मय जीवन का उज्ज्वल प्रतीक हूँ। मेरी भी संस्कृति है, सभ्यता है। मेरी संस्कृति है – प्रकाश की, आत्मोत्सर्ग की संस्कृति का आदर्श है – अपने को तिल तिल जलाना, अंधकार से लड़ना और जग को ज्योतिर्मय करना! मैं ही हूँ, जो जनता पथभ्रष्ट होने से बच रही है, नहीं तो वह व्यर्थ ही भटकती, अंधकार में टकराती! मैं प्रकाश बाँटने को बैठी हूँ। आये कोई मेरे पास, छुये कोई मुझे और बन जाये मेरे जैसा ही जगमग जगमग करता अंधकार सें लडता दीपक!

– संग्राहिका : कु. विजया वि नागडा
टी. वाय्. बी. एस्सी.



# संघर्ष

– दिलीप द. महाजन
टी. वाय्. बी. ए.

आनंद रास्तेसे चल रहा था। उसके पांव धीरे–धीरे बढ रहे थे। रातका समय था। सब तरफ सन्नाटा था। चाँदका नीला प्रकाश धरतीपर फैला था। आनंदके चेहरेपर एक गहरी चिंता थी। मन में विचारोंका तूफान था। फिर भी वह व्यथित अंतःकरणसे चल रहा था–चल रहा था। उसने दरवाजा खट–खटाया। दरवाजा खुल गया। दरवाजेकी खुलने की आवाज उसका दिल चीरती हुअी चली गयी। वह जरासा घबराया। " कौन है? " रघूके शब्द आनंदके कानोंपे टकराअे। " मैं...मैं हूँ... आनंद " यह कहते हुए आनंद उजियाले में आया। उजियाले में आनंदका चेहरा स्पष्ट दीखने लगा। आनंद को देखतेही रघू क्रोध में आकर तन गया। अपना भक्ष्य देखकर शेर तनता है वैसा! " तुझे यहाँ आनेकी हिंमत कैसी हुअी " रघू गरज उठा और मुँह घुमाके चलने लगा। उसके पीछेही आनंद भी घर में आया। "रघू...यार...मैं तुझे कैसे कहूँ? बरसोंसे चलता आया यह बैर, यह संघर्ष, मैं.. मैं खत्म करने के लिए आया हूँ।" " झूठ–सब झूठ " रघू चिल्लाया। " नहीं... रघू मैं...मैं तुझे कैसे साबित करके दिखाऊँ, बस एक बार तू मुझे गले लगा ले, मुझे विश्वास है तेरी दोस्तीका हाथ आगे बढेगा।' आनंदने कहा। " बस-बस, मुझे ज्यादा मत सिखाना, तेरी मेरी दोस्ती...क्या बक रहा है तू...यह कभी संभव है? बारूदका ढेर और चिंगारी की कभी दोस्ती देखी है तूने? चल, चले जा यहाँसे " रघू चिल्लाया। " लेकिन...लेकिन..." आनंदने कहा। " तू यहाँसे चले जा, नहीं तो नतीजा बुरा होगा," रघू फिर चिल्लाया। आनंद लौटा।

बहुत दुःखी अंतःकरणसे वह घर आ रहा था। रघूने किये अपमान को उसने सह लिया था। लेकिन मन व्यथित था। थोडेही समय मे आनंद अपनी झोंपडीके पास आया, उसने दरवाजा खोला, थोडी आवाज हुअी। झोंपडी में दिया टिमटिमाता था। दीएका मंद प्रकाश फैला था। एक कोने में उसकी पत्नी सावित्री सोयी थी, और पासही में संध्या। उसका चेहरा चमक रहा था। वह जवान थी, और सुंदर भी, इसलिये आनंदको उसकी चिंता थी। सत्येन दूसरे कोने में सोया था। दरवाजे की आवाज से सत्येन जग गया। " कहाँ गये थे बाबा? " उसने पूछा। " सो जा बेटा, सो जा, मैं बाहर गया था " कहते हुअे आनंद एक कोने में लेट गया। आज की बात को आनंद मन में सोच रहा था।

आनंदके पिताजी दादू चौगुले एक बडा आदमी था। संभू भोसले के साथ उनका बैर था। संभू के बेटे रघू ने बैर को विरासत में पाया। आनंद दादूकी वृत्ति का विरोध करता था, लेकिन दादूको उसकी पर्वाह नहीं थी। दादू की इच्छा थी कि बरसोंसे चलता आया यह बैर कभी नष्ट न होने पाये। एक रात दादू घायल होकर घर आया। उसका सर फट गया था। उससे खून की धारा बहती थी। खेत के मामले में रघू और संभू दोनों में ठन गयी थी। दोनों ने कुल्हाडियाँ चला दीं। दादू होश खो रहा था। जमीन खूनसे लथपथ थी। वह आखरी साँसे गिन रहा था। " आनंद...तू...तू मेरा बेटा है। तुझे मेरा एक कहना है, जीवन में चाहे जैसी स्थिति आये, उस संभू के आगे और . और...रघूके आगे अपना सर कभी नहीं झुकाना, उनका बदला लेना, बदला लेना, बदला लेना" बरसोंसे चलता आया बैर आनंदको सौंपकर दादू चल बसा। उधर संभूने भी अंतिम साँस लेने से पहले अपना बैरभाव रघूको सौंपा था।

रघूकी आर्थिक स्थिति अच्छी थी। रईस बाप-दादाओंने कमाई हुई जमीन थी। रहनेके लिए बडी हवेली थी।

आनंदकी स्थिति इसके विरुद्ध थी। एक काल में रघू जैसी ऐषोआरामकी जिंदगी आनंद भोग रहा था। लेकिन... लेकिन...तकदीर को यह मंजूर नहीं था। आनंदके कुछ व्यवहार फँसे और आनंद का घर उजड गया। आज आनंदको झोंपडी में रहना पडता था। उसकी पत्नी सावित्री सुख और शांति का जीवन पसंद करती थी। उसकी बेटी संध्या अब जवान हुयी थी। संध्या बहुतही सुंदर थी। सत्येन गरीबीके कारण पढ न सका। वह बापके साथ मजदूरी कर रहा था। सत्येन आनंदको रघूके पास जानेसे रोकता था। उसका जवान लहू खौलता था। वह सोचता, दादाजी के खूनका बदला अवश्य लेना चाहिए। लेकिन आनंद उसे समझाकर शांत करता था। सत्येन यह भी अनुभव करता था कि अपनी बहन का विवाह अब हो जाना चाहिए। आनंद और सत्येन इस दिशा में प्रयत्नशील थे। विवाह के लिए वे पेट काटकर पैसा बचाते थे।

बरसोंसे बहता हुआ लहू आनंदको रोकना था। उसके लिए वक्त आनेपर वह बलिदान करनेवाला था। कभी – कभी आनंद शून्य में देखता घंटों बैठा रहता था। वैसाही वह एक दिन बैठा था। उसके मन में बरसोंसे चलता हुआ बैर तूफान मचा रहा था। उसने मन में प्रतिज्ञा की, " बरसोंसे चलता हुआ बैर मैं रोकूंगा, वक्त आनेपर उसके लिए बलिदान करूँगा " ऐन उसी वक्त दूरके मंदिर में घंटानाद हुआ और आनंद होश में आया। वह बहुत खुश हुआ। उसे लगा भगवानको भी अपनी प्रतिज्ञा पूरी करनी है।

बारिश जोरसे शुरू थी। बिजली आँखें चौंधा देती थी। बिजली के प्रकाश का प्रतिबिंब क्षणमात्र पानी में दीखता था। आनंद आज घरपरही था। उसके मन में विचारोंका तूफान शुरू था। उसे सब बातें याद आ रही थीं। अपने और रघू के खानदान में जो खूँख्वार हत्यारे हो गये थे उनकी उसे याद आयी। वह बहुतही दुखी हुआ। दादू चौगुले और संभू भोसले ने एक दूसरे के किये खून उसे याद आये। पिताजीके मरनेके वक्त खूनसे लथपथ जमीन उसे याद आयी। उसे सब सर्वत्र लाल ही लाल दीखने लगा। वह बेचैन हुआ, उसे उसकी प्रतिज्ञा याद आयी। बरसात थम चुकी थी। स्मृति अस्पष्ट होते होते नष्ट हुयी। आनंद होश में आया। एक बार यह बैर खत्म करनेका प्रयत्न करनेके लिए वह आनंद घरसे निकल पडा। रघूके घरकी ओर चलने लगा।

आनंद रघूके घर में खडा था। " बरसोंसे चलता हुआ बैर हम भूलेंगे, बहता हुआ लहू हम रोकेंगे, सिर्फ तू दोस्तीका हाथ आगे बढा " आनंदने कहा।

" नहीं...नहीं यह कभी संभव नहीं। मुझे वह रात याद आती है, जिस रात मेरे पिताजी खूनसे लथपथ घर आये थे। उनके सरका वह घाव प्राणांतिक सिध्द हुआ था। मुझे वह खून याद आता है जिससे मेरे घरकी जमीन लथपथ हुयी थी। वह खून मैं नहीं भूल सकता। पिताजीको दिया हुआ मेरा वचन मुझे याद आता है। दुष्मन दुष्मन है, उससे कभी दोस्ती नहीं करना, यही हमारे खानदानकी विशेष है " रघू चिल्ला चिल्ला कर बोल रहा था। चेहरा पसीनेसे लथपथ था। सारा शरीर पसीनेसे भीगा था।

" मैं भी अपने पिताजीका खून, उनका बहता हुआ लहू नहीं भूल सकता। पर..." आनंद एकही साँस में कह रहा था।

" फिर यहाँ क्यों आया है ? " रघू चिल्लाया। " हाँ-मैं यहाँ आया हूँ, यह सच है। मेरा कहना है कि-बरसोंसे बहता हुआ लहू अब रोकना चाहिए। अपने बाप-दादा अपना बैर अपने साथ ले गये। वे खूँख्वार हत्यारे थे। हमें होश में आना चाहिए। "

" नहीं, यह कभी संभव नहीं। तेरा यह वहम है आनंद। अगर मैं चाहता तो अबतक तेरा खून कर सकता था। तू आज दूसरी बार मेरे घर निःशस्त्र आया है। लेकिन... लेकिन... निःशस्त्र आदमीपर वार हमारे भोसले खानदान में अभीतक किसीने नहीं किया। तेरी स्थिति देखकर मुझे दया आती है। तेरी दरिद्रता यही मेरा बदला है। तू यहाँसे चले जा, अगर तुझे पैसे चाहिए तो भीख मांग। नहीं-नहीं, मैं भी क्या मूर्ख हूँ-तुझे भीख मांगनेको कहता। तुझे भीख मांगनेकी क्या जरूरत है। खूबसूरत जवान बेटी संध्या है, उसे बाजार में रख। पैसेही पैसे मिलेंगे " दांत भींचकर रह गया आनंद।... बहुत प्यार करता था संध्याको वह।

" रघूऽऽ " सब दीवारोंपे जा टकराई आनंद की वह चीख। संध्याके संबंध में गंदे शब्द सुनतेही आनंद आग बबूला हुआ। उसकी आँखों में खून उतर आया। उसे लगा, अभी रघूका खून करना चाहिए, यही मौका है। उसे सामनेकी दीवारपर लटकी हुयी बंदूक दीख रही थी। बेखबर और जोरजोरसे हँसनेवाला रघू दीख रहा था। उसे अपने पिताजीके–दादू चौगुलेके शब्द याद आने लगे - " बदला लेना, बदला लेना, बदला लेना " ये शब्द आनंदके कानों में गूँज रहे थे। उसे पिताजीकी प्रतिज्ञा याद आयी। उसकी समझ में नहीं आ रहा था कि क्या करे ? जैसे जैसे आँखोंसे आँसू बहने लगे वैसे आनंदका मन साफ होने लगा। फिर वह एक बार ' आनंद ' बना। बहुत रोया, गिडगिडाया था आनंद, किन्तु रघू नहीं पसीजा। पत्थर !...... आनंद वापस जाने लगा, जाते जाते उसे रघू के शब्द याद आये –" तुझे भीख मांगनेकी क्या जरूरत है ? खूबसूरत जवान बेटी संध्या है, उसे बाजार में रख। पैसेही पैसे मिलेंगे " फिर दांत भींचकर रह गया आनंद। " भगवानके यहाँ न्याय है। तू जितना मदहोश हुआ है, उतनाही गिरेगा, संपत्तिका तेरा अभिमान नष्ट होगा " ये दुर्वचन कहकर आनंद चला गया।

साल गये। मौसम बदले। धरतीने अपने नये नये रूप बदले। बूढे मर चुके और नये बालकोंने जन्म लिया। आनंद ने अच्छा **घर देखकर** संध्याकी शादी की थी। संध्या माँ बनी थी। उसकी खुशीका ठिकाना न था। अब वह दादा बना था। अपने सुंदर पोतेको देखकर वह असीम सुखका अनुभव करता। सावित्री भी अपने पोतेको प्यार करती थी। सत्येन अपने भानजे को हाथों में लिए घूमता था। कभी-कभी संध्या माँ के घर आती। आनंद और सत्येन दोनों बाप–बेटे मजदूरी करके अपनी गुजारिश कर रहे थे। सुखसे रहते थे। लेकिन...बरसोंसे चलता हुआ यह संघर्ष खत्म न कर सकने की चिंता आनंदको लगी थी।

